मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

ठी अर्थशास्त्र परिषदेचे 5

# अर्थसंवाद

भारतीय सौर चैत्र-ज्येष्ठ १९३८
एप्रिल-जून २०१६ / खंड ४० अंक १



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

एप्रिल-जून २०१६ / खंड ४० अंक १

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

सल्लागार मंडळ
(२०१५-१८)
तेजस्विनी मुडेकर
अरूण पिसे
राजेंद्र गव्हाळे
विजय भोपाळे

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश निकम
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद: मुंबई शेअर बाजाराची वाटचाल....००१
विजय कविमंडन, नागपूर
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद.........००३
माधव गायकवाड, औरंगाबाद
जल व्यवस्थापनातील डॉ. आंबेडकरांचे योगदान.......०१५
उमेश घोडेस्वार, अकोला
डॉ.आंबेडकर: एक निष्णात अर्थतज्ज्ञ.................०२१
माधुरी लेले, नागपूर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर-एक अर्थतज्ज्ञ...............०२६
संतोष ताडे, मोरेश्वर नन्नावरे, आकोट
डॉ.बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थशास्त्रज्ञ...........०३३
महादेव रिठे, बुलढाणा
अनंत पैलूंचा अर्थशास्त्रज्ञ: डॉ.बाबासाहेब आंबेडकर...०३९
नितीन चौधरी, अकोला
रुपयाच्या प्रश्नाविषयी डॉ.आंबेडकरांचा प्रासंगिक दृष्टिकोन.०४५
शकुंतला पाटील, इचलकरंजी
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार......०५१
दिनकर मोरे, इस्लामपूर
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा.०५७
दीपक भुसारे, पैठण
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार......०६२
सुमित्रा पवार, भुसावळ
अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार.०६७
सुभाष गुर्जर, वरवट बकाल
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विचारक्रांती.....०७२
यल्लप्पा पुजारी, सोलापूर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार........०७७
सुषमा मंडले, लातूर
महिला सक्षमीकरणात डॉ.आंबेडकरांचे योगदान........०८५
सूत्रसंचालकाचे टिपण:४० वे अधिवेशन
दि.व्यं.जहागिरदार, अमरावती..........................०९१
ज.फा.पाटील, कोल्हापूर ..............................०९५
उल्हास माळकर, सांगली..............................०९९
शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन.......................१०४
म.अ.प.: लेखा परीक्षण अहवाल-२०१५.............१०६

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०१६-१७**

**अध्यक्ष**

शिवाजी मुरलीधर भोसले (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

रामदास बापुराव भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

अर्जुन महाडिक (कोल्हापूर)

विनायक भिसे (औरंगाबाद)

बालाजी शिंदे (परभणी)

**सदस्य**

सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)

अशोक खाचणे (जळगाव)

राजेंद्र शिंदे (धुळे)

महादेव पाटील (मिरज)

हनुमंत नन्नवरे (अकलुज)

संजय धनवटे (कारंजा)

पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)

तुकाराम मुंडे (मानवत)

दिनकर मोरे (इस्लामपूर)

जीवन सोळंके (नाशिक)

वामन सावंत (रत्नागिरी)

राहूल म्होपरे (कोल्हापूर)

सुरेश ढाके (भुसावळ)

सुरेश पाटील (चांदवड)

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)

मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर

कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,

गजानन नगर, पिंपळगावरोड,

यवतमाळ - ४४५ ००१

भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.

**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.

## संपादकीय संवाद...

### मुंबई शेअर बाजाराची वाटचाल.....

मुंबईला भारताची आर्थिक राजधानी असं म्हटलं जातं. रिझर्व्ह बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, आयुर्विमा महामंडळ, देशातील अग्रगण्य वित्तसंस्था व कंपन्यांची मुख्य कार्यालयं मुंबईतच आहेत. गेल्या तीन-चार शतकांपासून मुंबईतील पैसा व संपत्ती वाढतच आहे. मुंबई शेअर बाजाराचं महत्त्व अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं कधीच कमी झालेलं नाही. अगदी स्थापनेपासून मुंबई शेअर बाजारात दररोजची उलाढाल अन् व्यवहार संख्येत वाढ झाल्याचे दिसते. देशातील सर्व शेअर मार्केटच्या एकूण उलाढालीपैकी एकट्या मुंबई शेअर बाजारात ७०% ते ७५% उलाढाल होते यावरून या बाजाराचं महत्त्व लक्षात येतं. आशिया खंडातील सर्व जुन्या बाजारांपैकी एक म्हणून या बाजाराची ओळख आहे. तो सतत बहुचर्चित विषय राहिला आहे. शेअर बाजार हा गूढतेचं आवरण ओढलेली संस्था नव्हे. अथवा जुगार लावण्याची संधी असलेली व्यवस्था नव्हे. लोकांना झटपट श्रीमंत करण्याची व्यवस्था असणारी संस्था देखील नव्हे. तर ती एक सुस्पष्ट कार्यपध्दती असणारी संस्था आहे. सामान्य गुंतवणूकदारांना देशाच्या औद्योगिक उभारणीत यथाशक्ती हातभार लावण्याची संधी देणारी संस्था या दृष्टीनं शेअर बाजाराकडे पाहिलं जावं अशी अपेक्षा अधुनमधून व्यक्त होत असते. शेअर्सची खरेदी-विक्री करणाऱ्या लोकांना एकत्र आणण्यासाठी योजलेली जागा म्हणजे शेअर बाजार असे सर्वसामान्यपणे म्हणता येईल. पण ही नुसतीच एकत्र येण्याची जागा नसून खरेदी-विक्री व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्टॉक एक्सचेंज नावाची संस्था निर्माण केली आहे. पूर्वी ही अनौपचारिक संघटना असली तरी आता कायद्यानं निर्माण केलेली संस्था आहे. आजचं स्वरूप प्राप्त करण्यासाठी चढ-उतारांचा मोठा पल्ला या संस्थेला गाठावा लागला आहे.

लंडन नाणेबाजारातील रोखे बाजार हा आधुनिक काळातील पहिला सुसंघटित रोखे बाजार समजला जातो. याव्यतिरिक्त लिऑन्स्, ॲमस्टरडॅम् इत्यादी रोखे बाजारही युरोपात प्रसिध्द आहेत. १८१७ मध्ये न्यूयॉर्क रोखे बाजाराची स्वतंत्र अशी स्थापना झाली. अठराव्या शतकाच्या जवळपास ईस्ट इंडिया कंपनीला कर्ज सुरक्षेबद्दल व्यवहार करायचा होता तेव्हा शेअर बाजाराची गरज निर्माण झाली. रोख्यांमधील खरेदी-विक्री व्यवहार भारतात प्रथम १९३६ साली कलकत्त्याला सुरू झाले. १९३९ पर्यंत कलकत्त्याला हा बाजार स्थिरावला. अन् मुंबईतही अशा प्रकारच्या व्यवहारांना प्रारंभ झाला. त्या काळात उद्योगांवर व्यापार करण्यासाठी समभाग व्यवहार मुंबईतील कापड गिरण्यांत सुरू झाले. मुंबईत १८५०च्या मध्यास बॉम्बे टाऊन हॉलसमोर वडाच्या झाडाखाली शेअरचा व्यापार सुरू झाला. तेथे ठरलेल्या वेळेनुसार आठ-दहा दलालांचा अनौपचारिक समुह एकत्र जमत असे. अल्पावधीतच या दलालांची संख्या २२ वर गेली. गुंतवणूकदार त्यावेळी १ रुपयाची गुंतवणूक करीत असत. हे वडाचे झाड आजही हार्निमन पार्कमध्ये आहे. त्या काळात त्यांचं व्यवहाराचं प्रमाण अल्प होतं. पुढे काळानुसार व्यवहार वाढले. नंतर अहमदाबाद, दिल्ली, हैदराबाद, इंदौर या ठिकाणी व्यवहार होऊ लागले. १८५० मध्ये पास झालेला कंपनी कायदा, १८५८ मध्ये झालेले राणीचे राज्यारोहण आणि १८६५ मधील अमेरिकन यादवी युध्द या तीन घटनांमुळे भारतीय उद्योगधंद्यांना चालना

मिळाली. १८५८ मधील राणीच्या जाहीरनाम्यामुळे ब्रिटीश भांडवल भारतात येण्यास प्रारंभ झाला. अमेरिकन यादवी युध्दामुळे कपाशीला मोठी मागणी आली. यातून प्राप्त भांडवलातून नवीन एतद्देशीय कंपन्या स्थापन होण्यास मदत झाली. या सर्व घटनांचा परिणाम शेअर बाजारात मोठी तेजी येण्यात झाला. १८६० मध्ये साठ दलालांसह रोख्यांचा विनिमय केला जात असे. १८६५ पर्यंत अभूतपूर्व तेजी चालली. त्यानंतर जोरदार घसरण अन् नंतर भयानक मंदी असा तो काळ. अशातही दलाल सावरले. त्यांचे संघटित होण्याचे प्रयत्न झाल्याने त्याचा परिणाम शेअर बाजाराच्या दृढीकरणात झाला. उद्योगांसाठी लागणारं भांडवल या बाजारातून पुरविलं गेलं. एखादी पब्लिक लिमिटेड कंपनी काढणं अवघड होतं त्या काळात या दलालांनी पुढाकार घेऊन नव्या कंपन्यांना भांडवल उपलब्ध करून दिलं ही निश्चितच मोलाची कामगिरी होती. भारतीय भांडवल बाजार सरकारी रोखे विकण्याच्या स्वरुपात मुंबईत सन १८७७ मध्ये निर्माण झाला. ५ फेब्रुवारी १८८७ रोजी मुंबईत नेटीव्ह शेअर्स अ‍ॅन्ड स्टॉक ब्रोकर्स संघटना स्थापन झाली. हीच संस्था पुढे मुंबई शेअर बाजार म्हणून ओळखली जाऊ लागली. सुरवातीची सभासद संख्या ३१८ होती. त्यानंतर या संघटनेने टाऊन हॉलजवळ भाड्याने इमारत घेतली. ती इमारत आज मुंबई शेअर बाजाराची जुनी इमारत म्हणून ओळखली जाते.

१९२८ मध्ये आजची मुंबई शेअर बाजार इमारतीची जागा दलाल स्ट्रीट, बॉम्बे समाचार मार्ग आणि हमाम स्ट्रीट यांना छेदणाऱ्या रस्त्यावर डाऊनटाऊन मुंबई या ठिकाणी मिळाली. इमारतीचे बांधकाम करून ताबा १९३० मध्ये घेण्यात आला. प्रेमचंद रायचंद हे त्या वेळेचे आघाडीचे रोखे दलाल होते. त्यांनी मुंबई शेअर बाजारात रोख्यांच्या व्यापारासाठी पध्दत, नियम तयार करण्यास मदत केली. विशेष म्हणजे आजही ते नियम पाळले जातात. मुंबईतील अनेक दलाली कंपन्या कुटुंबांच्या नावाने चालल्या. नंतर त्यांचे नामकरण कुटुंबप्रमुखांच्या नावाने झाले. सुरवातीचे शेअर बाजारातील सदस्य असून त्यांचे आजही व्यवसाय चालू आहेत. त्यात डी.एस.प्रभुदास आणि कंपनी, जमनादास मोरारजी, चंपकलाल देविदास, ब्रिजमोहन लक्ष्मीनारायण यांचा समावेश आहे. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात विविध उद्योगांत नफ्याचे प्रमाण वाढले. परिणामी रोखे बाजारांची संख्या १५पेक्षा अधिक झाली. त्याव्यतिरिक्त अनेक असंघटित रोखे बाजारांची स्थापना झाली. अशा रोखे बाजारांना कर्ब्ज असे म्हणत. त्यामुळे रोखे बाजारांच्या नियंत्रणासाठी १९५७ मध्ये एक कायदा करण्यात आला. खऱ्या अर्थानं १९५७ नंतर शेअर बाजाराचा विकास झाला. दरम्यान अनेक शेअर घोटाळा प्रकरणांमुळे चढ-उतारांना हा बाजार सामोरा गेला. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतात २१ शेअर बाजार होते. त्यांची सभासद संख्या ५५०० पेक्षा जास्त होती. आज मुंबई रोखे बाजार भारतातील ४१७ शहरांमध्ये नेटवर्कच्या माध्यमातून कार्यरत आहे. या बाजारानं देशाच्या विकासात मोठा हातभार लावला आहे. या बाजाराच्या वाढत्या कार्यक्षमतेमुळे व सेबीच्या नियंत्रणामुळे सर्वसामान्य लोकही शेअर्समध्ये गुंतवणूक करू लागले आहेत, हे या बाजाराचं यशच म्हणावं लागेल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेने अखंडपणे अर्थसंवादचे अंक ३९ वर्षेप्रकाशित करून ४०व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हा विशेषांक देत आहोत. अर्थसंवादच्या या विशेषांकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो.

अविनाश रामलाल निकम,
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य-समाजवाद

**विजय कविमंडन, नागपूर**
(निवृत्त प्रपाठक),
७६, प्रसाद नगर, जयताळा रोड.
भ्रमणध्वनी: ९८६००५१८५१

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू अर्थशास्त्रातील त्यांच्या योगदानाशी निगडित आहे. त्यांनी तरुण वयात कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ ईकॉनॉमिक्स येथे अर्थशास्त्रीय संशोधन केले. कालांतराने ते प्रकाशितही झाले. यापैकी एका ग्रंथात त्यांनी ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला होता, तर दुसरा ग्रंथ भारतीय रुपयाच्या अस्थिर मूल्याचे विश्लेषण करणारा होता. नंतरच्या काळात मात्र इतर क्षेत्रांमधील कार्यव्यस्ततेमुळे त्यांना अर्थशास्त्रविषयक ग्रांथिक लेखन करणे शक्य झाले नाही, तथापि विविध प्रसंगी सादर केलेली निवेदने व टिपणे, भाषणे, लेख, आयोगांपुढे दिलेल्या साक्षी इत्यादींमधून त्यांचे भारताच्या आर्थिक समस्यांवरील चिंतन सातत्याने समोर येत राहिले. भारतीय शेतीचे संघटन, छोटी धारणक्षेत्रे, जल-संसाधनांचा विकास व विद्युत, कामगार कल्याण, लोकसंख्या नियंत्रण अशा अनेक विषयांबाबत त्यांनी व्यक्त केलेले विचार आज उपलब्ध आहेत. त्यांच्या आर्थिक विचारांमधील राज्य-समाजवादाची संकल्पना हे त्यांचे मौलिक योगदान असून त्याद्वारे त्यांनी गतिमान विकासासाठी समतापूरक आर्थिक संरचना सुचविली होती. भारतामधील केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक स्थितीही विचारात घेऊन मांडलेल्या या संरचनेला 'समाजवादाचे भारतीय प्रारुप' असे यथार्थपणे म्हणता येईल. प्रशासकीय तसेच वैचारिक पातळीवर या प्रारुपाची योग्य ती दखल घेतली गेली नाही हा दुर्दैवाचा भाग म्हणावा लागेल. स्टेट्स अँड मायनॉरिटीज्म या प्रथमतः ज्ञापनाच्या स्वरुपात लिहिलेल्या व नंतर प्रकाशित झालेल्या (१९४७) पुस्तिकेमध्ये त्यांनी ही संकल्पना मांडली. भारतामधील अनेक समस्यांचे मूळ येथील सामाजिक अर्थप्रणालीतील कु-समायोजनांमध्ये आहे असे त्यांचे ठाम मत होते व त्यावरील उपाययोजनाही मूलगामी स्वरुपाची असणे आवश्यक होते. समतेची ग्वाही देणारी पण स्वातंत्र्याचे

हनन करणारी साम्यवादी हुकुमशाही किंवा स्वातंत्र्य अबाधित ठेवून विषमता आणि शोषण यांना चालना देणारी लोकशाही हे दोन्ही मार्ग त्यांनी नाकारले. गतिमान विकास आणि सामाजिक न्याय यामध्ये अंतर्विरोध असल्याचे बरेचदा म्हटले जाते, परंतु स्वातंत्र्य आणि समतेसह विकास साध्य करणे राज्य-समाजवादाच्या चौकटीत शक्य आहे असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांच्या या पुस्तिकेमध्ये कायद्याच्या भाषेतील अनुच्छेद दिलेले आहेत आणि स्पष्टीकरणात्मक टीपाही जोडलेल्या आहेत. लिखाणाचे स्वरुप ज्ञापनाचे असल्यामुळे त्यामध्ये तपशील नसणे स्वाभाविक आहे; तरीही संलग्न टीपांमुळे त्यांची राज्य-समाजवादाची चौकट लक्षात येते; तसेच सांसदीय लोकशाही आणि हुकुमशाही या शासनप्रणालींवरची परखड मतेही कळतात.

### राज्य-समाजवादाचे प्रयोजन:

डॉ. आंबेडकरांनी या पुस्तिकेच्या माध्यमातून भारताच्या विकासासाठी जी आर्थिक संरचना सुचविली आहे तिचा उल्लेख 'राज्य-समाजवाद' अशा नि:संदिग्ध शब्दांत केला आहे. राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये शासनाची प्रभावी भूमिका व त्यासाठी आर्थिक नियोजन या गोष्टी समाजवादात अपरिहार्यपणे येतात व डॉ. आंबेडकरांनाही त्या अभिप्रेत होत्या "विलक्षण वाटत असले तरी हे सत्य आहे की भारतीय शेतीच्या विविध समस्यांवर औद्योगीकरण हाच सर्वाधिक विश्वसनीय उपाय असू शकतो" असे मानणारे डॉ.आंबेडकर पुढे म्हणतात की "भारताच्या जलद औद्योगीकरणासाठी राज्य-समाजवाद आवश्यक आहे. हे काम खाजगी क्षेत्र करु शकत नाही आणि जरी त्यांनी ते केले तरी त्यातून संपत्तीची विषमताच निर्माण होईल. खाजगी भांडवलशाहीमुळे युरोपात हेच घडून आले व भारताच्या दृष्टीने तो धोक्याचा इशारा समजायला हवा". आपले आर्थिक शोषण होण्यापासून संरक्षण मिळणे हा जर नागरिकांचा मूलभूत अधिकार मानला तर त्यावर आक्रमण न होऊ देण्याची जबाबदारी अर्थातच शासनाची असायला हवी. या दृष्टीने, केवळ औद्योगिक क्षेत्रातच नव्हे तर शेतीमध्ये आणि विम्यासारख्या अत्यावश्यक सेवांमध्येही शासनाची भूमिका प्रभावी असायला हवी. याचा अर्थ डॉ. आंबेडकरांना सोविएत-प्रणालीसारखी संरचना अपेक्षित होती काय? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी स्वत:च दिले आहे - "असे म्हणतात की रशियातील हुकुमशाहीने नेत्रदीपक यश मिळविले आहे. ते नाकारण्याचा प्रश्नच नाही; म्हणूनच मी तर म्हणतो की सर्व मागासलेल्या देशांसाठी अशी हुकुमशाही चांगली राहील. याचा अर्थ असा मात्र नाही की कायम टिकणारी हुकुमशाही समर्थनीय ठरते. केवळ आर्थिक मूल्ये हीच मानवजातीची एकमेव गरज नसून तिला उदात्त मूल्यांचाही आधार हवा असतो, तथापि अशा मूल्यांकडे स्थायी हुकुमशाहीने कधी लक्ष दिलेले नाही आणि देण्याची चिन्हेही दिसत नाहीत. समतेचे उद्दिष्ट समोर ठेवले म्हणून आम्ही रशियन क्रांती स्वागतार्ह मानतो, पण समता स्थापन करताना बंधुता आणि स्वातंत्र्य यांचा बळी देणे कधीही समाजहिताचे ठरत नाही." भांडवलशाहीतील विषमता आणि शोषण याबाबत त्यांनी आधीच धोक्याचा इशारा दिला होता. जर विकासाचे हे दोन्ही मार्ग नाकारले तर एकच मार्ग उरतो, तो म्हणजे सांसदीय लोकशाहीच्या चौकटीत प्रस्थापित केला जाणारा

राज्य-समाजवाद. सांसदीय लोकशाहीमध्येही बहुमताच्या आधारावर आधीचे निर्णय फिरविले जातात आणि नवीन निर्णय घेतले जातात याची पूर्ण जाणीव डॉ. आंबेडकरांना होती. सांसदीय लोकशाहीच्या कमकुवत बाजूंची दखल घेतांना ते म्हणतात की, या प्रणालीबद्दल समाधानी असणारे देश क्वचितच सापडतील; हे असे का आहे हा प्रश्न (विशेषत: ही प्रणाली स्वीकारण्याच्या तयारीत असलेल्या भारतासारख्या देशाने) जरुर विचारात घ्यायला हवा. 'निधड्या छातीच्या एखाद्या व्यक्तीने तरी भारतीयांना हे सांगणे आवश्यक आहे की सांसदीय लोकशाहीपासून सावधान! ती जितकी चांगली वाटत होती तशी प्रत्यक्षात नाही'. राज्य-समाजवादाचा समावेश भारतीय संविधानात घटनात्मक कायद्यानेच करण्यात यावा याबाबत डॉ. आंबेडकर आग्रही का होते याचे स्पष्टीकरण याठिकाणी मिळते. असे केले तरच या संरचनेत पुढील काळात कोणी ढवळाढवळ करु शकणार नाही याची हमी त्यांना आवश्यक वाटत होती. प्रत्यक्षात आपण 'समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट' समोर ठेवून 'लोकशाही समाजवाद' अंमलात आणला. आज त्याची कशी वाताहत झाली आहे ते आपण जाणतोच. विकासासोबत स्वातंत्र्य आणि समता हे उद्दिष्ट डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने इतके मौलिक होते (तेच राज्य-समाजवादाचे प्रयोजन होते) की त्याला संविधानाच्या अंगभूत बाबींमध्ये समाविष्ट करुन स्थायी स्वरुप देण्याचा त्यांचा प्रयत्न होता; दुर्दैवाने तो यशस्वी ठरला नाही. थोडक्यात, अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादकतेची उच्च पातळी साध्य करण्यासाठी शासनाकडे प्रमुख भूमिका देणे व खाजगी क्षेत्राचे माफक योगदान घेणे, तसेच हे करताना संपत्तीच्या समन्यायी वितरणाची तरतूद करणे यासाठी राज्य-समाजवाद होता.

**राज्य-समाजवादाची व्याप्ती:**

डॉ. आंबेडकरांच्या पुस्तिकेवरुन राज्य-समाजवादाची तपशीलवार रचना जरी स्पष्ट होत नसली तरी या आर्थिक संरचनेची चौकट लक्षात येते. त्यामध्ये त्यांनी उद्योग क्षेत्र, शेतीचे क्षेत्र आणि विमा यामध्ये शासनाची भूमिका कशी असेल याची रुपरेषा दिली आहे.

**औद्योगिक क्षेत्र:**

औद्योगीकरण हा देशाच्या मागासलेपणावरील उपाय असला तरी ते कशा पद्धतीने होते याचाही विचार करायला हवा. आर्थिक शोषण, विषमता, ग्रामीण-शहरी तफावत यांना चालना देणाऱ्या औद्योगीकरणातून अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. म्हणूनच या प्रक्रियेमध्ये शासनाचा पुढाकार आणि नियोजन यांची गरज असते. डॉ. आंबेडकर म्हणतात की, जे उद्योग आधारभूत आहेत किंवा तसे ठरविण्यात येतील त्यांची मालकी व संचालन शासनाच्या हाती असावे. त्याशिवाय जे उद्योग मूलभूत स्वरुपाचे असतील त्यांचीही मालकी शासनाकडे असावी, आणि त्यांचे संचालन शासनाने स्वत: करावे किंवा त्यासाठी स्थापन केलेल्या महामंडळांनी करावे. या दोन गटांमध्ये कोण-कोणत्या उद्योगांचा समावेश करावा, तसेच उर्वरित उद्योगांबाबत धोरण कसे असावे याचा स्पष्ट उल्लेख पुस्तिकेत नाही; तथापि 'औद्योगिक क्षेत्रामध्ये सौम्य राज्य-समाजवाद असावा' असे म्हटले आहे. याचा अर्थ असा की आधारभूत आणि मूलभूत उद्योग वगळता इतर उद्योगांमध्ये खाजगी संघटकांना संधी देणे

डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असावे. खाजगी क्षेत्राच्या 'माफक योगदाना'चाही उल्लेख यापूर्वी झाला आहे.

पुढील काळात भारताचे पहिले दीर्घकालीन औद्योगिक धोरण (१९५६) जाहीर झाले. त्यामध्ये 'अ' सूचीमधील १७ उद्योग शासकीय नियंत्रणाखाली ठेवण्यात आले होते. 'ब'सूचीमधील १२ उद्योग उत्तरोत्तर शासनाच्या हाती आणण्याचे धोरण असले तरी त्यामध्ये खाजगी क्षेत्रासाठी पूरक स्वरुपाची भूमिका ठेवलेली होती. 'क' सूचीमध्ये उर्वरित उद्योगांचा समावेश करुन तेथे खाजगी क्षेत्राला वाव देण्यात आला होता. हे औद्योगिक वर्गीकरण डॉ. आंबेडकरांच्या रचनेतील वर्गीकरणाशी जुळणारे आहे असे प्रथमदर्शनी वाटते, पण ते तसे नव्हते. १९५६ च्या धोरणाचा संबंध मिश्र अर्थव्यवस्थेशी होता; या संरचनेमध्ये सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांना 'एकाच यंत्रणेचे दोन भाग' किंवा रथाची दोन चाके मानले गेले होते. शिवाय १९५६ च्या धोरणातील वर्गीकरण अलवचिक नसल्याने त्यात नियोजनाच्या गरजांनुसार बदल करणेही शक्य होते. त्याबाबत प्रा. गुनार मिर्डल म्हणतात, "भारतात गतकाळात काय घडले याचा परखडपणे विचार केला तर स्पष्टपणे दिसते की, सार्वजनिक उद्योग व खाजगी उद्योग हे औद्योगिक धोरणाने निश्चित केलेल्या प्रवर्गात कायम राहिले नाहीत." कालांतराने आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेमध्ये तर हा लोकशाही समाजवाद अक्षरशः वाहून गेला. असे होऊ नये यासाठीच डॉ. आंबेडकरांचा आग्रह होता की राज्य-समाजवादाची संरचना संविधानाचा अंगभूत भाग म्हणून अस्तित्वात यावी. त्यांची संरचना मिश्र अर्थव्यवस्था नसून सांसदीय लोकशाहीच्या चौकटीतील समाजवादाची होती. राज्य-समाजवादाचा विचार हा वामपंथी नसला तरी डावीकडे झुकणारा होता हे निश्चित. (हा मुद्दा शेतीविषयक तरतुदींवरुन पुरेसा स्पष्ट होईल.)

**शेतीचे क्षेत्रः**

भारतीय शेतीच्या तत्कालीन दुरावस्थेची पूर्ण जाणीव असलेल्या डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादामध्ये शेतीला सर्वाधिक महत्वाचे स्थान देत 'शेती हा राज्य उद्योग असेल' असे स्पष्टपणे घोषित केले. शेतीमधील प्रचलित भूमीसुधारणा अयोग्य वाटत असल्यामुळे त्यांनी शेती-संघटनाची वेगळी पद्धत सुचविली. 'राज्याची मालकी असलेल्या शेतीमध्ये सामुदायिक पद्धतीची लागवड आणि उद्योगांमध्ये सौम्य स्वरुपाचा राज्य-समाजवाद' हा त्यांच्या आर्थिक संरचनेचा कणा होता. सामुदायिक शेती कशी अंमलात आणावी याचा मुद्देसूद विचार त्यांनी पुढीलप्रमाणे मांडला होता.

१) शासनाने अधिग्रहित केलेल्या जमिनीचे प्रमाणित आकाराचे भाग पाडून ते कुळांना देण्यात यावेत. खेड्यातील कुटुंबांचे गट हेच कूळ असतील व त्यांना विशिष्ट अटींनुसार लागवड करता येईल. या अटी म्हणजे, लागवड सामुदायिक पद्धतीनेच करावी लागेल व ती करताना शासकीय नियम आणि निर्देश यांचे पालन करावे लागेल; अशा शेतांवर लागू असलेले सर्व प्रभार चुकते केल्यानंतरच कुळांना उर्वरित उत्पन्न आपसात वाटून घेता येईल.

२) कुळांना जमीन लागवडीसाठी देताना जात किंवा पंथ अशा आधारावर कोणताही

भेदभाव केला जाऊ नये, तसेच हे वाटप अशा पद्धतीने करावे की सर्वजण समान दर्जाचे राहतील (म्हणजे जमीनदार, कूळ, भूमीहीन मजूर अशा स्थितीचा विचार करु नये)

३) सामुदायिक शेतांच्या लागवडीसाठी आवश्यक अशी खते, बियाणे, अवजारे, सिंचनसुविधा इत्यादींसाठी संसाधने उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी असेल.

४) शासनाने या शेतांना पुरविलेल्या भांडवली वस्तूंबद्दल आणि जमीन महसुलासारख्या अन्य घटकांसाठी प्रभार लागू करण्याचा अधिकार शासनाला राहील. जर कुळांनी निर्धारित अटींचा भंग केला, संसाधनांचा गैरवापर केला, किंवा एकूणच या योजनेला बाधक असे कृत्य केले तर शासन त्यांच्याकडून दंड वसूल करु शकेल किंवा यथोचित कारवाई करु शकेल.

डॉ. आंबेडकरांची उपरोक्त योजना सरंजामी मानसिकतेला मानवणारी नव्हती. त्याऐवजी संस्थात्मक भूमीसुधारणांसारखे जे मार्ग आपण निवडले त्यातून शेतीचे प्रश्न कितपत सुटले याचाही विचार व्हायला हवा.

विम्याचे क्षेत्रः

भारतातील सर्व प्रौढ व्यक्तींसाठी आयुर्विमा अनिवार्य असावा आणि या क्षेत्रात शासकीय एकाधिकार असावा असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यांनी ग्रामीण भारतातील सर्वसामान्य व्यक्तींचे हालअपेष्टांनी भरलेले आयुष्य पाहिले होते. रोजच्या उदरनिर्वाहाचीही शाश्वती नसलेल्या या व्यक्तींसाठी 'सामाजिक सुरक्षा' मृगजळासारखी होती. अशा लोकांना निदान त्यांच्या अल्प-स्वल्प प्राप्तीशी प्रमाणशीर असे विम्याचे कवच मिळणे अत्यावश्यक असूनही त्यासाठी खाजगी विमा कंपन्या पुढे आल्या नसत्या. म्हणूनच ही जबाबदारी शासनाने घ्यायला हवी होती. या तरतुदीमुळे व्यक्तींप्रमाणे शासनाचाही फायदा झाला असता, कारण विम्याच्या हप्त्याची जमा होणारी रक्कम विकासकार्यासाठी वापरुन सार्वजनिक ऋणाचा भार कमी करता आला असता.

थोडक्यात, राज्य-समाजवादाची आर्थिक संरचना लोकशाहीच्या चौकटीबाहेर न जाता शासनाच्या लक्षणीय पुढाकारावर भर देणारी होती. शेतीच्या विकासातील अडचणी, तसेच लक्षावधी भूमीहीनांची दुर्दशा पाहता या रचनेत सामुदायिक शेतीचा पुरस्कार केला होता. औद्योगिक प्रगतीसाठी शासनाने पुढे येणे व खाजगी संघटकांचा मर्यादित सहभाग असणे अपेक्षित होते. विम्यामध्ये शासनालाच एकाधिकार देऊन सर्वसामान्यांना सामाजिक सुरक्षेचे कवच प्रदान करण्याचा प्रयत्नही त्यात होता.

## भारतातील वस्तुस्थिती आणि राज्य-समाजवाद :

स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये गतिमान आर्थिक विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारण्यात आली. या संरचनेतील काही बाबी समाजवादाचा आभास देणाऱ्या असल्या तरी डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारी ही रचना नव्हती. राज्य-समाजवादाचा गाभा असणाऱ्या दोन तरतुदी आपण लागू केल्या नाहीत. एक म्हणजे, जमिनीवर शासनाची मालकी व लागवडीची सामुदायिक पद्धत. दुसरी म्हणजे, भविष्यकाळात राज्य-समाजवादाच्या तरतुदी विधीमंडळातील सोयीस्कर

बहुमताच्या आधारावर बदलणे कोणत्याही शासनाला शक्य होऊ नये म्हणून त्यांना संविधानाचा अंगभूत भाग करणे (घटनात्मक कायद्याद्वारे) डॉ. आंबेडकरांचे हे 'जहाल' उपाय न रुचल्यामुळे त्याकाळी लोकशाही समाजवाद आला. कालांतराने तोही मागे पडला व आज तर आपण जागतिकीकरणाच्या अंतर्गत अधिकाधिक आर्थिक स्वातंत्र्य आणि शासनाचा किमान हस्तक्षेप याकडे वाटचाल करीत आहोत. मूलतः लोकशाही प्रणालीमधील 'स्वातंत्र्य' या उदात्त तत्वाचा अर्थ काय आणि त्याची व्याप्ती किती? डॉ. आंबेडकरांनी, जे स्वतः स्वातंत्र्य-समता-बंधुता यासाठी जन्मभर झिजले, एका ठिकाणी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे - ''शासनाचा किमान हस्तक्षेप म्हणजे स्वातंत्र्य हे रुढ समीकरण ठीक आहे, पण हे स्वातंत्र्य कोणाला? (भारताच्या सामाजिक - अर्थप्रणालीत) स्वातंत्र्य या शब्दाचा अर्थ जमीनदारांना खंड वाढविण्याची मुभा आणि भांडवलदारांना इतरांची पिळवणूक करण्याची मोकळीक! सर्वसामान्य लोकांसाठी तर हे स्वातंत्र्य म्हणजे मृगजळच असते. शासनाच्या नियंत्रणापासून मुक्ती देणाऱ्या या स्वातंत्र्याचे दुसरे नाव खाजगी मालकवर्गाची हुकुमशाही हेच असते.'' या वस्तुस्थितीदर्शक बिनतोड युक्तिवादाचा प्रतिवाद करणे तेव्हा जितके शक्य नव्हते तितकेच आजही नाही. आता तर या 'मालक वर्गात' विदेशी भांडवलदार आणि विशाल कंपन्यांनाही आमंत्रित केले जात आहे.

आपण विकासाचा जो मार्ग निवडला त्याच्या निष्पत्तीवर एक ओझरता दृष्टिक्षेप टाकणे अस्थानी होणार नाही. गेल्या ६०-६५ वर्षांच्या कालावधीत विकासाची आधारभूत संरचना प्रस्थापित झाली आहे. औद्योगिक विविधता लक्षणीय असून उत्पादन वाढते आहे. हरित क्रांतीने शेतीची उत्पादकता वाढविली आणि अन्नधान्यांच्या उत्पादनात स्वावलंबन आले. विदेशी व्यापाराची वाढ, बरेच आयात प्रतिस्थापन, आधुनिक वैद्यकीय सोयी, वाढते आधुनिकीकरण, संरक्षणाची मजबूत तयारी, उच्चशिक्षणाची वाढ, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विस्मयकारक प्रगती इत्यादी घटक आपल्या देशाची अभिमानास्पद कामगिरी दर्शविणारे असून भारताचे जागतिक क्षेत्रातील स्थान निश्चितच उंचावले आहे. या गौरवास्पद उपलब्धी विचारात घेत असताना दुसऱ्या बाजूला जी अस्वस्थ करणारी वस्तूस्थिती आहे तिचाही उल्लेख करायला हवा-

१) वास्तविक विकास सूचित करणारा मानव - विकास निर्देशांक इतरांच्या तुलनेत भारतामध्ये बराच कमी आहे.

२) हरित क्रांती झाली असली तरी देशाला जगविणारी शेती, शेतकरी व शेतमजूर दुरावस्थेत आहेत. १९९५ ते २०१४ या कालावधीत तीन लाखांवर वैफल्यग्रस्त कास्तकारांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले.

३) बहुतांश सोयी-सुविधा नागरी भागात केंद्रित असून ग्रामीण भागात मात्र आधारभूत संरचना व मूलभूत सोयींची कमतरता आहे. प्रादेशिक विषमतेसोबतच ग्रामीण नागरी तफावत गंभीर होते आहे.

४) कोणताही आधार स्वीकारला (प्रा. लकडावाला किंवा प्रा. तेंडुलकर) तरी दारिद्र्याचे वास्तव नाकारता येत नाही.

एकीकडे विक्रमी धान्योत्पादन तर दुसरीकडे कुपोषण अशी आज स्थिती आहे.

डॉ. आंबेडकरांनी सर्वोच्च प्राधान्य दिलेल्या शेतीमधील वस्तुस्थितीचा आपण सखोल शोध घ्यायला हवा. आर्थिक विकासाची प्रक्रिया जस-जशी पुढे जाते तस-तसे शेतीक्षेत्राचे महत्व कमी होत जाणे स्वाभाविक मानले जाते. भारतामध्येही राष्ट्रीय उत्पन्न, निर्यात यासारख्या घटकांमधील शेतीचे योगदान कमी होत गेले आहे, परंतु अद्यापही जवळपास ६० प्रतिशत कार्यकारी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. देशाची अन्नधान्याची गरज पूर्ण करणारा शेती हा जवळपास एकमेव व्यवसाय असलेल्या ग्रामीण भागात ६८.८ प्रतिशत लोकसंख्या राहते. पूर्वीपासून समस्याग्रस्त असलेल्या शेतीच्या अडचणींमध्ये आता पर्यावरणीय असंतुलन, जागतिक स्पर्धेचे परिणाम यासारख्या संकटांची भर पडली आहे. सामुदायिक शेतीमुळे आपला शेतकरी निरनिराळ्या समस्यांवर मात करु शकेल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते; त्याऐवजी आपण संस्थात्मक भूमीसुधारणा, सहकारी शेतीला चालना असे मार्ग स्वीकारले. त्यातून शेती व शेतकरी सक्षम झाले का? आजही अकिफायतशीर धारणक्षेत्रांची समस्या कायम आहे. देशातील ८५ प्रतिशत धारणक्षेत्रे दोन हेक्टर पेक्षा कमी आकाराची असून, लागवडीतील तंत्रात्मक सुधारणांमागे लागलेले अल्पभूधारक ऋणग्रस्ततेच्या दलदलीत फसले आहेत. शेतमजुरांच्या प्रमाणात वाढ होत असून त्यांना जगण्याचा शाश्वत आधार उपलब्ध नाही. अद्यापही भांडवलाची कमतरता असलेल्या शेतीमध्ये कायम स्वरुपाच्या सुधारणा करुन उत्पादकता वाढविणे कठीण ठरते. या क्षेत्रावर लोकसंख्येचा ताण तर जाणवतो, पण रोजगाराच्या पुरेशा संधी नाहीत. १९१८ मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात (भारतातील छोट्या धारण क्षेत्रांची समस्या) डॉ. आंबेडकरांनी शेतीच्या ज्या प्रश्नांची चर्चा केली होती तेच प्रश्न आजही चर्चेत आहेत! सामुदायिक शेतीला नकार देऊन आपण जो संस्थात्मक भूमीसुधारणांचा मार्ग निवडला त्याबद्दल ते म्हणाले होते - ''धारणक्षेत्रांचे एकत्रीकरण आणि कूळविषयक कायदे हे निरर्थक उपाय आहेत. ते शेतीमध्ये सुबत्ता आणू शकत नाहीत. आज शेतीमध्ये राबणारे जे ६ कोटी अस्पृश्य भूमीहीन मजूर आहेत त्यांच्यासाठी तर हे उपाय पूर्णपणे निरुपयोगी आहेत.''

भारतामध्ये सामुदायिक शेतीपद्धतीला विरोध झाला याचे एक कारण हे होते की, तत्कालीन प्रभावी गटांचे हितसंबंध शेतीमध्ये गुंतलेले होते. नीहित स्वार्थ असलेल्या गटांना दुखवून शासन करता येत नाही हे आज जितके खरे आहे तितकेच तेव्हाही होते. आपण स्वीकारलेल्या सांसदीय लोकशाहीची ही कमजोर बाजू आहे. एका व्यापक संदर्भात डॉ. आंबेडकरांनी त्यावर नेमके बोट ठेवले होते. त्यांच्या मते, प्रस्थापित व्यवस्थेमध्ये किंवा समाजजीवनाच्या संहितेमध्ये हस्तक्षेप केल्याशिवाय प्रगती होत नसते; शासनाला असे बदल करणे शक्य असूनही नीहित हितसंबंधांमुळे ते केले जात नाहीत, कारण त्याला विरोध होण्याची धास्ती असते.

सामुदायिक शेतीच्या विरोधात दुसरा मुद्दा जमिनीबद्दलच्या आस्थेचा, म्हणजे तिच्या मालकी हक्काशी निगडित मानसिकतेचा होता. नैसर्गिक संसाधन असलेल्या जमिनीवरही कोणाची मालकी

असू शकते असे जरी मान्य केले तरी प्रश्न असा येतो की आपल्या 'मालकी'च्या उत्पादक साधनाला दुरावस्थेत ठेवून स्वतःचे दारिद्र्यही कायम ठेवणारी आस्था कोणत्या कामाची? डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने, अशा व्यक्तिवादी प्रवृत्ती कायम राहिल्या तर जमीनदारीसारख्या प्रथांचे उच्चाटन करुनही अर्थव्यवस्था मजबूत होणार नाही. वैयक्तिक कास्तकारी जर कायम केली तर सतत वाढत चाललेल्या लोकसंख्येला देण्याइतकी जमीन कोठून उपलब्ध होणार? अर्थात या मार्गाने शेतीचे नष्टचर्य संपणार नाही. भारतीय शेतकऱ्याचा जन्म, जगणे व मरणे कर्जातच असते अशी वाक्ये पिढया न् पिढया ऐकविण्यापेक्षा व्यक्तिवादाला मुरड घालून सामुदायिक शेतीचा स्वीकार करणे हा सूज्ञपणा ठरला असता. सांसदीय लोकशाहीच्या चौकटीमुळे याठिकाणी प्रेरणांचे दमन आणि नंतर अन्यत्र आलेली कुंठितावस्था यांचाही प्रश्न उद्भवला नसता.

राज्य-समाजवाद हे साधन असलेली डॉ. आंबेडकरांची विकासाची संकल्पना सुस्पष्ट होती. 'औद्योगीकरण हाच शेतीच्या समस्यांवरील खरा उपाय' असा विश्वास त्यांना असतांना, आज भारतात औद्योगीकरण होत असूनही शेती दुरावस्थेत आहे. या वास्तविकतेचे स्पष्टीकरण हेच आहे की आपण योजलेले उपाय आणि त्यांची अंमलबजावणी सदोष होती. मोजक्या शहरांमध्ये उद्योगांची गर्दी म्हणजे औद्योगीकरण नव्हे. शेतीप्रधान ग्रामीण भागातही विकासक्षम संसाधने आणि मनुष्यबळ उपलब्ध आहे याचा आपल्याला विसर पडला. वास्तविक विकासाची संकल्पना डॉ. आंबेडकरांच्या पुढील शब्दांमधून स्पष्ट होते -''भारताच्या औद्योगिक विकासालाच आपले साध्य मानणे पुरेसे होणार नाही; हा विकास सामाजिकदृष्ट्या इष्ट पातळीला कसा टिकवून ठेवता येईल याकडेही लक्ष द्यावे लागेल. भारतात अधिकाधिक संपत्ती निर्माण करण्यासाठी ताकद पणाला लावणेही पुरेसे ठरणार नाही; सन्मानजनक आयुष्य जगण्याचे साधन असलेल्या या संपत्तीत प्रत्येकाला वाटा मिळणे हा त्याचा मूळ अधिकार आहे याची जाणीव ठेवून सर्वांना सुरक्षिततेची शाश्वती देणारे उपायही योजावे लागतील.'' भारतात ज्या 'समावेशक विकासा'ची चर्चा अलिकडे होते आहे त्याचे सुस्पष्ट आणि मौलिक मार्गदर्शन डॉ. आंबेडकरांनी १९४३ मध्ये केले होते! या उद्दिष्टासाठी राजकीय लोकशाहीला सामाजिक-आर्थिक लोकशाहीची जोड देण्याबाबत ते आग्रही होते. तसे न करणे म्हणजे 'विसंगतीपूर्ण जीवनात प्रवेश करणे' असे त्यांना वाटत होते. भारतात आज दिसून येत असलेली विषमतेची स्थिती हेच ते विसंगतीपूर्ण जीवन होय.

### विकास-नीतीचे वास्तव:

आर्थिक विकासाच्या वाटचालीत आपण प्रथमतः नियोजित अर्थव्यवस्था स्वीकारली आणि नंतर मुक्त अर्थव्यवस्थेकडे वळलो. पहिल्या अवस्थेत शासनाचा पुढाकार असूनही आपण सामाजिक न्यायासह विकास का करु शकलो नाही? ही परिणती आधीच माहीत असल्यासारखे डॉ. आंबेडकर म्हणतात की नियोजित अर्थव्यवस्थेला स्थायित्व असल्याशिवाय ती यशस्वी ठरु शकत नाही. असे स्थायित्व एकवेळ स्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या हुकुमशाहीत मिळू शकते, पण 'बहुमता'च्या जोरावर (जे नेहमीच तर्कसंगत कारणांनी प्रभावित होणारे असेल असे नाही) नवीन कायदे करणाऱ्या

किंवा आधीचे रद्द करणाऱ्या सांसदीय लोकशाहीनामक प्रणालीत मिळू शकत नाही. ''ज्या लोकांना समाजाची आर्थिक संरचना समाजवादी प्रारुपानुसार घडविण्याची इच्छा असते त्यांनी हे लक्षात घ्यावे की इतके मौलिक उद्दिष्ट चंचलता असलेल्या प्रणालीच्या आधीन करुन चालत नाही. या अर्थाने, समाजवादी धोरणाचे स्थायित्व व यशस्विता हवी असेल तर त्यासाठी राजकीय लोकशाही अनुरुप वाटत नाही.'' (म्हणूनच सामाजिक-आर्थिक लोकशाहीची जोड देणाऱ्या राज्य-समाजवादाची तरतूद, न बदलता येणाऱ्या घटनात्मक कायद्याच्या रुपाने करणे आवश्यक होते). याचा अर्थ असा की आपला लोकशाही समाजवाद जागतिकीकरणाच्या लाटेत वाहून गेला नसता तरी अंगभूत विसंगतींनी कोसळला असता!

गेली पंचवीस वर्षे आपण मुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहोत. जागतिकीकरणाने प्रभावित या कालावधीत विकासाचा वेग वाढला, पण हा विकास रोजगारविरहित असल्याचे दिसते आहे. शहरांमध्ये नव-श्रीमंतवर्ग आणि त्याचा चंगळवाद वाढला, पण त्याचवेळी खेड्यांमध्ये शेतकरी-आत्महत्यांचे सत्रही सुरु झाले. जागतिकीकरण-प्रक्रियेची नकारात्मक बाजू आता अनेकांचे लक्ष वेधीत आहे. जागतिकीकरणाच्या प्रसाराला हातभार लावणाऱ्या जागतिक बँकेत कार्य केलेले अर्थशास्त्रज्ञ जोसेफ स्टिगलिट्झ म्हणतात,''जागतिक बँकेने तथाकथित वॉशिंग्टन-सहमती राबविणे आता पुरे झाले, त्यापेक्षा समता, सामाजिक न्याय व दारिद्र्य निर्मूलन यांना केंद्रीय स्थान देणारा विकासाचा तौलनिक दृष्टिकोन तिने विचारात घ्यायला हवा''. वास्तविक विकासासाठी मुक्त बाजारयंत्रणा आणावी की शासनाकडे प्रमुख भूमिका सोपवावी असा प्रश्न आता अप्रस्तुत ठरतो आहे; त्यापेक्षा या दोहोंमध्ये योग्य संतुलन कसे साध्य करता येईल (जे मिश्र अर्थव्यवस्थेत जमले नाही) यावर गंभीरपणे विचार केला जात आहे.

व्यापक संदर्भात विचार करता, ज्या ठिकाणी समाजवादी व्यवस्था लागू करण्यात आली तेथे शासनाची भूमिका किती प्रभावी असावी याचे तारतम्य न राहिल्यामुळे या रचनांनी हुकुमशाहीचे स्वरुप धारण केले. व्यक्तिस्वातंत्र्याचे प्रदीर्घकाळ दमन करणे शक्य होत नसल्याने, संधी मिळताच या देशांमध्ये असंतोषाचा उद्रेक झाला. दुसरी सोविएत क्रांती (पेरेस्त्रॉयका आणि ग्लासनॉस्त) या परिवर्तनाची सुरुवात होती. दुसऱ्या बाजूला, मुक्त अर्थव्यवस्थेची रचना निर्दोष कधीच नव्हती. प्रो. केन्स, शुंपीटर यांच्या सारख्यांनाही त्यांचे गांभीर्य जाणवले होते आणि कार्ल मार्क्स यांना त्यामध्येच या रचनेचा अंत दिसला. तथापि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या क्षमतेमुळे ती टिकून राहिली. जागतिकीकरण हे या व्यवस्थेचे नवीन रुप असले आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या दबावामुळे किंवा अन्य कारणांनी ते स्वीकारले गेले असले तरी त्यामधील विसंगतींबद्दल लोक अनभिज्ञ नाहीत. म्हणूनच या दोन प्रणालींमध्ये (मुक्त अर्थव्यवस्था आणि शासनप्रधान व्यवस्था) संतुलन साध्य करण्याचा विचार पुढे येतो आहे. अशा परिस्थितीत एक पर्याय म्हणून राज्य-समाजवादाकडे नव्या दृष्टीने पाहता येईल काय?

आर्थिक नियोजनाच्या यशस्वितेसाठी

अत्यावश्यक असणारे स्थायित्व शासनप्रधान व्यवस्थेत आहे, पण स्वातंत्र्य नाही आणि समतेचे आश्वासन असले तर प्रत्यक्षात एक वेगळीच विषमता तेथेही निर्माण झाली. मुक्त व्यवस्थेला वाव असणाऱ्या लोकशाहीत स्वातंत्र्य आहे, पण परिणामकारक नियोजनासाठी स्थायित्व नाही आणि येथेही समतेचे उद्दिष्ट तितकेच दूर आहे. डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तीनही तत्वे अमूल्य होती. स्वातंत्र्य आहे म्हणून, किंवा स्थायित्व मिळते म्हणून ते समतेशी तडतोड करण्याच्या पूर्णपणे विरुद्ध होते. या पेचातून त्यांनी काढलेला मार्ग राजकीय-सामाजिक-आर्थिक लोकशाहीचे एकत्रीकरण करणाऱ्या राज्य-समाजवादाचा होता. आपण उपरोक्त विवेचनात ज्या संतुलनाचा उल्लेख केला ते या पद्धतीत साध्य होण्याची त्यांना खात्री होती. भारताने मूळ रुपात राज्य-समाजवाद स्वीकारला असता तर तो जागतिकीकरणाच्या वातावरणात टिकला असता काय हा प्रश्न म्हणजे कल्पनाविलास ठरेल. आज राज्य-समाजवादसदृश संरचना लागू करणे शक्य आहे काय हा प्रश्न मात्र अप्रस्तुत ठरत नाही. डॉ. आंबेडकरांच्या लिखाणानंतर जवळपास ७० वर्षांचा काळ उलटला आहे. या काळात भारतीय अर्थव्यवस्थेत काही रचनात्मक बदल झाले आहेत. जागतिक क्षेत्रातही लक्षणीय परिवर्तन झाले. जागतिक अर्थकारणाची गणिते बदलली, विकासातील परावलंबित्व वाढले आणि धोरणे अंमलात आणतांना आंतरराष्ट्रीय राजकारणातील अनिवार्यतांकडे दुर्लक्ष करणे अवघड झाले. परंतु या मर्यादा केवळ भारतालाच जाणवणाऱ्या नसून इतर देशांनाही जाणवतात; तरीही त्यांच्यामधील काही देशांनी स्वतःची स्वतंत्र ओळख आणि स्वहित यांना प्राधान्य देऊन या मर्यादांवर मात केली. ते त्यापुढे अगतिक झाले नाहीत. या संदर्भात काही देशांमधील प्रयत्न लक्षणीय आहेत. जपानमध्ये अंमलात येणारी धोरणे सामाजिक कल्याणाला प्राथमिकता देणारी असून त्यासाठी शासन सक्रिय आहे आणि बाजारयंत्रणेचे कार्य सीमित ठेवण्यात आले आहे. चीन आणि भारताचा आर्थिक विकास जवळपास एकाचवेळी सुरु झाला, तरीही त्या देशाने पूर्वीपासूनच अनेक क्षेत्रांमध्ये भारतापेक्षा सरस कामगिरी नोंदविली आहे. अमेरिकेनंतरचा सर्वात प्रभावी देश अशी त्याची प्रतिमा आहे. आत्मनिर्भरतेच्या उद्दिष्टाला बाधा न येऊ देता चीनने बंदिस्तपणा बाजूला केला आणि थेट विदेशी गुंतवणुकीचा ओघ आकर्षित केला. जागतिक परिवर्तनाचा स्वीकार असा केला की विदेशी बाजारपेठांचा उपयोग करुन गंभीर अंतर्गत अडचणी सोडविता येतील. चीनच्या वैशिष्ट्यपूर्ण विकास-प्रारुपात खुल्या अर्थ-व्यवस्थेची सांगड आत्मनिर्भरतेशी घालताना अतिपरावलंबित्व टाळलेले आहे. तेथील साम्यवादी हुकुमशाहीचे समर्थन करण्याचा प्रश्नच नाही, परंतु डॉ.आंबेडकरांनी उल्लेखिलेले नियोजित अर्थव्यवस्थेचे स्थायित्व याच चौकटीत मिळाले हे सुद्धा नाकारता येणार नाही.

मूळ मुद्दा हा आहे की जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनिवार्यतांकडे बोट दाखवून प्रवाहपतित होण्यात अर्थ नाही. स्वतंत्र आणि सार्वभौम भारताला हे करणे अशक्य नसावे जे जपान व चीनने केले. ही पार्श्वभूमी, आणि बदललेले संदर्भ विचारात घेऊन राज्य-समाजवादसदृश संरचना प्रस्थापित करण्यावर गंभीरपणे विचार व्हायला हवा असे वाटते. मूळ

रुपातील राज्य-समाजवाद (बऱ्याच बदललेल्या परिस्थितीमुळे) लागू करणे शक्य होईल असे वाटत नाही, परंतु समतेचे जे उद्दिष्ट गेली सात दशके अपूर्ण आहे ते पूर्ण करण्यासाठी शासनाचा पुढाकार व निर्देशन यांची गरज आहे. नैसर्गिक संसाधनांचे जतन व पर्यावरण-रक्षण, जीवनोपयोगी शिक्षण व कौशल्य विकास, आरोग्य निगा, सामाजिक सुरक्षा यासारखी बरीच क्षेत्रे आहेत जेथे शासनाची भूमिका प्रभावी असायला हवी. शेती-शेतकरी-शेतमजूर यांची दुरावस्था हा तर ज्वलंत प्रश्न आहे. संस्थात्मक आणि तंत्रात्मक भूमीसुधारणा अंमलात आणून जर स्थिती बदलली नसेल तर काही कठोर उपाय आवश्यक ठरतात. राज्य-समाजवादात जमिनीवर शासकीय मालकी सुचविलेली होती; ते आजच्या परिस्थितीत शक्य वाटत नसल्याने निदान सामुदायिक शेतीच्या प्रस्तावाला समूह-शेतीचे रुप देता येईल. भारतातील धारणक्षेत्रांचे स्वरुप आणि भांडवलाची कमतरता यांच्या सद्यस्थितीत वैयक्तिक-कास्तकारीच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. डॉ. आंबेडकरांनी सुचविल्याप्रमाणे सोयी-संसाधनांची तरतूद शासनाने केली (अर्थात प्रभार लागू करुन) तर उत्पन्नात वाढ होऊ शकेल. आपण अजून किती शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वाट पाहणार आहोत? कर्जमाफी किंवा मदत हे आपत्कालीन उपाय आहेत; शेती व शेतकऱ्याला सक्षम करणे हाच एकमेव दीर्घकालीन उपाय असू शकतो. त्यासाठी शासनाची प्रभावी भूमिका आणि समूह-शेती यांना पर्याय दिसत नाही (निदान कंपनी शेती आणि करार शेती हे निश्चितच दीर्घकालीन फायद्याचे उपाय असू शकत नाहीत).

तात्पर्य, १९४७ नंतर भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये झालेले मोठे बदल विचारात घेऊनही राज्य-समाजवादाचा मूळ विचार कालबाह्य वाटत नाही. मुक्त प्रणाली आणि शासनप्रधान-प्रणाली यांच्या मर्यादा स्पष्टपणे जाणवत आहेत, आणि त्यांच्यातील संतुलनाचा विचार पुढे येतो आहे. भारताच्या वैचित्र्यपूर्ण परिस्थितीची पूर्ण जाणीव असणारी डॉ. आंबेडकरांची राज्य-समाजवादाची संकल्पना हे संतुलन देऊ शकते. अर्थात त्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती व सामाजिक न्यायाचा ध्यास घेतलेले नेतृत्व आणि ठाम निर्णय आवश्यक ठरतात.

**संदर्भसूची :**

(संदर्भांमध्ये उल्लेख केलेले खंड महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर - रायटींग्ज अँड स्पीचेस' या ग्रंथांशी संबंधित आहेत)

१. Government of Maharashtra, *Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches*, Vol. 1, 1989
२. तत्रैव, पृ. ४०८ व ४७७
३. खंड ३ (१९८७), पृ. ४६१-६२
४. खंड १० (१९९१), पृ. १०७
५. खंड १, पृ. ४०८
६. Gunnar Myrdal quoted in Datt, Gaurav and Mahajan, Ashwani, *Indian Economy*, 2013, p. 204
७. खंड १, पृ. ३९६
८. तत्रैव, पृ. ३९७
९. तत्रैव, पृ. ४१०
१०. तत्रैव, पृ. ४०८
११. खंड ६ (१९८९), पृ. २३३
१२. डॉ. कुबेर, वा.ना., *डॉ. आंबेडकर - विचारमंथन*, १९९८, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. २४२
१३. खंड १०, पृ. १०५

१४. खंड १, पृ. ४११

१५. Stiglitz, Joseph, *Quoted in Datt* -

*Mahajan*, op.cit. p.262

१६. तत्रैव, पृ. २०१

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## सभासद व संस्थांना आवाहन

स्व. जमनालाल बजाज उपक्रम

मा. जमनालाल बजाज कुटुंबियांनी दिलेल्या निधीतून दर वर्षी महाराष्ट्रात कोणत्याही एका शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने एक किंवा दोन दिवसांचा सदर उपक्रम राबविला जातो. विशेषकरून महात्मा गांधी यांच्या विचारांना मध्यवर्ती ठेऊन चर्चासत्र, परिसंवाद किंवा कार्यशाळा या स्वरुपात प्रस्तुत उपक्रम आयोजित केले जातात. याकरिता परिषदेच्या वतीने रु.५०००/- ची आर्थिक मदत प्रोत्साहन म्हणून आयोजन करणाऱ्या संस्थेला दिली जाते.

पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यान

कै. पां. वा. गाडगीळ हे परिषदेचे आजीव सदस्य होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे कुटुंबियांकडून दरवर्षी रु.५०००/- चा निधी उपलब्ध करून दिला जातो. महाराष्ट्रातील यजमान शैक्षणिक संस्थेच्या सहकार्याने नामवंत आर्थिक विचारवंताचे व्याख्यान आयोजित केले जाते.

डॉ. सुधा मोकाशी पुरस्कृत व्याख्यान

डॉ. सुधा मोकाशी यांच्या आर्थिक सहकार्यातून कार्यशाळा, चर्चासत्र, व्याख्यान महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात आयोजित केले जाते. त्यांच्या अपेक्षेनुसार मत्स्य व्यवसायासंबंधी विषयावर अशा उपक्रमाचे आयोजन केले जाते. याकरिता मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने रु.७,०००/-चे आर्थिक सहाय्य यजमान महाविद्यालयास दिले जाते.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सदस्यांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन आपल्या महाविद्यालयातून करण्याकरिता मागणी प्रस्ताव कार्यवाहांकडे पाठवावेत. परिषदेचे विविध उपक्रम आपल्या सहकार्यानेच यशस्वीपणे राबविले जावू शकतात.

- कार्यवाह खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# जल व्यवस्थापनातील डॉ.आंबेडकरांचे योगदान

**गायकवाड माधव मुरहारी**, औरंगाबाद,
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
स.भु.कला वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४०३९२१४१५

बहुआयामी व्यक्तिमत्व असणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची शतकोत्तर रौप्य महोत्सवी (१२५ वी) जयंती जगभर दिमाखात साजरी होत असताना त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचा पुन्हा नव्याने अर्थ लावण्याचा प्रयत्न केला जात आहे, ही बाब निश्चितच गौरवास्पद आहे. डॉ.आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दीन, दलित, शोषित, पिडीत, शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला इ. जनांचे तारणहार (मसिहा) तर होतेच. त्याहीशिवाय ते इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, शिक्षणशास्त्र, भाषाशास्त्र, कायदाशास्त्र, कृषीशास्त्र इ. ज्ञानशाखांचे निष्णांत पंडीतही होते. याच विषयात त्यांनी एम.ए., पीएच.डी. आणि डॉक्टर ऑफ सायन्स इ. प्रतिष्ठेच्या पदव्या विश्वातील वेगवेगळ्या विद्यापीठातून मिळविल्या.

ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि इस्ट इंडिया कंपनी, इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया, दि प्रॉब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिन ॲन्ड सोल्युशन, स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज, स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया ॲन्ड देअर रेमिडीज इ. त्यांचे बहुचर्चित अर्थशास्त्रीय ग्रंथ. या ग्रंथातून त्यांनी ब्रिटिशकालीन भारताची वित्तीय स्थिती, चलन व्यवस्था, केंद्र राज्य वित्तिय संबंध, त्याच बरोबर भारताच्या इतर आर्थिक व सामाजिक समस्या, त्या समस्यांची कारणमीमांसा व समस्या निराकरणासाठी उपाय योजनाही सूचविल्या, असे जरी असले तरी राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी अत्यावश्यक असणाऱ्या सिंचन, विद्युत शक्ती व जलवाहतूक या पायाभूत सुविधांच्या संदर्भातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले कार्य आणि मांडलेले विचार दुर्लक्षितच राहिलेले होते. पण डॉ. सुखदेव थोरात यांनी जानेवारी १९९८ मध्ये 'आंबेडकरस् रोल इन इकॉनॉमिक प्लॅनिंग ॲन्ड वॉटर पॉलिसी' हा ग्रंथ प्रकाशित करुन ही बाब सप्रमाण प्रकाशात आणली.

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात जागतिक स्तरावर अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे जगातील अनेक राष्ट्रात पुनर्रचना आणि पुनर्वसनासाठी वेगवेगळ्या योजना आखल्या जात होत्या. भारतही याला अपवाद नव्हता पण भारतीय योजना मात्र पुनर्वसनाबरोबरच आर्थिक विकासाची सुध्दा होती. भारतीय पुनर्रचना आणि आर्थिक विकास योजनेमध्ये समन्वय व सर्वसमावेशकता आणि अधिकाधिक संतुलितपणा आणण्यासाठी सरकारने धोरण व कृती योजना ठरविण्यासाठी तीन समित्यांची स्थापना केली. १) पुनर्रचना समिती परिषद (रिकन्स्ट्रक्शन कमिटी कौन्सिल) (आर.सी.सी.) २)पुनर्रचना धोरण समिती (रिकन्स्ट्रक्शन पॉलिसी कमिटी), आणि ३) कार्यालयीन समिती इ. दीर्घकालीन नियोजनात्मक निर्णय घेण्यासाठी धोरण समिती व कार्यालयीन समितीला आर.सी.सी.ची मंजुरी घेणे आवश्यक होते.

इ.स.१९४२ ते १९४६ या दरम्यानच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असल्याकारणाने ते आर.सी.सी. चे देखील सदस्य होते. व्हाइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये त्यांच्याकडे श्रमविभागाचा प्रभार होता. आर.सी.सी.ने श्रमविभागाकडे सिंचन विद्युत शक्ती आणि जलविद्युत या विषयीच्या कामाची जबाबदारी सोपविल्याने या विभागाच्या धोरण समितीचे अध्यक्षपद आपोआपच डॉ. आंबेडकरांकडे चालून आले. या कार्यकाळात त्यांनी सिंचन, विद्युतशक्ती, जलविद्युत आणि जलवाहतूकी संदर्भात केलेल्या कार्याचा, घेतलेल्या निर्णयाचा आणि आखलेल्या व्युहरचनेचा आढावा या लेखात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

''जल व्यवस्थापन म्हणजे अशी कार्यप्रणाली ज्यामध्ये पाण्याचे नियोजन, त्याचा विकास, वितरण आणि जलसंसाधनाचा सुयोग्य वापर अभिप्रेत असतो. ज्या अंतर्गत जलसंवर्धन, सांडपाणी किंवा दुषित पाण्याचे शुध्दीकरण, उपलब्ध पाण्याचे न्याय वितरण व पुरापासून संरक्षण इ. बाबींचा समावेश होतो'' जल व्यवस्थापनाची ही व्याख्या विचारात घेता स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय जलसंपत्तीचे व्यवस्थापन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कसे केले होते हे पुढील बाबींवरुन स्पष्ट होते.

औद्योगिक विकासासाठी स्वस्त व विपूल प्रमाणात विद्युत पुरवठा आवश्यक असतो तर स्वस्त विद्युत निर्मितीसाठी सिंचनाचा विकास अनिवार्य ठरतो. सिंचन विकासातून कृषी विकास व जलवाहतूकीचा विकास होत असल्याने आर्थिक विकास प्रक्रियेचे मूळ पाण्याची उपलब्धता, त्याचे संवर्धन व त्याचा वापर यावर अवलंबून असते. ''अतिरिक्त पाणी ही समस्या होवू शकत नाही'' या गृहितकृत्यावर आधारित श्रम विभागाने (डॉ.आंबेडकर अध्यक्ष) जल आणि शक्ती साधनांच्या विकासासाठी अभ्यास व चर्चा करुन नवीन जलनीति व विद्युत धोरणाचा आराखडा तयार केला. त्यात बाबासाहेब लिहितात, ''जल सिंचन, जलमार्ग आणि विद्युत शक्तीचा विकास हे देशातील औद्योगिक आणि शेती विकासाचे मूळ आधार आहेत. देशातील लोकांचे वैभव आणि त्यांना होणारा अन्नाचा पुरवठा हा प्रत्यक्षरित्या जलसिंचनाचा विस्तार, मृदसंवर्धन आणि पूरनियंत्रणावर अवलंबून असतात.''

भारतीय भूपृष्ठरचना व या भूभागावरुन

वाहणाऱ्या नद्यांचा बारकाईने अभ्यास केला असता त्यांना असे आढळून आले की, उत्तर भारतातील ८०% नैसर्गिक पाणी हिमालयीन नद्यांमधून तर दक्षिण भारतातील ९०% पाणी दख्खनच्या पठारावरील नद्यांमधून वाहून जाते. एवढेच नव्हे तर या मोसमी वाहणाऱ्या नद्यांच्या पुरामुळे अनेक राज्यातील लोकांचे जनजीवन विस्कळीत होते ही बाब विचारात घेवून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ओरिसा, बिहार, प.बंगाल, उत्तर प्रदेश, (झारखंड), हिमाचल प्रदेश व मध्यप्रदेशातील सर्व नदीखोऱ्यांचा विकास करुन योजना आखली. ही योजना तीन सूत्रावर आधारलेली होती.

(१) जलसंसाधन विकास करण्यासाठी नदी खोरे (पाणलोट) क्षेत्र हा आधार मानून सिंचन योजनांचे नियोजन करताना बहुउद्देशिय दृष्टिकोन ठेवला पाहिजे. उदा. शेती सिंचन, पिण्यासाठी पाणी, जलवाहतूक, वीजनिर्मिती, पूर नियंत्रण, मृदसंवर्धन व काही पाणी उद्योगासाठी ठेवणे ही उद्दिष्टे असली पाहिजेत.

(२) जल प्रकल्प राबविण्यासाठी पाणलोट क्षेत्र प्राधिकरण अशी प्रशासकीय प्रणाली असावी. उदा. दामोदर खोरे प्राधिकरण, भाक्रा नानगल प्राधिकरण, गोदावरी खोरे प्राधिकरण इ.

(३) सिंचन व ऊर्जा निर्मिती संबंधात सर्वे व संशोधन करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर सेंट्रल वाटरवेज, इरिगेशन अॅन्ड नेव्हीगेशन कमिशन व केन्द्रीय तांत्रिक वीज मंडळ असावे इ.

उत्तर भारतातील नद्या व नद्यांमुळे होणारा विध्वंस विचारात घेवून डॉ.आंबेडकरांनी या राष्ट्रीय संपत्तीचे विनियोजन पर्याप्त रितीने कसे होईल? यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन योजना आखली. दीर्घकालीन योजनेत त्यांनी पुढील घटकांचा अंतर्भाव केला.

(१) जलसिंचन विकास, मृदेची होणारी झीज विरोधी उपाय, भू-सुधारणा आणि इतर उपायांच्या सहाय्याने शेतीत सुधारणा करणे.

(२) शेती आणि उद्योग विकासासाठी उपसा सिंचन आणि ग्रामीण उद्योगासाठी विद्युत शक्तीचा विकास करणे इ. थोडक्यात राष्ट्र विकासासाठी सिंचन आणि विद्युत निर्मिती कशी अनिवार्य आहे हे स्पष्ट केले.

उत्तर भारतातील नद्यांच्या पुराने होणारे नुकसान कसे टाळता येईल या संदर्भात शिफारशी करण्यासाठी अनेक समित्या नेमल्या गेल्या होत्या. पण या समित्यांनी नुकसान कसे टाळता येईल एवढ्याच शिफारशी केल्या. डॉ.आंबेडकरांनी या सर्व शिफारशींचा अभ्यास करुन त्या नाकारल्या कारण या शिफारशींचे स्वरुप एक उद्देशिय होते. 'पूर नियंत्रण' या एक उद्देशीय दृष्टिकोनावर त्यांचा विश्वास होता. हा दृष्टिकोन डॉ.आंबेडकरांनी बहुउद्देशिय दृष्टिकोनात परावर्तीत केला. ते आपला बहुउद्देशिय दृष्टिकोन स्पष्ट करताना लिहितात ''जनतेच्या भल्यासाठी जर पाण्याचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक असेल तर नदीकिनारे बंदिस्त करण्याचा विचार गैर ठरतो. या संदर्भात विकसित देशांनी अंगीकारलेला मार्गच योग्य आहे आणि तो म्हणजे विविध ठिकाणी पाण्याचे जतन करणे आणि त्याचा बहुउद्देशिय वापर करणे. अशा पाण्याचा धरणे बांधून जलसिंचनाशिवाय विद्युतशक्ती निर्माण करण्यासाठी आणि जल वाहतुकीसाठी वापर करता येतो.'' एवढेच नव्हे

तर त्यांनी दामोदर नदी खोरे प्रकल्प, हिराकूड नदी प्रकल्प, भाक्रानानगल प्रकल्प, सोन नदी प्रकल्प इ. प्रकल्पांची बहुउद्देशिय योजना आखली व कार्यवाहीतही आणली.

(अ)दामोदर खोरे प्रकल्प:

दामोदर नदी बिहार राज्यात उगम पावते. ही नदी २४० कि.मी. बिहार राज्यात तर ५० कि.मी. प.बंगाल या राज्यातून वाहते. बिहारमध्ये या नदीचा प्रवाह अत्यंत वेगवान आणि तीव्र असल्याने जमिनीची झीज होवून उपजावू मातीचा गाळ वाहुन जातो तर प.बंगालमध्ये ती संथ गतीने वाहत असल्याने पुराची तीव्रता वाढून विध्वंस होतो म्हणून या प्रदेशात या नदीला दु:खदायीनी म्हणून ओळखले जात होते. प.बंगाल सरकारने हा विध्वंस टाळण्यासाठी उपाय योजना करण्याची मागणी केन्द्र सरकारकडे केली. त्यामुळे हा विषय डॉ.आंबेडकरांकडे आला. डॉ.आंबेडकरांनी या नदी संदर्भात विविध प्रतिनिधीं सोबत तीन परिषदा घेतल्या. पहिल्या परिषदेत ते म्हणतात, ''या योजनेचे स्वरुप बहुउद्देशिय असावे, ज्यामध्ये सिंचन पूर नियंत्रण, जल विद्युत उर्जा, कोळसा वाफेची ऊर्जा, नौकानयन आणि जमिनीची झीज यावर नियंत्रण राहिल. तिसऱ्या परिषदेत राज्य व केन्द्र सरकारच्या प्रतिनिधींनी मान्यता दिल्यानंतर टेनान्सी नदीच्या धर्तीवर भारतात १९४४ मध्ये दामोदर बहुउद्देशिय प्रकल्पाचे उद्‌घाटन झाले.

या प्रकल्पाच्या उद्‌घाटनानंतर या योजनेसाठी स्वतंत्र प्राधिकरणाची आवश्यकता होती. दामोदर योजनेच्या कामाने चांगली गती घेतल्याने प्रांतीय सरकारचे सहकार्य मिळाले. प्राथमिक अभियांत्रिकी आराखड्याला १९४५ मध्ये मान्यता मिळाली व वित्तीय जबाबदारी प्रांतीय सरकारने घेतली आणि स्वतंत्र दर्जाच्या दामोदर नदी प्राधिकरण मंडळाला मान्यता मिळाली. १५ ऑगस्ट १९४७ नंतर दामोदर खोरे प्राधिकरणाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला गेला व फेब्रुवारी १९४८ मध्ये बील पास होवून दामोदर जल प्रकल्प राबविण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन झाले.

(ब)हिराकूड प्रकल्प:

हा प्रकल्प महानदीवर आहे. महानदी ही ओरिसातील सर्वात मोठी नदी. या नदीच्या महापुरामुळे मोठ्या प्रमाणात विध्वंस होत होता. ओरीसा सरकारने दामोदर नदी खोरे प्रकल्पाच्या धर्तीवर महानदी प्रकल्पाची बांधणी करण्याची मागणी डॉ.आंबेडकरांकडे केली. डॉ.आंबेडकरांनी ८ नोव्हेंबर १९४५ रोजी हिराकुंड परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी ''ओरिसाला पुराच्या आपत्तीपासून संरक्षण मिळवावयाचे आहे. त्याचप्रमाणे मलेरिया रोगापासूनही मुक्त व्हायचे आहे. त्याचा विपरीत परिणाम जनतेच्या आरोग्यावर होत आहे. काम करण्याची शक्ती क्षीण होत आहे. म्हणून ओरिसातील जनतेचे भवितव्य उज्वल करण्यासाठी जलसिंचन आणि जल वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे योग्य दराने विजेची सुविधा उपलब्ध करणेही गरजेचे आहे. त्यासाठी जे पाणी नद्यांतून वाहून जाते त्याचे सर्वेक्षण करणे, पाण्याचे साठे निर्माण करणे, त्यासाठी कालवे बांधणे गरजेचे आहे.'' असे विचार मांडून योजनेस मंजुरी दिल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व १५ मार्च १९४६ रोजी या योजनेचे उद्‌घाटन झाले आणि राष्ट्रातील आणखी एका बहुउद्देशिय प्रकल्पाची बांधणी सुरु झाली. पुढे हिराकूड प्राधिकरणाचीही स्थापना झाली.

**(क)सोन नदी खोरे प्रकल्पः**

ही नदी मध्य प्रदेशात उगम पावते व याच प्रदेशातून वाहत जावून पुढे गंगा नदीला मिळते. संयुक्त प्रांताच्या सरकारने सोन नदी खोरे प्रकल्प विकासाची मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे केली. १० मार्च १९४५ रोजी डॉ.आंबेडकरांनी विविध राज्य प्रतिनिधी व तज्ज्ञांसमवेत सोन नदी प्रकल्प परिषद घेतली. या परिषदेच्या उद्घाटनातच त्यांनी उत्तरप्रदेश, बिहार व मध्य भारतातील राज्यांना आर्थिक विकासात सोननदी प्रकल्प कसा महत्वाचा आहे याचे विवेचन केले. परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व राज्यांनी प्रकल्प विकासाची संकल्पना मान्य केली. प्रकल्पासाठी प्रादेशिक प्राधिकरण स्थापन करणे व सर्वेची संकल्पना सर्वांना मान्य झाली. पण नंतर डॉ.आंबेडकरांनी विभाग सोडला. त्यामुळे हे काम काही दिवस रखडले. पण १९६८ मध्ये याच प्रकल्पाची बांधणी सुरु झाली.

**(ड)भाक्रा प्रकल्पः**

हा भारतातील सर्वात मोठा बहुउद्देशिय प्रकल्प सतलज नदीवर हिमालय प्रदेशात आहे. या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाची सुरुवात १९४८ मध्ये जरी झालेली असली तरी इ.स. १९४४ मध्ये आंबेडकरांनी अमेरिकन तज्ज्ञांना बोलावून घेतले व या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासून पाहिली. याचा अर्थ या प्रकल्पाची योजना व व्यूहरचना डॉ.आंबेडकरांनीच तयार केलेली होती.

राष्ट्रीय स्तरावरील जलसंपत्तीचे नियोजन, सुयोग्य वापर, सर्वे आणि संशोधन व्हावे यासाठी डॉ.आंबेडकरांनी एका मध्यवर्ती जल आयोगाच्या निर्मितीची आवश्यकता व्यक्त केली होती. कारण देशातील अनेक नद्या एकापेक्षा अधिक राज्यातून किंवा प्रदेशातून वाहत आहेत. या नद्यांवर प्रकल्प उभारल्यास कोणत्या राज्याला अधिक फायदा होईल, कोणत्या राज्याचे नुकसान होईल, पाणी वाटप कसे करावे ? प्रकल्पाच्या खर्चाचे विभाजन कसे करावे ? केन्द्र सरकारची भूमिका कशी असेल इ. प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांची न्याय सोडवणूक करण्यासाठी व पाण्याचा बहुउपयोगी पर्याप्त वापर करण्यासाठी मध्यवर्ती यंत्रणा हवी यासाठी त्यांनी इ.स.१९४४ मध्ये 'सेंट्रल इरिगेशन वॉटरवेज अॅडव्हायझरी बोर्ड (CIWAB)' ला मान्यता दिली. याच मंडळाचे इ.स.१९४५ मध्ये सेंट्रल वॉटरवेज, इरिगेशन, नेव्हीगेशन कमिशन (सी.डब्ल्यु.आय.एन.सी.) झाले. इ.स. १९४८ मध्ये याच आयोगाचे रुपांतर सेंट्रल वॉटर पॉवर इरिगेशन अॅन्ड नेव्हीगेशन कमिशन (सी. डब्ल्यु. पी.आय.एन.सी.) असे झाले. या आयोगाचेच पुन्हा इ.स.१९५१ मध्ये सेंट्रल वॉटर अॅन्ड पॉवर कमिशन (सी.डब्ल्यू.पी.सी.) असे नामांतर झाले व इ.स.)१९७४ मध्ये सिंचन व विद्युत विभाग वेगळे झाल्याने 'सेंट्रल अॅथॉरिटी (सी.इ.ए.)' स्थापन झाले व सध्या हे दोन्ही मध्यवर्ती आयोग कार्यरत आहेत. थोडक्यात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आवश्यक मानून स्थापन केलेले 'मध्यवर्ती जल आयोग' आजही कार्यरत आहेत.

भारतात नैसर्गिक पाण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन साधारण स्वरुपाचा होता. त्यामुळेच १९१९ चा कायदा किंवा १९३५ च्या कायद्यात पाणी वाटपासंदर्भात विशेष तरतुदी आढळत नाहीत म्हणून भारतीय राज्यघटना तयार करतांना डॉ.आंबेडकरांनी या बाबींची दखल घेतली व संविधानातील कलम नं.२३९ ते २४२ हे पाण्यासंदर्भात तरतुदीसाठी वापरले.

थोडक्यात, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. १९४२ ते १९४६ या दरम्यानच्या काळात देशात उपलब्ध असणारे पाणी, त्याचे संवर्धन, नियोजन, वितरण व संरक्षण इ. चा बारकाईने अभ्यास केला, योजना आखल्या व त्या कार्यवाहीतही आणल्या. म्हणून डॉ.आंबेडकर हे भारतीय जल व्यवस्थापनाचे उद्गाते आहेत.

**संदर्भसूची:**


१) थोरात सुखदेव, १९९८, *आंबेडकरस् रोल इन इकॉनॉमिक प्लॅनिंग अँन्ड वॉटर पॉलिसी*, जे.एन.यू. दिल्ली, पृ.१०, ८०.

२) थोरात सुखदेव, २००५, (अनु.), *बाबासाहेब आंबेडकर नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान*, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.४४-९१.

३) पी.अब्राहम, २००२, *आंबेडकरस् कॉन्ट्रीब्युशन फॉर इकॉनॉमिक प्लॅनिंग अँन्ड डेव्हलपमेंट - इट्स रिलेव्हन्स*, कनिष्क पब्लि., न्यू दिल्ली, पृ.६१, १२५.

४) कांबळे जी.एस., २०१४, *डॉ.आंबेडकरस् कॉन्ट्रीब्युशन इन फॉरम्युलेशन ऑफ वॉटर पॉलिसी*, रिसर्च डायरेक्शन व्हॉल्यूम २, इशु ०१ सोलापूर, पृ.३-८.


---

**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**

***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2015 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31st August 2016. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C.,*
*Jalgaon-425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# डॉ. आंबेडकर : एक निष्णात अर्थतज्ज्ञ

**उमेश भाऊराव घोडेस्वार, अकोला**
अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय.
भ्रमणध्वनी:९८२२८९४८२६
ई-मेल: ghodeswar123@gmail.com

सामाजिक न्यायाशिवाय विकास शक्य नाही हा विचार सर्वप्रथम डॉ.आंबेडकरांनी केला. स्वातंत्र्य, समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होवू शकत नाही. तत्कालिन परिस्थिती पोषक नसूनही विद्वत्तेच्या बळावर संविधानाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित केला. कोलंबिया विद्यापीठांने *सिम्बॉल ऑफ नॉलेज* म्हणून त्यांना गौरविले. मात्र भारतात दलितांचा नेता अशी त्यांची ओळख हे दुर्दैवच. भारतात घटनातज्ज्ञ, कायदेपंडीत व समाजसुधारक म्हणून त्यांना गौरविले जात असले तरी ते निष्णात अर्थशास्त्रज्ञ म्हणून दुर्लक्षिले गेले. अर्थशास्त्रातील त्यांच्या अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथापैकी उच्चांक गाठलेला *प्रॉब्लेम ऑफ रुपी* हा ग्रंथ त्यांना विद्वान अर्थतज्ज्ञांच्या श्रेणीत नेतो. २०१६ हे डॉ.आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीचे समता व सामाजिक न्याय वर्ष यानिमित्त *प्रॉब्लेम ऑफ रुपी* मधील अर्थव्यवस्थेला दिशा देणाऱ्या अर्थपूर्ण विचाराचा घेतलेला थोडक्यात वेध.

इंग्रजाच्या साम्राज्यवादी धोरणामुळे १८९० ते १८९३ या काळात रुपयाचे मूल्य बदलत गेले व रुपयातील मूल्य अस्थिरतेमुळे भारतीय जनतेला त्याचे अनिष्ट परिणाम भोगावे लागले. वस्तूच्या किंमत अस्थिरतेमुळे रुपयाची क्रयशक्ती घसरली व गरीब होरपळून निघाला. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी *प्रॉब्लेम ऑफ रुपी* या ग्रंथातून चलनस्थैर्याचा उपाय सूचविला.

१९२३ साली *प्रॉब्लेम ऑफ रुपी -इट्स ओरिजीन अँड इट्स सोल्युशन* हा अर्थशास्त्रीय प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्सला डी.एस.सी. या अत्युच्च पदवीकरिता डॉ.आंबेडकरांनी सादर केला. अर्थतज्ज्ञ प्रो.एडवीन कॅनान यांचे त्याकरिता मार्गदर्शन लाभले. हा प्रबंध इतका प्रसिध्द झाला की पुस्तक रुपाने पी.एस.कींग अँड सन कंपनी लंडनने १९२३ मध्ये प्रकाशित केला. वाढत्या

मागणीमुळे पुस्तकाच्या प्रती संपल्या. त्यावेळी डॉ.आंबेडकरांचे वय निव्वळ ३२ वर्षाचे होते.

*प्रॉब्लेम ऑफ रुपी* हा ग्रंथ एकूण सात प्रकरणामध्ये विभागलेला आहे. पहिले प्रकरण- दुहेरी चलनातून रौप्य प्रमापाकडे, दुसरे-रौप्य प्रमाप आणि तिच्या प्रमाणबध्दतेत बिघाड, तिसरे-रौप्य प्रमाप आणि तिच्या अस्थिरतेची कारणीमीमांसा, चवथे-सुवर्ण प्रमापाकडे, पाचवे-सुवर्ण प्रमापाकडून सुवर्ण विमिनय प्रमापाकडे, सहावे-विनिमय प्रमापाची स्थिरता तर सातवे प्रकरण- सुवर्णप्रमापाकडे परत वळतांना यासंबंधी आहे. या ग्रंथामध्ये मुख्यत्वे रुपयाचा विनिमय दर ठरविण्यात येणारी समस्या व ती दूर करण्यासाठी उपाय सांगितले आहेत. तदकाळात केन्स विरुध्द आंबेडकर तात्विक मतभेद प्रसिध्द आहे. डॉ.आंबेडकराचे समकालीन व अर्थशास्त्रातील शास्त्रोक्त अभ्यासाचे तज्ज्ञ जॉन मेनार्ड केन्स होत.

चलनदर निश्चितीसाठी त्याकाळात प्रो.केन्सचे सिध्दांत व ग्रंथ प्रमाण मानले जात. केन्सचा कालावधी हा १८८३ ते १९४६ तर डॉ.आंबेडकरांचा १८९१ ते १९५६ हा आहे. डॉ.आंबेडकरांनी *प्रॉब्लेम ऑफ रुपी* या प्रबंधातून केन्सच्या प्रचलित सिध्दांताला अनुभवाधिष्ठित पुराव्याच्या आधारे खोडून काढले. चलनाच्या मूल्यनिर्धारणासाठी केन्स हे सुवर्ण विनिमय प्रमापाचे(Gold Exchange Standard) तर डॉ.आंबेडकर सुवर्ण प्रमापाचे(Gold Standard) पुरस्कर्ते होते. चलनाच्या मूल्यासाठी सुवर्ण विनिमय पध्दतीत देशाच्या चलनाच्या मूल्य हे सोन्याच्या मूल्याशी निर्धारित केले जाते. रुपया सुवर्णात परिवर्तीत करुन मूल्य आपोआप स्थिर होते असा केन्सचा विचार होता. तर केन्सच्या या निष्कर्षाशी असहमती दर्शवितांना रुपयाची क्रयशक्ति स्थिरावल्या शिवाय रुपयाला स्थैर्य प्राप्त होणार नाही असा आंबेडकरांचा विचार होता.

### काय आहे सुवर्ण प्रमाप व सुवर्ण विनिमय प्रमाप पध्दती?

एका चलनाचे दुसऱ्या देशातील चलनातील किंमत म्हणजे विनिमय दर. आज आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी व पुरवठ्याच्या संतुलनाने विनियम दर निश्चित होतो. मात्र १९ व्या शतकात सोन्याच्या आधारे हा दर ठरायचा. आज मात्र इजिप्त हा देश वगळता विनिमय दर निर्धारिणासाठी ही पध्दतीने पुर्णांशाने उपयोगात आलेली दिसून येत नाही. *प्रॉब्लेम ऑफ रुपी* ग्रंथामध्ये १८०० ते १८९३ या काळातील डॉ.आंबेडकरांनी पुराव्यानिशी सुवर्ण प्रमापाचे विश्लेषण केलेले दिसून येते. या पध्दतीमध्ये प्रत्यक्ष चलनात काही प्रमाणात सोने वापरले जाते.

दोन देशात सुवर्ण प्रमाप चालू असतांना त्या दोन देशातील चलनांचा विनिमय दर हा टाकसाळी दरावर आधारित असतो व ह्या दरात होणारे चढ-उतार हे दोन सुवर्ण बिंदूच्या दरम्यान सीमित असतात. या सिध्दांताला सुवर्ण प्रमाप किंवा टाकसाळी सिध्दांत असेही म्हणतात. टाकसाळी दर म्हणजे दोन देश एकाच धातूचा चलनाकरिता उपयोग करीत असतात तेव्हा एका नाण्यातील शुध्द सुवर्णांशाच्या बरोबरीचे सोने दुसऱ्या चलनातील जितक्या नाण्यात कायदेशीरपणे बसत असेल त्याला टाकसाळी दर म्हणतात. उदा. भारताच्या रुपयात १ ग्रॅम शुध्द सोने आहे व डॉलरमध्ये २० ग्रॅम शुध्द सोने आहे. त्यामुळे या दोन नाण्यातील शुध्द सोन्याच्या आधारे १ डॉलर=२० रु. हा टाकसाळी दर ठरतो. याचा

अर्थ १ डॉलरमध्ये जेवढे शुध्द सोने आहे नेमके तेवढे शुध्द सोने भारताच्या २० रुपयामध्ये आहे. चलनाकरिता असणारी मागणी व त्यांचा होणारा पुरवठा समसमान असल्यास विनिमय दर हा टाकसाळी दराबरोबर राहील. सुवर्ण प्रमापातील विनिमय दर हा टाकसाळी दरावर आधारित असला तरी तो टाकसाळी दराप्रमाणे स्थिर नसतो. कारण सामान्य वस्तूंच्या किंमतीप्रमाणे मागणी-पुरवठ्यातील बदलांमुळे त्यामध्ये बदल होतात. एका देशात चांदीचे व दुसऱ्या देशात सोन्याचे चलन असेल तर टाकसाळी दर मोजता येत नाही. समान धात्विक मुद्रा वापरणाऱ्या देशामध्ये टाकसाळी दराने विनिमय दराची स्थैर्यता येते.

सुवर्ण प्रमापाऐवजी सुवर्ण विनिमय प्रमाप पध्दतीला इंग्रज सरकारने समर्थन दर्शविले. १८८९ मधील हेन्री फॉवलर तसेच ए.एम.लिंडसे समित्यांनी सुवर्ण विनिमय प्रमाप पध्दतीची शिफारस केली. या पध्दतीत कागदी चलनाचे रुपांतर निश्चित दराने सोन्यामध्ये केले जाते. सोन्याला इंग्लंडला पाठविण्यासाठी ही पध्दती ब्रिटीशांना अनुकूल वाटली. साध्या शब्दात, चलनाच्या मोबदल्यात सोने व सोन्याच्या मोबदल्यात चलन म्हणजे सुवर्ण विनिमय प्रमाप पध्दती. त्यात विनिमय दर निश्चितीपेक्षा व स्थैर्यापेक्षा सोन्याचा विनिमयासाठी उपयोग करण्यात येवू लागला. या पध्दतीनुसार लंडन येथील सेक्रेटरी ऑफ स्टेटस कडे जमा झालेल्या सोन्याच्या बदल्यात भारतात नोटा चलनात टाकण्याचा अधिकार मिळविला. सुवर्णाचा राखीव निधी सेक्रेटरी ऑफ स्टेटसच्या ताब्यात लंडनमध्ये असेल आणि दुसरा राखीव निधी रुपयाच्या स्वरुपात भारत सरकारकडे भारतात असेल म्हणजे सोन्याचा अधिकार इंग्लंडकडे गेला. रुपयाची गरज असल्यास लंडनमधील कार्यालय भारतातील कार्यालयावर ड्राफ्ट काढून ते विकले जायचे. तसेच भारतीय कार्यालय सोन्याची गरज भासल्यास लंडनमधील कार्यालयावर ड्राफ्ट काढून ते विकेल अशी निर्धारित व्यवस्था होती. सुवर्ण विनिमय पध्दतीचा अवलंब केल्यामुळे रुपयाचे मूल्य स्थिर न राहता भरमसाठ वाढल्याने भाववाढ होवून रुपयाचे मूल्य कमी झाले. त्याकाळात ब्रिटीशांना भारताच्या आर्थिक विकासापेक्षा अगणित संपत्ती ब्रिटनमध्ये नेणे हा प्रमुख उद्देश होता. त्यामुळे महागाई वाढल्यास त्याचा फटका लोकांवर पडला. परिणामतः सोने की चिडीया असणारा देश ब्रिटीशांनी लुटून नेला तो यामुळेच.

सुवर्ण विनिमय प्रमाप पध्दतीत चलनस्थैर्य येऊ शकत नाही तर सुवर्ण प्रमापाने चलनस्थैर्य येऊशकते असे आंबेडकरांचे मत होते. यासाठी त्यांनी १८०० ते १८९३ या काळातील चलनमूल्यांसंबंधी आकडेवारी त्यांनी प्रस्तुत केली. त्यातून त्यांनी स्पष्ट केले की, भारतासारख्या अल्पविकसित देशात सुवर्ण विनिमय पध्दती अयोग्य आहे. यामध्ये महागाईचा धोका आहे. ब्रिटीश सरकार सुवर्ण विनिमय पध्दतीचा अवलंब करुन ब्रिटीश सरकार रुपयाची किंमत कृत्रिमरित्या वाढवून भारतातील संपत्ती ब्रिटनमध्ये नेत आहे, असे अनुभवाधिष्ठीत विश्लेषण आंबेडकरांनी केले.

**डॉ.आंबेडकरांचे अर्थविचार व वर्तमानकालीन संदर्भ:**

पैसा सर्वच नाही पण सर्व असण्याकरिता पैसा आवश्यक आहे. आज पैशाकडे साध्य म्हणून पाहिले जाते. परंतु पैसा जीवनातील साध्य नसून

जीवन जगण्याचे साधन आहे. त्यामुळे त्यावर नियंत्रण असणे आवश्यकच. नोटा छापणे व त्या निर्गमित सरकारच्या वतीने केंद्रीय बँक करत असते. सरकारवर चलन व्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी सोपविणे धोकादायक असेल तर महागाई थांबविण्याकरिता चलनातील नोटांवर मर्यादा आणावी असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. आज चलनावर नियंत्रण नसल्याने भारत हा आर्थिक घोटाळ्यांचा देश अशी ओळख आंतरराष्ट्रीय पातळीवर होत आहे. पैशावर व त्याच्या वापरावर नियंत्रण असल्याशिवाय अर्थव्यवस्थेचा विकास शक्य नाही.

आज वित्तीय समावेशन होत असले तरी पैशाच्या वापरामध्ये पारदर्शिता नाही. त्यामुळे पैशाचे केंद्रीकरण विशिष्ट गटांकडे झालेले आहे. सर्वांना संपत्ती मिळेल तेव्हांच समृध्दी येईल. त्यासाठी प्रत्येकाकडे पैसा पोहचणे गरजेचे आहे.

कायदेशीर विनिमयाचे व्यवहार होणे हे आवश्यकच मात्र कोणत्याही देशाच्या चलनाची मक्तेदारी निर्माण होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक. आज डॉलरनी जागतिक अर्थकारणात आपली मक्तेदारी स्थापित केली आहे. बहुतांश आयातीचे देणी डॉलरमध्ये असल्याने तो मिळविण्यासाठी प्रत्येक देश साध्य म्हणून त्याकडे पाहते. भारतीय रुपया डॉलरच्या बरोबरीने आणण्यासाठी भारतातील सत्तारुढ सरकारव्दारे आर्थिक कसरत केली जाते. मात्र आमच्या रुपयाची किंमत कमी करा अशी मागणी आंबेडकरांनी केली. यातच त्यांच्यातील निष्णात अर्थतज्ज्ञ प्रत्ययास येतो. रुपयाची क्रयशक्ती स्थिर झाल्याशिवाय रुपयाची किंमत स्थिर होवू शकत नाही. असा त्यांचा विचार आजही प्रासंगिक आहे.

रुपयाची किंमत निश्चित करण्यासाठी आंबेडकरांच्या पायाभूत विचारामुळे तत्कालिन ब्रिटीश सरकारला रॉयल कमिशन नेमावे लागले. विनिमय दर निश्चितीपेक्षा भाववाढ नियंत्रणास महत्व आंबेडकरांनी दिले. विनिमय दर निश्चित करण्यासाठी अन्य चलनाच्या तुलनेत रुपयाचे गुणोत्तर काय असावे? विनिमय दर आपण निश्चित करावा का? असे महत्वाचे प्रश्न रॉयल कमिशनसमोर त्यांनी उपस्थित केले. त्यातूनच देशात एक मध्यवर्ती बँक असावी ज्याव्दारे या प्रश्नांची उकल होईल असा विचार पुढे आला. व त्यातूनच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ची स्थापना १९३५ ला करण्यात आली. यावरुन द प्रॉब्लेम ऑफ द रुपी ग्रंथाने देशाच्या मध्यवर्ती बँकेची मुहूर्तमेढ रोवली. सध्याही सुरु असलेल्या सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्यातील अर्थविचार संघर्षामुळे हा प्रसिध्द ग्रंथ कालसंगत ठरत आहे.

१९९१ पासून भारताने खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा स्वीकार केला. यास खाऊजा म्हटले गेले. या धोरणाला विरोधही होत गेला. मात्र बदलत्या काळानुसार हे अनिवार्यच ठरले. विदेशापेक्षा स्वदेशी माल वापरावा जेणेकरुन देशाला फायदा होईल. असा सर्वमान्य विचार पुढे येतो. मात्र आंबेडकर या विरोधी होते. देशाचा फायदा वस्तू देशातील नागरिकांना कमी किंमतीत मिळाल्याने होईल असा त्यांच्या दूरदृष्टीकोन होता. परदेशी माल कमी किंमतीत मिळतो त्यामुळे तो आयात करणे अर्थव्यवस्थेच्या हिताचेच आहे. परदेशी कंपन्यांमुळे देशातील लोकांना कमी किंमतीत वस्तू मिळू लागल्या. मात्र गेल्या १५ वर्षापासून विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक यावर वाद-प्रतिवाद करण्यात आले. परंतु एफडीआय ला

भारतीय अर्थव्यवस्थेने पचविले हे मान्यच करावे लागेल. यावरुन डॉ.आंबेडकर मुक्त अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते असेही नाही. मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेचे हित ज्यामध्ये आहे तो विचार त्यांनी मान्य केला. जो त्यांच्यानंतरही येणाऱ्या सरकारांना मान्य करावाच लागला. यावरुन डॉ.आंबेडकरांचे विचार आजही प्रासंगिक ठरतात.

आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी व पुरवठा यांच्या संतुलनाने विनियम दर ठरतो. डॉलरची मागणी वाढल्यास व पुरवठा स्थिर असल्यास डॉलर खरेदीसाठी जास्त रुपये द्यावे लागतात. म्हणजेच डॉलरचे मूल्य वाढते व रुपयाचे मूल्य कमी होते. मात्र देशातील चलन पारदर्शी व त्यावर नियंत्रण नसल्यास आपल्याला परदेशी चलन मिळविण्यासाठी मोठी आर्थिक कसरत करावी लागते. चलन व्यवस्था स्वयंचलित व पारदर्शी असावी हे डॉ.आंबेडकरांनी सर्वप्रथम सांगितले. पैशाचे केंद्रीकरण लोकसंख्येतील एका विशिष्ट गटाकडे झाल्याने आज भारतासमोर दारिद्र्य, बेकारी, जातीयता व विषमता असे विविध प्रश्न निर्माण झाले. पैसा शुध्द व प्रवाही असल्यास चलन प्रत्येकाकडे पोहचेल व समृध्दी मिळेल.

प्रत्येकापर्यंत पैसा पोहचावे त्याकरिता चलनवेग महत्त्वाचा. १०० रुपयाची नोट जेव्हा १० लोकांकडे जाईल तेव्हा ती १००० रुपयाची कार्य करेल, १०० लोकांकडे गेल्यास १०००० रुपयाचे कार्य करेल. मात्र ती व्यवहारात आलीच नाही तर तिचे मूल्य १०० रुपयेच राहील. त्यामुळे पैसा सातत्याने अर्थव्यवस्थेत प्रवाही व शुध्द असणे आवश्यक आहे. त्यासाठी चलनाची पारदर्शिता, मोठ्या नोटांवर प्रतिबंध, करन्सी लेस व्यवहार, चलनाच्या पारदर्शकतेसाठी बँक व्यवहार कर तसेच प्रत्येक व्यवहाराची नोंद या बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यांची पूर्णांशाने अंमलबजावणी करणे म्हणजे अर्थव्यवस्थेची डॉ.आंबेडकरांच्या अर्थविचाराशी नाड जोडणे ठरेल...!

संदर्भसूची :


1. Ambedkar B.R., *'Problem of the Rupee- Its Origin and Its Solution'*, 1923 P. S. King & Son, Ltd., Westminster, London, Page 46, 95.
2. Moon Vasant, *'Dr.Babasaheb Ambedkar-Writings and Speeches Vol.6,'* First Edition 1989, Education Department Government of Maharashtra, Government Central Press Bombay, Page 487, 488.
3. Rajamani R.C., *Dr.Ambedkar-A Greatest Economist,* Article published on bamcef.org 2013.
4. https://drambedkarbooks.files.wordpress.com
5. www.goodreads.com>book
6. Wankhade Shweta, *Impact of Dr.Ambedkar's Thoughts on Indian Economy*, baiae.org, googleweb light.com

७. उके मदन, मराठी अनुवाद-*रुपयाची समस्या,* प्रथमावृत्ती २०११, सुगत प्रकाशन नागपूर, पृ.१६, ९५, १६७.

८. कुबेर गिरीश, *अर्थशास्त्री आंबेडकर,* लोकसत्ता-लोकरंग मधील प्रकाशित लेख, १० एप्रिल २०१६, पृ.१, ३.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थतज्ज्ञ

**माधुरी प्रदीप लेले, नागपूर,**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२३४०५०९७

भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांना जगात थोर समाज सुधारक, दलितोद्धारक, घटनेचे शिल्पकार, उत्तम पत्रकार, शिक्षण तज्ज्ञ आणि राजकीय नेता इत्यादी अनेक गुण वैशिष्ट्यांसाठी ओळखले जाते. परंतु मूलतः ते एक अत्यंत चिकित्सक अर्थतज्ज्ञ होते, याकडे मात्र दुर्लक्ष झालेले आहे. त्यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन अतिशय सुस्पष्ट आणि भारताच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत पोषक स्वरुपाचा होता. त्यांच्या अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा केंद्रबिंदू मानव आणि मानवाचा आर्थिक विकासातून घडून येणारा सामाजिक विकास हाच होता. स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारलेल्या आर्थिक व मौद्रिक धोरणावर, वित्त आयोगाच्या निर्मितीमध्ये आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेमागे डॉ. आंबेडकरांच्या विचारांची अमीट छाप पडलेली आहे.

सामाजिक क्रांतीसाठी पुढाकार घेण्याआधीच्या जीवनात ते अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. अर्थशास्त्रात अनेक पदव्या संपादन करण्यासोबतच त्यांनी अर्थशास्त्राविषयी मूलभूत स्वरुपाचे लेखन केले आहे. १९१३ ला कोलंबिया विद्यापीठातून एम.ए. अर्थशास्त्राच्या पदवीसाठी प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. सेलिगमन यांच्या मार्गदर्शनाखाली Ancient Indian Commerce आणि Administration & Finance of East India Company हा निबंध लिहीला.

तसेच त्याच विद्यापीठातून पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी मिळविण्यासाठी १९१७ मध्ये पीएच.डी. साठी The Evalution of Provincial Finance in British India हा प्रबंध लिहिला. १९१७ मध्ये लिहीलेली Small Holdings in India ही पुस्तिका भारतातील शेतकरी आणि शेतमजूरांच्या समस्येवर प्रकाश टाकते. एवढेच नव्हे तर अर्थशास्त्रात एम.एस्सी. साठी काही काळ एडवीन कॅनन आणि सिडने वेब या दोन सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांच्या सहवासात राहिले. १९१८ ते १९२० या काळात मुंबईत सिडने हॅम महाविद्यालयात राजकीय

अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केले.

लंडन स्कुल ऑफ इन्कॉनॉमिक्स या प्रसिद्ध शैक्षणिक संस्थेतून १९२३ D.Sc. (Doctor of Science) ही सर्वोच्च पदवी मिळविण्यासाठी The Problem of Rupee its Origin & Solution. हा प्रबंध लिहीला. या सर्व लेखन प्रपंचावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आर्थिक क्षेत्राबद्दलचा अभ्यास आणि व्यासंग किती व्यापक होता हे स्पष्ट होते. याशिवाय त्यांनी वेळोवेळी दिलेल्या सार्वजनिक भाषणांमधून तसेच रॉयल कमिशन (१९२५) आणि हिल्टन यंग कमिशन (१९२६) यांच्यापुढे मांडलेल्या विचारांमधून त्यांच्या अर्थशास्त्रीय अंतर्दृष्टीचे दर्शन होते. भारतीय समाजाच्या सामाजिक दुरावस्थेचे मुळ कारण आर्थिक दुरावस्थेत आहे याची स्पष्ट जाणीव डॉ. आंबेडकरांना होती.

## डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार:

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे विश्लेषण करण्यासाठी प्रस्तुत शोध निबंधात त्यांच्या आर्थिक विचारांची मांडणी तीन भागात केलेली आहे.

१) मौद्रिक अर्थशास्त्राबद्दलचे विश्लेषण

२) सार्वजनिक वित्तासंबंधीचे विश्लेषण

३) भारताच्या सर्वांगीण आर्थिक विकासाबद्दलचे विवेचन

### मौद्रिक अर्थशास्त्राबद्दलचे विश्लेषण-

The Problem of Rupee - its Origin & Solution या प्रबंधात डॉ. आंबेडकरांनी भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा केली आहे. तसेच भारतासाठी आदर्श चलन पध्दती कोणती? ह्या तत्कालीन अत्यंत ज्वलंत प्रश्नावर आपले मूलगामी विचार मांडले आहेत. डॉ. आंबेडकरांनी १८०० ते १८९३ या कालावधीतील भारतीय रुपयाची, चलनाचे परिणाम म्हणून कशी जडणघडण होत गेली, त्याचे सखोल विवेचन केले आहे. याचवेळी चलन व्यवस्थेविषयी वादविवादात त्यांना प्रा. जॉन मेनॉर्ड केन्स यांच्या सारख्या व जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञासोबत वैचारिक संघर्ष देखील करावा लागला.

डॉ. आंबेडकरांचे मौद्रिक अर्थशास्त्रीय विचार समजून घेण्यासाठी प्रथम तत्कालीन चलनव्यवस्था लक्षात घेणे महत्त्वपूर्ण ठरते. भारतात त्याकाळात सुवर्ण प्रमाप (Gold Standard) आणि रौप्य प्रमाप (Silver Standard) अशी दुहेरी चलन पध्दती प्रचलित होती. वेगवेगळ्या प्रांतात राज्य करणाऱ्या राजांनी स्वत:ची सोने व चांदीची भिन्न आकाराची व वजनाची नाणी प्रसृत केलेली होती. १८३३ ला ब्रिटीशांचा एकछत्री अंमल सुरू झाल्यानंतर १८३५ ला कायदा करून सुवर्ण प्रमाप रद्द करण्यात आले. त्यानुसार संपूर्ण भारतात १८७ ग्रॅम वजनाच्या चांदीचा रुपया प्रचलित झाला. या पध्दतीचा एक फायदा असा झाला की, संपूर्ण देशात एक चलन पध्दती अस्तित्वात आली. परंतु या पध्दतीमुळे देशात चलनाच्या मागणी व पुरवठ्यात असंतुलन निर्माण झाले. चलनाची मागणी वाढत गेली. परंतु पुरवठा मर्यादित राहिला. त्यामुळे देशात चांदीच्या किंमतीत भरमसाठ वाढ होऊ लागली. चलन बाजारातून गायब होऊन नाणी वितळवून पुन्हा चांदीमध्ये परिवर्तित करण्याच्या नविनच उपक्रम जनतेमध्ये लोकप्रिय होऊ लागला. युरोपातून सोने व चांदीच्या निर्यातीवर कडक बंधने असल्यामुळे आयात करणे देखील अवघड झाले. आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताची प्रगती होऊ

लागल्याने चलनाची मागणी अधिक वाढू लागली. यातून मार्ग काढण्यासाठी १८६४ मध्ये कागदी चलनाचा वापर सुरू झाली.

याच दरम्यान इंग्लंड, पोर्तूगाल व इतर काही युरोपिय देशात सूवर्ण परिमाण पद्धती असल्याने भारतातील रौप्य परिमाणात आणि इंग्लंडच्या सूवर्ण परिमाणात विनिमय दरात देखील असंतुलन निर्माण होऊ लागले. १८७३ मध्ये भारतीय रुपया आणि ब्रिटीश पौंड यांच्यातील विनिमय दर १ रुपया = १ शिलींग आणि १०.५ पेस या पातळीवर स्थिर होता. (याचा अर्थ १ एकक सोने = १५.५ एकक चांदी) १८७३ नंतर या विनिमय दरात विसंवाद निर्माण झाला. त्यामुळे भारतीय निर्यातीवर त्याचा अनुकूल परिणाम होऊ लागला. रुपयाचे अवमूल्यन झाले. भारतात प्रचंड भाव वाढ होऊन सामान्य जनतेला त्याची झळ बसु लागली.

जगातील जवळपास सर्वच देशांनी रौप्य प्रमापाचा त्याग केलेला होता. अशा परिस्थितीत भारताने देखील रौप्यप्रमापाचा त्याग करून सुवर्ण प्रमाप स्वीकारणे योग्य ठरले असते. परंतु तसे न होता. भारतात केन्स प्रणित सूवर्ण विनिमय प्रमाप पद्धतीचा स्वीकारण्यात आला. (Gold Exchange Standard). या पध्दतीत केवळ कागदी चलनाचा उपयोग करण्यात येतो व त्या कागदी चलनाचे सोन्यामध्ये परिवर्तन करण्याचा दर निश्चित करण्यात येतो. कागदी चलनाचे सोन्यात रुपांतर करून देण्याची हमी सरकारने घेतलेली असते. यामुळे प्रत्यक्ष सोने आणि चांदी च्या साठ्यांवर चलननिर्मिती अवलंबून न राहता चलन व्यवस्थेत लवचिकता निर्माण होते.

डॉ. आंबेडकरांनी या सुवर्ण विनिमय प्रमाप पध्दतीला कडाडून विरोध केला. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय प्रमाप पद्धती लवचिक आहे हे जरी असले ती लवचिकता दुधारी शस्त्राप्रमाणे आहे. या पद्धतीत चलननिर्मिती किती व्हावी; हे पूर्णतः सरकारच्या मर्जीनूसार ठरेल. त्यामुळे राज्यकर्ते जर बेजबाबदार असतील तर निरंकुश चलननिर्मिती होण्याची शक्यता असते. यातून मुद्रास्फिती आणि भाववाढ होऊन सामान्य माणुस यात भरडला जातो. याकरिता त्यांनी सुवर्ण प्रमाप पध्दतीच भारतासाठी आदर्श चलन पध्दती आहे. याचे ठाम प्रतिपादन केले. सामाजिक व आर्थिक स्थैर्यासाठी, विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान डळमळीत होऊ नये. यासाठी सुवर्ण प्रमाप पध्दतीच योग्य आहे असे त्यांचे मत होते. आपल्या विवेचनाच्या समर्थनासाठी त्यांनी अनेक योजनांची अभ्यासपूर्ण आकडेवारी आपल्या प्रबंधात सादर केली. टेंपल योजना (१८७२) स्मिथ योजना (१८७६) शैल योजना (१८९२) याऊलट योजना (१८९८) इत्यादी योजनांचा साक्षेपी परामर्श घेऊन डॉ. आंबेडकर म्हणतात की, विक्रीय आपत्ती जर टाळायची असेल तर चलन निर्मितीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असते. त्यासाठी सुवर्ण विनिमय प्रमापाऐवजी सुवर्ण प्रमाण पध्दती चलन पध्दती म्हणून योग्य ठरते.

आज या दोन्ही चलनपध्दतीमधील वाद इतिहासजमा झाला आहे, आर्थिक परिस्थितीचा संदर्भ पूर्णतः बदलला आहे. तरी देखील डॉ. आंबेडकरांची तात्विक भूमिका आजही आदर्शवत ठरली आहे. लॉर्ड केन्सच्या भूमिकेचा स्वीकार केल्यामुळे भारताचे अपरिमित आर्थिक नुकसान झाले.

त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी

चलननिर्मिती निरंकुश होऊ नये यासाठी एक प्रभावी नियंत्रण पद्धती असावी असे मत आपल्या प्रबंधात मांडले, यातूनच पुढे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या स्वायत्त केंद्रीय बँकेची संकल्पना उदयाला आली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेसाठी १९२६ मध्ये हिल्टन यंग कमिशन पुढे साक्ष देतांना सुध्दा डॉ. आंबेडकरांनी हाच युक्तिवाद केला होता.

**डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक वित्ता संबंधीचे विश्लेषण:**

डॉ. आंबेडकरांच्या दुसऱ्या पीएच्.डी. पदवीचा प्रबंध The Evolution of Provincial Finance in British India (ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती) सार्वजनिक वित्तासंबंधीच्या संशोधनाचा उत्कृष्ट नमुना आहे. भारतीय शासकीय वित्ताच्या इतिहासात मोठे योगदान देणारा आहे. तत्कालीन ब्रिटीश केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यातील आर्थिक सहसंबंधाबद्दल विस्तृत विवेचन १९१७ ला लिहिलेल्या या प्रबंधात केलेले आहे. १८३३ ते १९२१ पर्यंतच्या कालखंडामध्ये केंद्र व घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध कशाप्रकारे विकसित झाले, याची मीमांसा या प्रबंधात केलेली आहे.

१८३३ ते १८७१ पर्यंत भारतीय सरकारच्या वित्त व्यवस्थेचे स्वरुप संपूर्णतः केंद्रीय स्वरुपाचे होते. महसुल गोळा करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली शासन व्यवस्था केंद्रिय पध्दतीची होती. कायद्याने राज्य केंद्रसरकारचे परंतु कार्यकारी शासन व्यवस्था मात्र घटक राज्यांची असे स्वरुप होते. प्रत्येक घटक राज्य आपल्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून केंद्र सरकारला सादर करीत आणि त्यानूसार महसूल गोळा करण्याची व घटक राज्यांना पैसा पुरविण्याची जबाबदारी केंद्र सरकारकडे अशी पध्दती होती.

त्यामुळे घटक राज्यांच्या आर्थिक मागण्या पूर्ण करणे केंद्र सरकारची जबाबदारी झाली. घटक राज्यांच्या मागण्या योग्य की अयोग्य हे तपासण्याची यंत्रणा केंद्र सरकारकडे नसल्यामुळे गैरवाजवी मागण्यादेखील पूर्ण कराव्या लागत. दुसरीकडे आपले खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे मार्ग शोधणे, त्यांचे नियोजन करणे याचा अधिकार घटक राज्यांना नव्हता. त्यामुळे महसुल गोळा करणे आणि त्याचा विनियोग करणे या दोन भिन्न बाबी, भिन्न कार्ये ठरली. केंद्र शासनाद्वारे राज्यांवर खर्च कमी करण्यासाठी दडपण येऊ लागले. महसुल गोळा करण्यासाठी अन्याय्य पद्धतीने कर आकारणी सुरू झाली. जुलुम, जबरदस्ती, मिठासारख्या आवश्यक वस्तुवर कर आणि श्रीमंत जमीनदारांना करातून सूट या पद्धतीने करांची आकारणी होत होती.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय सार्वजनिक वित्त विषयक विश्लेषण आपल्या प्रबंधात तीन भागात विभागले आहे.

अ) १८७१-७२ ते १८७६-७७ या सहा वर्षाच्या कालखंडातील सार्वजनिक वित्त

ब) १८७७-७८ ते १८८१-८२ या पाच वर्षाच्या कालखंडातील सार्वजनिक वित्त

क) १८८२-८३ ते १९२१ पर्यंत कालखंडातील सार्वजनिक वित्त

पहिल्या कालखंडात उचलून दिलेल्या रकमेपुरते अंदाजपत्रक (Budget by Assignment) या पद्धतीने सार्वजनिक वित्त व्यवस्थेला प्रारंभ झाला. घटक राज्यांना खर्च करण्यासाठी एक

रकमी स्वरुपात निश्चित रक्कम देण्यात येई आणि त्यातून पोलीस, शिक्षण, आरोग्य, रस्ते, तुरुंग इत्यादी नऊ प्रकारच्या खात्यांवर खर्च करण्याचे सांगण्यात आले. परिस्थितीनुसार खर्चात वाढ झाल्यामुळे घटक राज्यांनी तुटीचे अंदाजपत्रक करण्यास सुरूवात केली. ही तूट भरून काढण्यासाठी जबर करवाढ होऊ लागली.

दुसऱ्या टप्प्यात नेमून दिलेल्या महसुलावर आधारित अंदाजपत्रक (Budget by Assigned Revenues) ही पध्दत स्वीकारण्यात आली. या पद्धतीत घटक राज्यांच्या अंतर्गत सेवांपासून मिळणारे उत्पन्न, केंद्र सरकारकडून मिळणारे उत्पन्न आणि समायोजित नियोजन असे उत्पन्नाचे तीन मार्ग घटक राज्यांना उपलब्ध झाले. उत्पन्न आणि खर्चात तफावत निर्माण झाली. तर त्यांची अर्धी जबाबदारी केंद्र सरकारने घ्यावी असेही ठरले. म्हणजे खर्चापेक्षा उत्पन्न अधिक झाले तर अर्धे केंद्राला द्यावे लागेल आणि खर्च अधिक झाला तर अर्धा भार केंद्र सरकार उचलेल. या पद्धतीत उत्पन्न अधिक झाले तर अर्धा भाग घटक राज्यांना ठेवता येतो. यामुळे घटक राज्यांना प्रत्यक्ष महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.

दुसऱ्या टप्प्यातील कार्य पद्धतीमुळे केंद्र व राज्य यांच्यातील परस्पर संबंध सुदृढ घेऊन विकेंद्रीकरणाला प्रारंभ झाला. १८८२-८३ ते १९२०-२१ या ३८ वर्षाच्या कालावधीत महसुलाच्या हिस्सा वाटपावर आधारित अंदाजपत्रक (Budget by Shared Revenues) ही पद्धती प्रचलित झाली. यानुसार महसुल गोळा करण्यामध्ये विकेंद्रीकरण आणि केंद्रराज्य सहयोग याला प्रोत्साहन मिळाले.

डॉ. आंबेडकर यांच्या मते १९१९ च्या Reform Act या कायद्यामुळे प्रशासकीय, वित्तीय संबंधाची पुनर्रचना करणे आवश्यक ठरले. याला डॉ. आंबेडकरांनी द्विदल राज्यपध्दती असे नाव दिले. डॉ. आंबेडकर असे म्हणतात, *द्विदल राज्य पध्दती ही प्रशासनाची निकृष्ट पध्दती आहे, कारण ती सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वाच्या विरुद्ध आहे* ते पुढे असे म्हणतात, *संकरित प्रशासन, द्विभागलेली जबाबदारी, कामाची विभागणी, राखीव अधिकार यातून चांगले प्रशासन निर्माण होत नाही आणि प्रशासनच चांगले नसेल तर निरोगी अर्थव्यवस्थेची आशाच बाळगायला नको. यावर साधा उपाय म्हणजे सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर आधारलेली एक केंद्रीय प्रशासन व्यवस्था अंमलात आणणे हा होय.*

पुढे स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या या तत्त्वानुसार भारतात वित्त आयोगाची स्थापना झाली. दर पाच वर्षांनी केंद्र व राज्य सरकारमधील आर्थिक सहसंबंधाचे पुनर्निरीक्षण या आयोगाव्दारे केले जाते. करांच्या रुपाने गोळा झालेला महसुल केंद्र व राज्य सरकार यांच्यात कशाप्रकारे वितरीत करण्यात यावा याबद्दलची मार्गदर्शक तत्त्वे वित्त आयोग ठरविते. या सर्वांसाठी डॉ. आंबेडकरांचा हा प्रबंध मूलाधार आहे हे विसरून चालणार नाही.

डॉ. आंबेडकरांचे पीएच्.डी.च्या प्रबंधासाठीचे मार्गदर्शक सुप्रसिद्ध, अर्थतज्ज्ञ प्रा. सेलिगमन यांनी आपल्या प्रस्तावनेत डॉ. आंबेडकरांनी अतिशय वस्तुनिष्ठ, निष्पक्ष विश्लेषण केले असुन यापुर्वी असे सैद्धांतिक विवेचन कुणीही केलेले नाही असे गौरवोद्‌गार काढले आहेत.

**भारताच्या सर्वांगीण आर्थिक विकासाबद्दल डॉ. आंबेडकरांचे विचार:**

भारताच्या संविधानात डॉ. आंबेडकरांनी

कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडली, तेव्हाच भारताच्या आर्थिक विकासाची दिशा निश्चीत झाली. समतेच्या तत्त्वांवर सर्वांना विकासाची समान संधी प्राप्त व्हावी. यासाठी काही मूलभूत स्वरुपाच्या सुधारणा डॉ. आंबेडकरांनी आपल्या वेळोवेळी केलेल्या जाहीर भाषणांमधून मांडल्या. भारताच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण भारताचे तत्कालीन भूमी धोरण आहे असे त्यांचे मत होते. त्यांचे कृषीविषयक अर्थशास्त्रीय लेखन आणि भाषणे ही प्रामुख्याने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आर्थिक समस्यांशी निगडीत आहेत. तरी देखील त्यामध्ये त्यांच्या विचारांची सखोलता आणि दूरदर्शीपणे प्रत्ययास येते. वारसा हक्कामुळे होणारे जमिनीचे लहान तुकडे, जमिनदारी आणि खोती पध्दत आणि शेतीवर निर्भर असणाऱ्यांची अतिरित संख्या या काही मूलभूत समस्या आहेत. ज्यामुळे शेती लाभदायक (viable) होत नाही. त्या प्रश्नांची सोडवणूक हे स्वतंत्र भारताचे पहिले लक्ष्य असले पाहिजे असे त्यांनी म्हटले होते. त्यासाठी सहकार पद्धतीने शेती, शेतीचे एकीकरण, शेतीपूरक ग्रामीण व्यवसायांचा विस्तार आणि शेतकरी व शेतमजुरांनी कुटुंब नियोजनाद्वारे कुटुंबाचा आकार मर्यादित ठेवण्याची आवश्यकता असे तत्कालीन, समाज व्यवस्थेनुसार क्रांतीकारक ठरणारे विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले. Small holings in India and their remedies हा संशोधनात्मक लेख १९१७ मध्ये प्रसिद्ध झाला. हा लेख म्हणजे आंबेडकरांचे शेतीच्या प्रश्नावरील अत्यंत मूलभूत स्वरुपाचे भाष्य आहे.

१९३६ ला जेव्हा डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. तेव्हा त्याच्या जाहिरनाम्यात करांच्या स्वरुपाबद्दल महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल, पुरक व्यवसाय, कुटुंब नियोजन आणि मानवी भांडवलाची (Human Capital) अत्यंत नाविन्यपूर्ण संकल्पना मांडली. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार अतिशय मूलगामी आणि दूरवरचा विचार करणारे आहेत.

शेतीचे यांत्रिकीकरण, सहकारी पध्दतीने शेती, सहकारी पतपेढ्या व सहकारी खरेदी - विक्री केंद्रे स्थापन करणे इत्यादी उपायांनी शेती ही लाभदायक करता येऊ शकते. शेतमालाचा उत्पादन खर्च आणि त्यांना मिळणारा बाजारभाव यांचा ही तुलनात्मक अभ्यास त्यांनी स्वानुभवातून केला, त्यासाठी दिल्ली येथील त्यांच्या २२, पृथ्वीराज रोड वरील सरकारी निवासस्थानी गव्हाचे व भाजीपाल्याचे पीक घेतले.

आजारी शेतीवरील प्रमुख उपाय म्हणजे भांडवल आणि भांडवली मालाचे वाढते प्रमाण असणे हाच आहे. भांडवल हे बचतीतून निर्माण होते आणि बचत ही उत्पन्नातून. त्यासाठी शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

भारतीय कर पध्दती ही पुरोगामी स्वरुपाची असली पाहिजे. श्रीमंताकडून अधिक कर वसूल करून त्या उत्पन्नाचा वापर गरिबांच्या कल्याणासाठी करावा. १९२३ ला केलेल्या जाहीर भाषणात त्यांनी औद्योगिकीकरणाबद्दल देखील आपले स्पष्ट विचार मांडले आहेत. मुक्त बाजारयंत्रणा आणि नियंत्रित व्यवसाय यांचे उत्कृष्ट संयोग त्यांनी या भाषणातून व्यक्त केला. मोठे व मूलभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करावे आणि लहान उद्योग हे मुक्त, खाजगी उद्योजकांसाठी असावे. मिश्र अर्थव्यवस्था हे पंडित जवाहरलाल नेहरू यांचे अर्थशास्त्रीय प्रारूप असले तरी त्यावेळच्या

द्रष्ट्या नेत्यांचे विचार किती एकमेकांना पूरक असत हेच यावरून प्रत्ययास येते.

भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना, राज्य व केंद्र यांच्या सुदृढ आर्थिक संबंधासाठी वित्त आयोगाची रचना, भारतीय सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी भूसुधारणा धोरण इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण आर्थिक घटनांवर डॉ. आंबेडकरांनी केलेले सखोल संशोधन आणि मूलगामी स्वरुपाचे भाष्य निश्चितच प्रभाव टाकणारे ठरले यात शंका नाही.

**संदर्भसूची:**


१) डाहाट, डॉ. धनराज, *आंबेडकर ग्रंथायन*, संकेत प्रकाशन, नागपूर २००५, पृ.५९, ७४

२) Verinder Grover (Editor), *Bhimrao Ramji Ambedkar*, A Biography of his Vision and Ideas, Deep & Deep Publishers, New Delhi, 1998, Page 455.

३) Ambedkar, B.R., *Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches*, Vol. 6, Education Department, Govt. of Maharashtra, First Edition, 1989, Page 51.

४) Ambedkar, B.R., *Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches*, Vol. I, Education Department, Govt. of Maharashtra, First Edition, 1979

५) Ambedkar, B.R., *Dr. Babasaheb Ambedkar Writing and Seeches*, Vol. 6, Education Department, Govt. of Maharashtra, First Edition, 1989.

६) Dongre, Prof. Madhukar, *Economic Thoughts of Dr. B.R. Ambedkar.*

७) Verinder Grover (Editor) - Bhimrao Ramji Ambedkar. A Biography of his Vision and Ideas, Deep & Deep Publishers, New Delhi, 1998.

८) जाधव, डॉ. नरेंद्र , *डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान*, सुगावा प्रकाशन पुणे, ६ डिसें. १९९२.

९) संपादक मंडळ, *डॉ. आंबेडकर गौरव ग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २५ डिसेंबर १९९३.

१०) संपादक मंडळ, *डॉ. आंबेडकरांचे निवडक लेख*, राजेश प्रकाशन, पुणे, १९९८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थशास्त्रज्ञ

**संतोष एन. ताडे**, आकोट,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री नरसिंग महाविद्यालय.
भ्रमणध्वनी:९८५०३८४८५४
ई-मेल: santoshtade26@gmail.com

**मोरेश्वर के. नन्नावरे**, आकोट,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय.
ई-मेल: mknannaware9@gmail.com
भ्रमणध्वनी: ९९२३९४८३८९

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, कायदेपंडीत, पददलितांचे उद्धारक वा कैवारी, क्रांतीकारी व क्रियाशील विचारवंत, राजनीतिज्ञ, महान समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक यासारख्या अनेक बिरुदावलीनी सन्मानित झालेले एक श्रेष्ठ दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते. स्वयंप्रेरणेने आणि स्वकर्तृत्वावर त्यांनी स्वतःची, समाजाची प्रगती साधली. त्याचबरोबर त्यांनी समाजातील आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला विकासाचा मार्ग दाखविला. भारत सरकारने त्यांच्या अलौकिक कार्याबद्दल *भारतरत्न* या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केले. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक व राजकीय विचारांबरोबरच आर्थिक विचारातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. बाबासाहेबांनी आपल्या शैक्षणिक कारर्किदीतही अर्थशास्त्रीय लिखाण केले.

**अर्थशास्त्रज्ञ-डॉ. बाबासाहेब आंबेडकर:**

अर्थशास्त्र हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जिव्हाळ्याचा, चिंतनाचा व संशोधनाचा विषय आहे. ते अर्थशास्त्राचे अभ्यासक होते. त्यांना त्या काळातील प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आर.ए. सेलिगमन, एडवीन कॅनन, भारतातील ब्रिटिश व्हॉईसराय इत्यादी तज्ज्ञांनी त्यांना अर्थतज्ज्ञ मानले. डॉ. आंबेडकर यांनी

अर्थशास्त्र या विषयात एम.ए., पी.एच.डी., एम.एससी., डी.एससी इ. या व अशा तत्कालीन उच्च प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या पदवी विश्वासातील वेगवेगळ्या विद्यापीठातून मिळविलेल्या आहेत.

**अर्थशास्त्रातील ग्रंथ/प्रबंध लेखक:**

अर्थशास्त्रातील डॉ. आंबेडकरांचे चिंतन ज्या ग्रंथ/प्रबंध लेखनातून सिद्ध झाले आहे, त्यानुसार त्यांचे निखळ अर्थविषयक ग्रंथ, आनुषंगीक अर्थविषयक ग्रंथ, अर्थ समस्येवरील भाष्य लेख- याप्रमाणे वर्गीकरण करता येईल. या वर्गीकरणानुसार डॉ. आंबेडकरांच्या एकूणच अर्थविषयक ग्रंथाची/लेखांची खालीलप्रमाणे मांडणी करता येते.

अ)निखळ अर्थविषयक ग्रंथ :

1. Administration and Finance of the East India Company - 1925.
2. The Evolution of Provincial Finance in British India - 1925.
3. The Problem of Rupee : Its Origin and Solution - 1923. (History of Indian Currency and Banking No. 1 - 1947)

आ)आनुषंगिक अर्थविषयक ग्रंथ :

1) Annihilation of Caste - 1936.
2) What Congress and Gandhi have done to the Untouchables - 1945
3) Buddhism and Communism / Budda or Karl Marx.
4) States and Minorities (1946) - 1947

इ)अर्थसमस्येवरील लेख

1) Small Holdings in India and Their Remedies - 1918
2) Mr. Russell and the Reconstruction of Society - 1918.

ह्या सर्व लेखनातून डॉ. आंबेडकरांचे सैद्धांतिक व आर्थिक प्रश्नांसंबंधीचे अर्थचिंतन पुढे आले आहे. हे अर्थचिंतन डॉ. आंबेडकरांचा एक निष्णात अर्थतज्ज्ञ म्हणून अर्थशास्त्रातील अधिकार अधोरेखित करणारे असून त्यांचे या क्षेत्रातील दूरदर्शित्वही सिद्ध करणारे आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार समजून घेण्यासाठी त्यांच्या अर्थशास्त्रातील अभ्यासविषयाचे खालीलप्रमाणे विभाग पाडून त्यांच्या विचारांचा आढावा घेता येतो.

**मिश्र अर्थव्यवस्था:**

उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण व्हावेत असे डॉ. आंबेडकरांचे विचार होते, संपूर्ण उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण न करता सामाजिक राष्ट्रहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा मूलभूत व पायाभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण व्हावे व इतर सर्व उद्योगधंदे खाजगी क्षेत्राकडे सोपविले पाहिजे असे त्यांचे मत होते, त्यांनी विमा, बँक व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करावे असे सूचविले. कारण आर्थिक नियोजनासाठी वित्तपुरवठ्याची आवश्यकता पूर्ण व्हावी याकरिता काही वित्तीय साधने उपलब्ध झाले पाहिजेत, म्हणून त्यांनी या व्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणाचे प्रतिपादन केले.

**लोकसंख्या नियंत्रण:**

स्वतंत्र मजूर पक्ष या पक्षाची घटना, ध्येय व कार्यक्रम याबद्दलचा वृत्तांत टाईम्स ऑफ इंडियाच्या १५ ऑगस्ट १९३६ च्या अंकात बाबासाहेबांनी प्रसिद्ध केला. त्यामध्ये त्यांनी Pressure of Population (लोकसंख्येचा ताण)

यावर लिखाण केले. बाबासाहेबांनी देशातील बेकारीचे मूळ कारण लोकसंख्या वृद्धी हेच जाणून बेकारीवरील प्रतिबंधक उपाय म्हणून संतती नियमनाचा पुरस्कार करण्याचे आव्हान केले होते. लोकसंख्या नियंत्रणाचा प्रस्ताव विधानसभेत आपले नेक सरदार पी. जेरोहम यांच्या करवी १० नोव्हेंबर १९३८ रोजी मांडला. प्रस्ताव मांडून आज जवळ जवळ ७७ वर्षे उलटून गेली आहेत. लोकसंख्या नियंत्रणाबाबत जाणीवपूर्वक विचार आज केला जात नाही. जन्मप्रमाण झपाट्याने वाढत आहे. मृत्युप्रमाण तितक्याच वेगाने घटत आहे. त्यामुळे बेकारीचे प्रमाण अवाढव्य वाढत आहे. निकृष्ट आहार, राहण्याच्या जागेचा यक्षप्रश्न, लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी उत्पादन इत्यादी ज्वलंत प्रश्न आज आपल्या समोर उभे आहेत.

**दारिद्र्य निर्मुलन:**

डॉ. आंबेडकरांना देशातील दारिद्र्याबद्दल अत्यंत चिंता होती. त्यांच्या मते अनैतिकतेचे मूळ कारण दारिद्र्य आहे. १९३६ साली मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हणतात की, शेतजमिनीचे झालेले तुकडे नि तिच्यावर वाढत्या लोकसंख्येचा ताण ही खरी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे आहेत. डॉ. आंबेडकरांच्या मते विमा योजना ही सरकारच्या मालकीची होईल आणि ती ग्रामस्थांना निष्पक्ष पणाने भाडेपट्टीने दिली जाईल. त्यामुळे कोणी कूळ किंवा भूमिहीन राहणार नाही. ग्रामीण औद्योगिकीकरणाच्या उद्देशाने तयार केलेल्या नियोजनातही ग्रामीण भागातील अस्पृश्य मजुरांची, बेकारांची संख्या वाढत आहे आणि परिणामत: त्यांना दारिद्र्याच्या भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे.

**शेती:**

डॉ. आंबेडकरांचे शेतीविषयक विचार व त्यांचा दृष्टिकोन आर्थिक समाजवादाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहेत. शेतजमिनीची खासगी मालकी रद्द करून त्या ऐवजी सामूहिक मालकी प्रस्थापित करावी असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी कृषीच्या व्यवस्थेसंबंधीचे विचार आपल्या Small Holdings in India 1918 State and Minorities व इतर लेखनात मांडले आहेत. सामुहिक शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आंबेडकरांनी पुढील मार्ग सांगीतले आहेत:

१) सरकारने शेतीचे समान प्रमाणात विभाजन करून ग्रामीण लोकांना शेती कूळ म्हणून कसण्यास द्यावी.

२) सरकारने उत्पादन वाढवण्यासाठी बी-बियाणे, खते, अवजारे इत्यादीसाठी अर्थपुरवठा करावा.

३) जमीन कुळाने दिली जात असताना सरकारने जात, धर्म इत्यादीचा विचार करू नये, तसेच श्रीमंत-गरीब असा भेद करू नये.

४) सरकारने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्यास दंडाची शिक्षा करावी.

**औद्योगिकरण:**

शेती क्षेत्रातील बेकारी औद्योगिकरणामुळे कमी होते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्याचबरोबर औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागातील जनतेचे स्थलांतर शहरी भागात होऊन त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होईल आणि त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये बदल होईल असे डॉ. आंबेडकरांना आर्थिक लोकशाही निर्माण करण्यासाठी आणि मागासलेल्या जनतेची आर्थिक विवंचना कमी करण्यासाठी औद्योगिककरणाला प्राधान्य दिले त्यांनी औद्योगिकरणाचा आकृतीबंध कसा असावा, त्याबद्दल त्यांनी आपले मत मांडले.

१) देशातील मूलभूत व महत्त्वाचे उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे असावेत व ते उद्योगधंदे त्यांच्या नियंत्रणाखाली चालविणे.

२) इतर उद्योगधंदे खासगी क्षेत्राकडे सोपवीत १९५६ च्या औद्योगिक धोरणात त्यासाठी काही बदलही करण्यात आले. सरकारने महत्त्वाचे व मूलभूत उद्योगधंदे स्वतःच्या ताब्यात घेतले व कमी महत्त्वाचे उद्योगधंदे खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात आले.

**मालमत्तेची मालकी:**

डॉ. आंबेडकरांनी स्वतःची मालमत्ता जवळ बाळगण्याच्या हक्कात विरोध केल्याचे आढळून येते. त्यांच्या मते मालमत्तेच्या अधिकारामुळे व्यक्ती स्वतंत्र व निःपक्षपातीपणे विचार करू शकत नाही. उलट समाजात शोषणाचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे त्यांनी खाजगी मालमत्ता हक्काला विरोध केला.

**सार्वजनिक आय-व्यय:**

डॉ. आंबेडकरांचे सार्वजनिक आय-व्यय संबंधीचे विचार त्यांनी एम.एस.सी. (इकॉनॉमिक्स) साठी लिहिलेल्या 'The evalution of provincial finance in British India' या प्रबंधात तसेच भारतीय घटनेच्या २७७ व्या कलमावर घटनासमितीची झालेली चर्चा, मजूर पक्षाचे करविषयक धोरण, अंदाजपत्रकावरील भाषणे यावरून त्यांच्या सार्वजनिक आयव्ययांचा विचारांचा अभ्यास करता येतो. डॉ. आंबेडकरांनी मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यात १९३६ मध्ये मांडलेल्या त्यांच्या मते करपात्रतेनुसार कर आकारण्यात यावेत, तसेच उत्पन्नाच्या विशिष्ट मर्यादेपर्यंत कर आकारण्यात येऊ नयेत. त्याचबरोबर कर आकारतांना कराचा व्यक्तीच्या राहणीमानावर परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी. कर मालमत्तेवर आकारावा असे सुचविले. कर हे प्रगतिशील असावेत, श्रीमंताकडून जास्त कर वसूल करावा व गरीबांना करामध्ये सवलत द्यावी त्याचबरोबर जमीन महसुलावरील कर लवचीक व बदलणारे असावेत.

**द्रव्यविषयक विचार (मुद्रानीति):**

डॉ. आंबेडकरांचे चलन विषयक विचार त्यांनी डी.एससी. पदवी करतांना लिहिलेला The Problems of the Rupee; its origin and solution - 1923 हा प्रबंध आणि त्यांनी हिल्टन यंग कमिशनपुढे देलेली साक्ष-१९२५ यात उपलब्ध होतात. या ग्रंथात आंबेडकरांनी भारतीय रुपयाचा अनेक अंगानी उहापोह केला. इंग्लंड व भारतातील पगारदारांचे उत्पन्न व वस्तुंचे भाव यांचा आलेख देऊन त्यांनी त्यावेळी दाखवून दिले की, इंग्लंडमध्ये पगार जास्त तर भाव कमी, तर भारतात पगार कमी व वस्तूचे भाव जास्त, त्यामुळे रुपयाची क्रयशक्ती घटत चाललेली निदर्शनास आणली. डॉ. आंबेडकरांनी सुवर्ण पद्धती ऐवजी सुवर्ण चलन विनिमय दर पद्धतीचा वापर व्हावा असे मत होते, कारण जो पर्यंत रुपया स्थिर राहू शकत नाही म्हणून त्यांनी अपरिवर्तनीय कागदी चलन पद्धतीचा पुरस्कार मर्यादित चलन निर्मितीसह सुचवले. चलनाचे बहिर्गत मूल्य कसे ठरते याबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, चलनाचा विनिमय दर चलनाच्या खरेदीशक्ती समता सिद्धांतानुसार ठरतो. चलनाची खरेदी शक्ती कमी जास्त झाल्यास चलनदर बदलतो, त्यानुसार विनिमय दर ठरतो. त्यांनी भारतीय चलनात सुधारणा सूचविल्या -

१) रुपया नाणे पद्धती बंद करावी.

२) सोन्याचे नाणे आणि रुपया यातील प्रमाण

ठरवावे.

३) रुपयाचे रुपांतर सोन्यात अगर सोन्याचे रुपयात रुपांतर करू नये.

४) सोन्याची टाकसाळ उघडावी.

**दारूबंदी:**

डॉ. आंबेडकर हे दारूबंदीच्या विरोधी होते कारण दैनंदिन जीवणात दारू टाळणे आवश्यक आहे तसेच बंदी घातल्यामुळे बेकायदेशीर दारूला चालना मिळेल त्यामुळे सरकारचे उत्पन्न बुडेल, त्यामुळे त्यांच्या मते दारूच्या उत्पन्नावर व वितरणावर सरकारने बंद घालावी त्यासाठी त्यांनी परवाना पद्धत आणि शिधा वाटप पद्धत दारू पिण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुचविली. त्यांनी असे सुचविले की, दारू व्यापारामुळे जे उत्पन्न मिळेल त्याचा वापर सरकारने शेतकऱ्यांसाठी व शिक्षणासाठी करावा.

**आर्थिक लोकशाही:**

डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही म्हणजे सरकारचे असे रूप आणि पद्धत की जेथे रक्ताचा एक थेंबही न सांडता जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणले जातात त्यांच्या मते आर्थिक आणि सामाजिक लोकशाही या लोकशाहीच्या रक्त वाहिन्या आहेत. त्यामुळे आर्थिक व सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही यशस्वी ठरू शकत नाही.

**कामगार चळवळीचे नेतृत्व:**

भारतीय कामगार, शेतकरी व शेतमजुराबद्दल डॉ. आंबेडकरांना अतीव आस्था होती. समता व स्वातंत्र्य मूल्यांच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी शेतमजुरांना १९४८ च्या किमान वेतन कायद्यातील तरतुदीचा फायदा मिळवून दिला. १५ सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विधिमंडळात संप करणे बेकायदेशीर ठरणारे औद्योगिक कलहाचे विधेयक आले तेव्हा त्यांना डॉ. आंबेडकरांनी कडाडून विरोध केला. त्यावर मत मांडतांना ते म्हणतात की, संप करणे हा दिवाणी अपराध आहे फौजदारी गुन्हा नव्हे. मनुष्याच्या इच्छेविरुद्ध त्याला काम करावयास भाग पाडणे म्हणजे त्याला गुलाम बनविणे होय. कामगार संपाच्या हक्काचे डॉ. आंबेडकर समर्थक होते. परंतु हा संप राजकीय हेतुने प्रेरित नसावा, तो कामगारांच्या हितासाठी असावा असे त्यांचे मत होते.

**समारोप:**

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रीय विचार अत्यंत अभ्यासपूर्ण व सैद्धांतिकदृष्ट्या मांडले आहेत. त्यांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार, कृषीविषयक दृष्टिकोन उद्योगांचे राष्ट्रीयीकरण यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. तसेच चलन विषयक विचारामधून उत्कट देशभक्ती दिसून येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक आयव्यय, करविषयक पुरोगामी विचारसरणी व कामगार चळवळीतील त्यांच्या योगदानावरून ते तोलामोलाचे अर्थशास्त्रज्ञ होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भसूची:**

१) पोळ अनुवाद अरविंद, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार,* (परिचेकर) १९८६, पृ. ४

२) डॉ. जाधव नरेन्द्र, *डॉ. आंबेडकर ! आर्थिक विचार आणि तत्वज्ञान,* १९९२, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

३) प्रा. गायकवाड माधव मु., *समताधिष्ठित समाजनिर्मितीचे आंबेडकरी अर्थशास्त्र व भारतीय अर्थव्यवस्था,* योजना मासिक मुंबई मधील प्रकाशित लेख, जुन २००२, पृ. २

४) कांबळे आनंद, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे*

अर्थशास्त्रीय विवेचन : एक अभ्यास, योजना, मासिक, मुंबई मधील प्रकाशित लेख, डिसेंबर २००८ पृ. ५०, ५१, ५३.

५) डॉ. खेडकर गोवर्धन, *अर्थतज्ज्ञ डॉ. आंबेडकर*, योजना मासिक, मुंबई मधील प्रकाशित लेख, डिसेंबर २००५, पृ. ४९, ५०, ६२.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल, श्रीफळ, साडी, सन्मान चिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरित पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द झालेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१६ पूर्वी कार्यवाह, म.अ.प., गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ यांच्याकडे पाठवावेत. २०१६ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. आर.बी.भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद

# अनंत पैलूंचा अर्थशास्त्रज्ञ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**महादेव रिठे, बुलडाणा,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
राजे छत्रपती कला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९४२१४९४०६९

२००७ मध्ये नोबेल पारितोषिक विजेते ख्यातनाम अर्थतज्ज्ञ अमर्त्यसेन म्हणाले होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मी माझ्या अर्थशास्त्राच्या ज्ञानाचा पितामह मानतो. डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेमध्ये कोलंबिया विद्यापीठामध्ये प्रस्तुत केलेल्या 'दि इव्हॅल्यूएशन ऑफ प्रोव्हीशनल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया' या ग्रंथाला विश्वविख्यात अर्थशास्त्रज्ञ सेलीगमन यांनी प्रस्तावना लिहिली होती; त्यात त्यांनी म्हटले होते की, ''आंबेडकरांनी घेतलेला हा विषय आतापर्यंत अनेक विचारवंतांच्या अभ्यासाचा विषय राहिलेला आहे, मात्र या विषयाचा इतका सखोल आणि सांगोपांग अभ्यास अन्य कोणी केल्याचे मला माहित नाही.'' इतकेच नव्हे तर प्रा. सीगर, प्रा. एडविन कॅनन यासारख्या परकीय अर्थशास्त्रज्ञांनीच नव्हे तर जगप्रसिद्ध अर्थतज्ज्ञांची जन्मभूमी 'लंडन स्कूल ऑफ इकानॉमिक्स'ने सुद्धा डॉ. आंबेडकरांच्या अभ्यासाची सखोलता मुक्तपणे मान्य केली होती. प्रस्तुत लेखात या महान अर्थतज्ज्ञांच्या आर्थिक विचारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासविषय:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चिंतनाचा व संशोधनाचा अभ्यासविषय 'अर्थशास्त्र' हाच होता. या विषयामध्ये त्यांनी एम.ए., पीएच्.डी. आणि डॉक्टर ऑफ सायन्स यासारख्या उच्च व प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या पदव्या मिळविल्या. त्यांच्या अर्थशास्त्रीय लिखाणातील महत्त्वाच्या ग्रंथांमध्ये १) दि प्रॉब्लेम ऑफ रूपी : इटस् ओरिजिन ॲण्ड सोल्यूशन, २) स्टेटस् ॲण्ड मायनॉरिटीज्, ३) इव्हॅल्यूएशन ऑफ प्रोव्हीशनल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया, ४) ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी इत्यादींचा समावेश होतो. उपरोक्त ग्रंथांमध्ये बिटीशांच्या राजवटीमधील भारताची आर्थिक स्थिती, चलनव्यवस्था, केंद्रराज्य वित्तीय संबंध, भारतातील तत्कालीन आर्थिक समस्यांबाबत विचार व त्यासंदर्भात उपाययोजनांबाबत विश्लेषण दिसून येते.

याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणी व वाणीमधून शेतीसुधारणा, आदिवासी विकास, जलविकास, उर्जाधोरण आणि नियोजन, कामगारांसंबंधीचे विचार, शिक्षण, लोकसंख्या धोरण, परराष्ट्र धोरण याबाबतच्या विचारांची सखोलता दिसून येते.

**शेतीसंबंधी विचार:**

डॉ. आंबेडकरांचे कृषिविषयक विचार देशाला आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांवरील उपाय त्यांनी Small Holdings in India and Their Remedies and Status and Minorities मधून व्यक्त केले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांची मुंबई कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाल्यानंतर २४ फेब्रुवारी १९२७ रोजी विधिमंडळात अर्थसंकल्पावरील आपले पहिले भाषण हे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर होते. या भाषणामध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव सरकारला करून देत शेतकऱ्यांवर आकारला जाणारा शेतसारा व त्याबाबत अन्याय करणारी यंत्रणा यावर कठोर टिका केली.शेतकऱ्यांनी जागरूक राहून या समस्यांना तोंड दिले पाहिजे यासाठी त्यांनी 'शेतकरी संघ' चालविला. त्यामार्फत विविध सभांचे, परिषदांचे आयोजन केले. बाबासाहेबांच्या मते जमिनीचे तुकडीकरण झाल्यामुळे उत्पादकता कमी होते. शेतकऱ्यांच्या दयनिय अवस्थेमुळे आधुनिक साधने व बी-बियाण्यांचा वापर करणे शेतकऱ्यांना शक्य होत नसल्यामुळे शेतीचे राष्ट्रीयीकरण करून ती सामुदायिक व सहकारी पद्धतीने कसली जावी.

शेतकऱ्यांचा विकास झाला तर खेड्यांचा विकास शक्य होईल. त्यामुळे रोजगार वाढ होते. शेतीमध्ये अतिरिक्त मजूर सामावून घेण्याची क्षमता असते. त्यामुळे शेतीचा विकास आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

**जल विकास:**

डॉ. आंबेडकर १९४२ ते ४६ या काळात भारताचे मजूरमंत्री असतांना त्यांच्याकडे बांधकाम, पाटबंधारे, उर्जा या महत्त्वाच्या खात्यांचाही कारभार देण्यात आला होता. पाण्याच्या संदर्भातील भारतीयांचा पारंपरिक दृष्टीकोन विकासासाठी मारक होता. जल विकासाचा प्रश्न स्थानिक पातळीवर सोपविणारा हा देश विकसित होणारच नाही, कारण जलविकासाचा प्रश्न हा थेट देशाच्या विकासाशी आहे, असे मत डॉ. आंबेडकरांचे होते. जल विकासाची जबाबदारी केंद्रीय पातळीवर घेतली पाहिजे. या भूमिकेमुळे ५ एप्रिल १९४५ रोजी मध्यवर्ती जलमार्ग, जलसिंचन, नौकानयन आयोग स्थापन करण्यात आला.

जल विकाससंदर्भात डॉ. आंबेडकरांची संकल्पना सांगताना डॉ. सुखदेव थोरात म्हणतात, जल संपत्तीचा वापर फक्त एका उपयोगासाठी न करता सिंचन, नौकानयन, औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी जलउर्जा विकसित करणे; एखाद्या राज्यापुरता विचार न करता संपूर्ण नद्या खोऱ्यांचा विचार करणे; बहुउद्देशिय प्रकल्प आणि त्यांची सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विकासाच्या उद्दिष्टांची सांगड घालणे अशी विविध जलधोरणाच्या उद्दिष्टांनी अभिप्रेत दामोदर खोरे प्रकल्पाचा धाडसी निर्णय डॉ. आंबेडकरांच्या काळातच घेण्यात आला. या प्रकल्पांतर्गत दामोदर नदी, हुबळी व बाराकर नदीच्या विकासाचा समावेश होता.

भारताच्या संविधानामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय जलआयोगाची रचना, प्रकल्प

उभारणीसाठीची प्राधीकरणे आणि जलधोरणा संबंधीच्या तरतुदी नमूद केल्या आहेत. त्यामुळेच पाटबंधाऱ्यांसंबंधीचा नवा दृष्टीकोन देशाला मिळाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढाकाराने निर्मित झालेल्या केंद्रीय जल आयोगाचे पहिले अध्यक्ष डॉ. ए. एन. खोसला यांनी हिराकूड प्रकल्पाच्या पायाभरणीच्या वेळी पंडीत नेहरू उपस्थित असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा प्रकल्प सुरू करण्यात मोठा वाटा असल्याचे जनतेच्या लक्षात आणून दिले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांमुळे सिंचनविषयक नियोजन तयार झाले. शेतीमध्ये सिंचनाची सुविधा निर्माण झाली म्हणजे शेती उत्पादनात वाढ होते. शेतीमधून येणारे उत्पादन हे देशाच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे स्त्रोत आहे. तसेच ते रोजगार निर्मितीचे साधन आहे. म्हणून पाणी अडवून बंधारे, धरणे उभारण्याचे व त्या माध्यमातून शेती उत्पादनात भर घालण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांच्या धोरणाने केले.

**उर्जा धोरण:**

भारतामध्ये उर्जेचा विचार १९०५ पासून सुरू झाला. मात्र डॉ. आंबेडकरांकडे उर्जा मंत्रीपद येईपर्यंत (१९४२) देशातील विचारवंतांनी, तज्ज्ञांनी वीजविकासाचे कोणतेही निश्चित धोरण ठरविले नव्हते. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली या देशाचे उर्जा धोरण निश्चित झाले. केवळ वीजनिर्मिती आणि वीजविकासाच्या धोरणाचाच त्यात समावेश नव्हता, तर त्याचे व्यवस्थापन त्यासाठी लागणारे आर्थिक बळ आणि यातून येणाऱ्या आर्थिकतेचे नियोजनही समाविष्ट होते.

२१ फेब्रुवारी १९३९ च्या मुंबई प्रांत असेंब्लीच्या अंदाजपत्रकावरील चर्चेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''विजेवरील कर अनिष्ट आहे असे माझे प्रामाणिक मत आहे. या करामुळे जनतेचे आर्थिकदृष्ट्या नुकसानच आहे, त्याचबरोबर आरोग्यदृष्ट्या गोरगरीबांना हा कर घातक ठरणार आहे. खर्चाच्या भितीने लोक रॉकेलचे दिवे वापरू लागतील व त्याचा त्यांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतो. पूर्वी १२ युनिटच्या आत वीज वापरणाऱ्यांना कर नव्हता, आता मात्र हा कर लादण्यात आला आहे. या त्यांच्या विचारातून त्यांची दूरदृष्टी स्पष्ट होते. या देशातील शेती उद्योगाला स्वस्तात व मुबलक वीज मिळाली पाहिजे अशी भूमिका घेऊन उर्जामंत्री झाल्यावर त्या पद्धतीचे नियोजन करून धोरणांची अंमलबजावणी डॉ. आंबेडकरांनी केली.

**कामगार संबंधीचे कार्य:**

डॉ. आंबेडकर इम्प्रुव्हमेंट चाळीत राहत असतांना त्यांना कामगारांचे जीवन जवळून बघता आले. कामगारांच्या होणाऱ्या शोषणाबाबत अधिक गंभीर झाले. वेगवेगळ्या उद्योगातील कामगार चळवळीचे नेतृत्व केले. कामगारांचे शोषण संपावे, त्यांचे संघटन असावे, याबाबत त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. कामगारांनी राजकीय सत्ता हाती घेतली तर कामगार हिताचे कायदे करता येतील असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकर मंजूर मंत्री असतांना कामगार हिताचे अनेक निर्णय घेवून त्यांची अंमलबजावणी केल्याचे आढळते. १९४२-४६ या काळात कामगारविषयक धोरण ठरवितांना किमान वेतन कायदे, कामाचे तास, कामगारांसाठी उपहारगृह, महागाई निर्देशांकानुसार महागाईभत्ता, रास्तभावातील धान्यकेंद्र, प्रॉव्हिडंट फंडाची नियमावली यासारखे कामगार हिताचे कायदे, विमा

संरक्षण या बाबींची अंमलबजावणी करण्यात डॉ. आंबेडकरांनी पुढाकार घेतला.

९ डिसेंबर १९४३ ला डॉ. आंबेडकरांनी धनबाद येथील कोळसा खाणीला भेट दिली असता एक गरोदर स्त्री खाणीत काम करीत असतांना आढळली. त्यावेळी त्यांनी गरोदर स्त्री कामगारांना खाणीत पाठवू नये, त्यांना अन्य कामे द्यावीत, प्रसूतीपूर्वी दहा आठवडे तर प्रसूतीनंतर चार आठवडे पगारी रजा द्यावी, या संदर्भात अंमलबजावणी करून नंतर त्याचे कायद्यात रूपांतर केले. सामाजिक सुरक्षिततेसंबंधीच्या तरतुदी इंग्लंडप्रमाणे करण्यात आल्या. आजारीपणाचा विमा, नुकसान भरपाई, प्रसूतीसंबंधी नियम, खाणीवर स्नानगृह आदिंची तरतूद यामध्ये करण्यात आली. मजूर खात्यांतर्गत येणाऱ्या रोजगार विनिमय केंद्राची स्थापना डॉ. आंबेडकरांच्या कल्पक नेतृत्वामुळे झाली. कुशल व अकुशल कामगारांच्या भरतीसाठी ही कार्यालये सुरू करण्यात आली. उपलब्ध होऊ शकणाऱ्या रोजगाराची माहिती आणि रोजगार मिळविणाऱ्यांसाठीची सोय त्यामधून व्हावी हा या सेवायोजन कार्यालयाच्या निर्मितीमागील हेतू होता. मजूरमंत्री असतांना डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या हक्काचे संरक्षण त्यांच्या कामाची सुरक्षितता, गरजा, त्यांचे शिक्षण, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची सोय याबाबत महत्त्वाचे निर्णय घेऊन कामगारहिताची श्रमनीति ठरविली.

### शिक्षणविषयक विचार:

शिक्षणाच्या अभावाने माणूस गुलाम होण्यास वेळ लागत नाही. त्यामुळे प्रत्येकास शिक्षण मिळाले पाहिजे. शासनाने ही जबाबदारी घेवून सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. शिक्षणामुळे, नैतिकता, आरोग्य, राष्ट्राभिमान, विज्ञाननिष्ठा यांची जाणीव नागरिकांमध्ये होऊन देशाच्या आर्थिक विकासाचा मार्ग सुकर होतो, असे त्यांचे मत होते. विद्यापिठीय शिक्षणाच्या ध्येय आणि कार्याविषयी मुंबई विद्यापीठ पुनर्रचना समितीपुढे दिलेल्या लेखी साक्षीत डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, विद्यापीठात दिले जाणारे शिक्षण समाजाभिमुख असावे, ते विज्ञाननिष्ठ आणि पक्षपातविरहीत असावे. कोणत्याही विशिष्ट समाजघटकाच्या हितसापेक्ष नसावे. विद्यार्थ्यांची क्षमता विकसीत करणे हे विद्यापीठ शिक्षणाचे ध्येय असावे. उपलब्ध पुराव्यांच्या आधारावर मूल्यमापन करणारा विद्यार्थी घडविण्याचे कार्य विद्यापीठांनी करावे, असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांनी केवळ शिक्षणविषयक विचार मांडले नाहीत तर पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शाळा, महाविद्यालये आणि वसतीगृहाचे आदर्श कार्य उभे केले. त्यांच्या मते सर्वांना समानतेने सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक स्वातंत्र्य उपभोगता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे म्हणजे राष्ट्रविकास होय. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि तो पिणारा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणत असत. शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा त्यांचा शिक्षणामधून समाज विकासाचा मूलमंत्र होता. डॉ. आंबेडकरांनी अपेक्षित अर्थ व्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी जे उपाय त्यांनी सूचविले होते, त्यामध्ये शिक्षणाचे स्थान महत्त्वाचे आहे.

### लोकसंख्या नियंत्रण आणि कुटूंब नियोजन:

डॉ. आंबेडकरांनी लोकसंख्येसंदर्भात विचार करीत असतांना कुटूंब, कुटुंबातील मुलांचा विकास, स्त्रियांचे आरोग्य, देशाची आर्थिक उन्नती,

दारिद्र्य निर्मुलन, अन्न पुरवठा या विविध दृष्टिकोनातून विचार केलेला आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते, दारिद्र्य निवारणासाठी लोकसंख्या नियंत्रण आवश्यक आहे. लोकसंख्या वाढीमुळे केवळ अन्नधान्य पुरवण्यावरच ताण पडतो असे नाही तर शिक्षण, आरोग्य यासारख्या अन्य सुविधांवरही ताण पडतो. लोकसंख्या वाढीमुळे देशातील जंगले, जमिनी आणि चराऊ कुरणे लागवडीखाली आणली गेली. परिणामी शेती उपयुक्त जनावरांच्या चरण्याची गैरसोय झाल्याने त्यांची संख्या कमी झाली. त्यामुळे शेतीला सेंद्रीय खताचा पुरवठा कमी होतो. लोकसंख्या वाढीमुळे शेतजमिनीचे तुकडे होऊन शेतकरी दरिद्री बनतो. दारिद्र्यातच मुलांच्या जन्माचे प्रमाण अधिक असते. अन्नाबाबतच्या शारीरिक उपासमारीने लैंगिक भूक वाढते. दारिद्र्यात पुरेसे पौष्टीक अन्न न मिळाल्याने आरोग्य बिघडते. बालमृत्यूचे प्रमाण वाढते. लोकसंख्या नियंत्रित नसल्याने देशाचे आर्थिक नियोजनही शक्य होत नाही. त्यामुळे प्रगती मंदावते हे सर्व टाळण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण आवश्यक आहे.

लोकसंख्या नियंत्रणासाठी संततीनियमन आवश्यक आहे. संततीनियमन हे स्त्रियांसाठी वरदान आहे. लोकांच्या दारिद्र्याला कारण ठरणारी अतिलोकसंख्या संततीनियमनातून रोखली पाहिजे. त्यासाठी शासनाने दारिद्र्य निवारण आणि संततीनियमन हे दोन्ही धोरण एकाच वेळी राबविले पाहिजे ही आग्रहाची भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतली होती.

**परराष्ट्र धोरण:**

जगातील विविध देशांशी मैत्रीपूर्ण धोरण निर्माण करून आपले संबंध वाढविले पाहिजे. अन्य देशांपेक्षा असंभवनीय ध्येयापेक्षा संभवनीय गोष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. असंभाव्य गोष्टी करण्याच्या मागे लागणे आणि सदैव संतपणाचा अवतार धारण करणे या धोरणामुळे आम्ही आमचे किती नुकसान करून घेतले आहे, याची साक्ष लष्करावर होत असेला आमचा खर्च, लाखो क्षुधापीडित जीवांना अन्न देण्यासाठी भोगावे लागणारे कष्ट आणि आमच्या देशात औद्योगिकरणाला लागणारी आर्थिक मदत मिळण्याची पडलेली पंचाईत या गोष्टी देतील.

पं. नेहरूंच्या परराष्ट्रीय धोरणासंबंधीची नाराजी हे एक कारण डॉ. आंबेडकरांच्या कायदेमंत्रीपदाच्या राजीनाम्यामागे होते. त्यांच्या मते देश स्वतंत्र झाला, त्यावेळी भारताचे वाईट चिंतणारा एकही देश नव्हता. चार वर्षानंतर मात्र एकही देश मित्र म्हणून राहिलेला नाही, याचा परिणाम देशाच्या औद्योगिकरणावर निश्चित होईल.

**निष्कर्ष:**

१. डॉ. आंबेडकरांच्या शेतीविषयक मौलिक विचारानुसार शेतीचे लहान धारण क्षेत्रामुळे उत्पादकता कमी होते. आजच्या वर्तमान युगात तंत्रज्ञानावर आधारीत शेती करतांना लहान धारण क्षेत्रामध्ये मशागत करतांना अडचणी निर्माण होतांना दिसून येतात.
२. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. शेतीमध्ये जलसिंचन व्यवस्था असल्यास उत्पादन वाढते. त्यासाठी त्या काळात डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारातून व कृतीतून ही बाब स्पष्ट केली. इतकेच नव्हे तर नद्याजोड प्रकल्प अस्तित्वात आल्यास दक्षिण-मध्य भारतामध्ये शेतीला बारमाही पाण्याची

सुविधा उपलब्ध होऊन उत्पादकतेत वाढ होईल व औद्योगिकरणाला मदत होईल ही बाब वर्तमानातही महत्त्वाची आहे. त्यामुळेच त्यांना भारताच्या जलविकासाच्या योजनेला आकार देणारे अभियंता म्हणणे योग्यच ठरते.

३. शेती व उद्योग व्यवस्थेला योग्य वीज मिळाल्यास उत्पादनात भर पडते, ही बाब त्या काळात त्यांनी अधोरेखित करून उर्जा धोरणाची पायाभरणी केली.

४. कामगारांना मिळणाऱ्या सोयी-सवलती-सुरक्षितता या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी सांगितलेले नियम व कायदे आजही महत्त्वाचे आहेत.

५. शिक्षणामुळे मानवी भांडवलाची निर्मिती होऊन उत्पादनाचा दर्जा वाढतो. डॉ. आंबेडकरांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या अपेक्षित प्रस्थापनेसाठी शिक्षणाचे स्थान महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

६. दारिद्र्यातून लोकसंख्या वाढ व त्यानंतर परत दारिद्र्याची निर्मिती होते. त्यामुळे लोकसंख्या वाढ रोखली पहिजे. यासाठी संतती नियमनाची साधने वापरावीत हे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

**समारोप:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारातून घेतलेला काहीच मुद्यांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे. वर्तमानकाळात सुद्धा त्यांचे विचार किती मौलिक आहे, ही बाब यामधून स्पष्ट होते. शतकापूर्वी भारताच्या आर्थिक विकासासंबंधी भाकीत करणारे डॉ. आंबेडकर खऱ्या अर्थाने आर्थिक भविष्यवेत्ते होते. डॉ. आंबेडकरांनी नद्याजोड प्रकल्प, उर्जाधोरण, कामगार धोरण, संघीय वित्त, परराष्ट्रीय धोरण याविषयी आपले विचार मांडतांना कृतीही केलेली आढळते. डॉ. आंबेडकर ज्याप्रमाणे महान समाजसुधारक होते, त्याचप्रमाणे भारताच्या आर्थिक विकासाची पायाभरणी करणारे महान अर्थशास्त्रज्ञही होते, हे त्यांच्या आर्थिक कार्यावरून स्पष्ट होते.

**संदर्भसूची:**


१. डॉ. लुलेकर प्रल्हाद, *अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा - दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर*, २०११, सायन पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे ४११०३०.

२. गायकवाड प्रदीप, *कामगार चळवळ - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख*, २००९, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर ४४००१७

३. इंगोले के.एस., *बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचा मागोवा*, २००७, संदेश प्रकाशन, नागपूर.

४. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर: लेखन आणि भाषणे*, खंड १८, १९ व २०.

५. मा. योजना - जून २००२

६. मा. योजना - डिसेंबर २००२

७. मा. लोकराज्य -ऑक्टोबर २००६

८. मा. कुरूक्षेत्र - डिसेंबर २०१५

९. दै. दिव्य मराठी, ६ डिसेंबर २०१४, (महामानव विशेषांक)

# रुपयाच्या प्रश्नाविषयी डॉ. आंबेडकरांचा प्रासंगिक दृष्टिकोन

**नितीन ज्ञानदेव चौधरी**, अकोला,
शिवस्पर्श सहनिवास-१२
आगरकर मार्ग, रामदास पेठ.
भ्रमणध्वनी: ८०८७५१०००९
ई-मेल : ndchaudhari1981@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन म्हणजे भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक क्रांतीचे तत्त्वज्ञान आहे. डॉ. बाबासाहेबांना आपण घटनातज्ज्ञ, कायद्याचे गाढे अभ्यासक म्हणून ओळखतो. भारतातील दलित समाजाच्या उद्धारासाठी त्यांच्या कार्याचे शब्दात वर्णन करणे कठीण होईल. त्यांची ओळख ही त्यांचे कार्य आहे. म्हणूनच त्यांना विश्वरत्न ही पदवी लौकीकास साजेशी वाटते.

एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची ओळख फार दुर्मिळ आहे. त्यांच्या आर्थिक विचारांचे योगदान आपल्याला त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत केलेल्या लिखाणातून मिळते. यावरून डॉ. बाबासाहेब जागतिक किर्तीचे अर्थतज्ज्ञ असल्याचे जाणवते. डॉ. भिमराव रामजी आंबेडकरांनी स्वत:ला मानव मुक्तीच्या लढ्यात झोकून दिल्याने त्यांचे सामाजिक, धार्मिक, राजकीय विचार जितके समाजाला समजले तितके आर्थिक विचार समजले नाहीत. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांच्या आधारावर आर्थिक नियोजनाची अंमलबजावणी झाली असती तर आज भारताचा वेगळा नकाशा पहायला मिळाला असता. स्वातंत्र्य, न्याय, समता व बंधूता या तत्त्वांवर आधारलेली समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था निर्माण करणे हे डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान होते. त्यांनी सैध्दांतिक, व्यावहारिक तसेच आर्थिक दृष्टिकोनातून भारतीय अर्थव्यवस्थेची नाडी परीक्षा केली आहे.

भारताच्या आर्थिक समस्यांचा एक प्रज्ञावंत भाष्यकार या नात्याने त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे आज क्रमप्राप्त ठरते. त्यांचे आर्थिक विचार त्यांच्या

शैक्षणिक कारकिर्दीतील लेखनाबरोबरच वेगवेगळ्या परिषदा, व्याख्याने, विधीमंडळातील भाषणे, सादर केलेली निवेदने आणि साक्षी, त्यांची ग्रंथ संपदा अशा विविध स्वरूपात प्रकट होत राहीले आहेत.

डॉ. बाबासाहेबांनी अर्थशास्त्रीय ग्रंथामधून केवळ तत्कालीन परिस्थितीचे विश्लेषण केले नाही तर, ते करताना शास्त्रीय व व्यावहारिक तत्त्वांची मांडणीही केली होती, जी आजही मार्गदर्शक ठरते. त्यांचा राज्य समाजवाद निवेदनातून समोर आला, शेतीच्या गंभीर प्रश्नांची उकल लेखनातून पुढे आली, श्रमविषयक विचार औद्योगिक विधेयकावरील चर्चेतून आणि पक्षाच्या जाहीरनाम्यातून जाहीर झाले. जल-विद्युत-खनिज नीति परिषदांमधून स्पष्ट झाली आहे. सध्याचे एकविसावे शतक हे आमुलाग्र परिवर्तनाचे आहे तरीही वर्तमान संदर्भात त्यांचे आर्थिक विचार निर्विवादपणे खरे ठरणारे आहेत. त्यांच्या विविध ग्रंथातील विचारांचा आढावा आज क्रमप्राप्त ठरते

### डॉ. आंबेडकरांचे आर्थिक साहित्य :

ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ द इस्ट इंडीयाः

१५ मे १९१५ रोजी डॉ. आंबेडकरांनी ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ द इस्ट इंडीया कंपनी या ४२ पानांच्या एम.ए. साठी लिहिलेल्या लघुशोध प्रबंधामध्ये १७९२ ते १८५८ या काळात इस्ट इंडीया कंपनीच्या प्रशासन आणि वित्तीय धोरणासंबंधीच्या बदलांचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. कंपनीच्या धोरणातील बदलांचा भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला याचे विदारक आर्थिक विश्लेषण या लघु शोध प्रबंधात केले आहे.

कंपनी काळात भारतीय जनतेची मोठी पिळवणूक करण्यात आली होती. भारतीय जनतेवर विविध करांच्या माध्यमातून शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात शोषण केले. कंपनी सरकारने देशातून मोठ्या प्रमाणात कर्ज उभारून त्याचा वापर भारतातील लोकांच्या हितासाठी न वापरता स्वतःच्या हितासाठी वापरला. कंपनी सरकारने ६९३ पौंड खर्चाचा बोजा भारतीय जनतेवर टाकून ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेवर कसा अन्याय केला याचे अतिशय प्रभावी विश्लेषण डॉ. बाबासाहेबांनी केले आहे.

### ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेची उत्क्रांती :

डॉ. बाबासाहेबांनी पीएच्.डी. च्या पदवीकरिता भारताचा राष्ट्रीय नफाः एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अध्ययन हा प्रबंध १९१७ मध्ये कोलंबिया विद्यापीठात सादर केला. त्यानंतर हाच प्रबंध १९२५ मध्ये ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तव्यवस्थेची उत्क्रांती (द इव्होलूशन ऑफ प्रोव्हान्सील फायनन्स इन ब्रिटीश इंडीया) या नावाने प्रकाशित करण्यात आला. प्रस्तुत ग्रंथात बाबासाहेबांनी ब्रिटीश केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध १८३३ ते १९२१ या काळात कसकसे विकसित झाले त्याचे ऐतिहासिक विश्लेषण केले आहे.

### लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपायः

डॉ. बाबासाहेबांनी १९१८ मधील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय या लेखामध्ये भारतातील शेती क्षेत्रासमोरील समस्यांचे मूलगामी विश्लेषण केले आहे. तत्कालीन इंग्रज राजवटीत भारतीय शेतीची दूरवस्था झालेली होती. शेतीशी

संबंधित ब्रिटिशांचे धोरण कसे चुकीचे आहे त्यात काय बदल होईल याची चर्चा केली आहे.

रुपयाची समस्या :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची रुपयाची समस्या : त्याचे मुळे आणि त्याचे निरसन (प्रॉब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजन अँड इट्स सोल्युशन) हा अर्थशास्त्रीय प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला १९२३ मध्ये डी.एस.सी. पदवी करिता सादर केला. ह्या प्रबंधाला अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख आणि कुशल अभ्यासक प्रोफेसर एडवीन कॅनान हे त्यांचे मार्गदर्शक होते. त्यांच्या या ग्रंथात रुपया आणि पौंड यातील फरक इंग्रजांच्या फायद्याचा कसा आहे आणि आर्थिकदृष्ट्या भारतासाठी किती नुकसानकारक आहे, हे वास्तव मांडले आहे. त्यांचा हा ग्रंथ पी.एस. कींग अँड सन या कंपनीद्वारे पुस्तक रुपाने प्रकाशित केला गेला. या पुस्तकाच्या प्रती लवकर संपृष्टात आल्यामुळे १९४७ मध्ये पुनर्मुद्रण करतांना या पुस्तकाला हिस्ट्री ऑफ करन्सी अँड बँकींग हे नाव दिले गेले व त्याची दोन खंडात विभागणी केली गेली. प्रथम खंडात प्रॉब्लेम ऑफ रुपी आणि दुसऱ्या खंडात हिस्ट्री ऑफ करन्सी अँड बँकींग असे विभाजन केले गेले. परंतु दुसरा खंड कामाच्या व्यापामुळे प्रकाशित होवू शकला नाही, याची बाबासाहेबांना कायम खंत राहीली.

रुपयाचा प्रश्न हा भारताच्या चलनाच्या इतिहासाचा एक भाग आहे. ग्रंथातील विश्लेषण अशा परिस्थितीची चौकट आहे जी आजच्या परिस्थितीपेक्षा भिन्न होती. त्या काळात देशाच्या प्रमुख चलनाचा आधार सोने-चांदी अशा मौल्यवान धातूचा वापर सर्वत्र केला जात होता. १८३५ पूर्वी भारतात सुवर्ण मानक आणि रुपयाचे रौप्य मानक अशी द्विमान चलनपध्दती प्रचलित होती. १८३५ च्या कायद्यानुसार सुवर्णमानक रद्द करून देशभर एक धातूमानावर आधारित चलन पध्दती सुरू झाली. त्यानुसार रुपयाच्या परिमाणाच्या स्वरूपात चलन पध्दतीचे एकसूत्रीकरण करण्यात आले. १८० ग्रॅम टाय वजनाचे १६५ ग्रॅम चांदी असलेला रुपया हे एकमेव चलनच संपूर्ण देशभर प्रस्थापित करण्यात आले. त्यामुळे भारतात रौप्यमानकाची सुरवात झाली. परंतु ही पध्दत देशाच्या गरजा भागविण्यासाठी विपर्यास असल्याची जाणीव लवकरच झाली. कारण विनिमयासाठी चलनाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारात झालेल्या वाढीचा चलनावर प्रभाव पडून चलनाचा वापर वाढला.

याच काळात धातूच्या नाण्याबरोबर कागदी नोटाही प्रचलित होत्या. तसेच त्या परिवर्तनीय होत्या. आजचा काळ हा अपरिवर्तनीय नोटांचा, प्लॅस्टिक मनीचा, रोखता विरहीत व्यवहारांचा तसेच इ-व्यवहारांचा काळ आहे. त्यामुळे रुपयाचे मूल्य त्या काळात जेवढे अस्थिर होते तसेच ते आजही आहे. परंतु त्या काळातील रुपयाची समस्या व आजची रुपयाची समस्या या भिन्नता आहे. आज धातू विरहित पैसा चलनामध्ये आहे. त्यामुळे त्याकाळात सूचविण्यात आलेले उपाय आज जसेच्या तसे लागू करणे शक्य नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी वेगवेगळ्या अमलात आणलेल्या सूवर्ण विनिमय प्रमाप पध्दतीमुळे सुवर्ण विनिमयाचा दर १८०० ते १८९३ या काळात सातत्याने बदलत राहीला. व रुपयाचे मूल्य इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे

बदलत गेले. रुपयातील मूल्याच्या अस्थिरतेमुळे भारतीय जनतेला त्याचे अनिष्ट परिणाम भोगावे लागले.

वस्तूच्या किंमतीतील सातत्याने होणाऱ्या बदलामुळे (वाढीमुळे) रुपयाची क्रयशक्ती घसरली त्यामुळे देशातील गरीब वर्गाला त्याचा मोठा विपरित परिणाम सहन करावा लागला. डॉ. बाबासाहेबांच्या मते, रुपयाची क्रयशक्ती स्थिरावल्या शिवाय रुपयाला स्थैर्य प्राप्त होणार नाही. म्हणजेच रुपयाची क्रयशक्ती स्थिर ठेवल्याशिवाय रुपयाचे मूल्य व त्या अर्थाने रुपयाचा विनिमयदर कायम राहू शकत नाही. त्यांच्यामते, केवळ व्यापारी असंतुलनामुळे रुपयाचे मूल्य घटत नसून वस्तूच्या आंतरिक मूल्यात वाढ झाल्यामुळे रुपयाची क्रयशक्ती कमी होते. व वाढत्या महागाईमुळे व्यापारातील नफा वाढत असला तरी त्या प्रमाणात मजुरांचे वेतन वाढत नाही, गरीब माणसाला जीवन जगणे असहाय होते. भारतात रुपयाचे मूल्य अस्थिर का राहते तसेच ते स्थिर का असावे? यासाठी रुपयाचा चलनाचा साखळी संबंध पुढील प्रमाणे दर्शविला आहे.

१)सरकार चलनाचा अतिरिक्त पुरवठा करते.
२)वस्तू सेवांच्या किंमत पातळीत वाढ होते.
३)किंमतपातळी वाढते म्हणजे चलनाची क्रयशक्ती घटते.
४)क्रयशक्ती घटल्याने चलनाचे मूल्य घटते.
५)चलनाचे विनिमय मूल्य हे शेवटी त्याच्या सामान्य क्रयशक्तीनेच निर्धारित होत असल्याने तेही घटते.
६)म्हणून चलनाची मात्रा नियंत्रित करून त्याची क्रयशक्ती स्थिर ठेवणे हाच विनिमय स्थैर्याचा खरा अर्थ आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात विनिमयाचे साधन काय असावे? याबाबत अर्थतज्ज्ञ लॉर्ड केन्स यांनी आपला अहवाल जेव्हा ब्रिटीश शासनाला दिला होता, त्यात सुवर्ण परिमाण आणि सुवर्ण विनिमय परिमाणामध्ये चलनात सरळसरळ सोन्याच्या नाण्यांचा वापर करावा आणि सुवर्ण परिमाणामध्ये चलनात कागदी नोटा असव्यात परंतु त्याला पाठबळ म्हणून सरकारकडे सोने असावे अशा शिफारशी केल्या होत्या तेव्हा त्या जशाच्या तशा स्वीकाराव्यात असे सूचविले होते. मात्र डॉ. बाबासाहेबांनी यात शंका उपस्थित करून भारतासाठी कशा अहितकारक आहेत हे सांगितले. त्यांच्या मते, जर सुवर्ण परिमाण अस्तित्वात आले तर आणि बेजबाबदार सरकार अस्तित्वात आले तर नोटांची अनियंत्रित छपाई होवू शकते आणि चलनफुगवटा निर्माण होवू शकतो त्याचा फटका भारतातील गोरगरीबांना मोठ्या प्रमाणात बसू शकतो असे सूचविले.

रुपयाला सुवर्णात परावर्तीत न करता त्याला एका ठराविक दरात उपलब्ध केल्याने रुपयाला स्थिरता प्रदान करता येवू शकते व ती देश हितासाठी आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्यामुळे त्यांचे मत हे सुवर्ण प्रमाप पध्दतीचा अवलंब देशहितासाठी कसा आहे? याचे विवेचन करणारे ठरते.

१८७३ ते १८९३ या काळात ब्रिटनची चलनव्यवस्था गोंधळात असताना सुध्दा व्यापार संतूलन ब्रिटनचा नफा वाढविणारे होते. या विषयी आपले मत व्यक्त करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात की, ह्या कालावधीत व्यापारात झालेली वृध्दी ही किंमतीत झालेल्या वृध्दीच्या प्रमाणात

वाढ न झाल्यामुळे कामगारांना दिलेल्या शिक्षेतून उभारलेला निधी व्यापारातील वृध्दीकरिता देणगी ठरला. त्या दृष्टीने ह्या काळात भारताचा झालेला विकास हा फक्त उत्पादकावर अवलंबून न राहता चलनातील वाढीमुळे झालेली लूट होय.

भारतात सुवर्ण प्रमाप चलनव्यवस्था अमलात आणणे हे ब्रिटीश सरकारचे धोरण नव्हते असे असले तरी १९१३ साली फावलर समितीच्या शिफारशी अमलात आणून सुवर्ण प्रमाप पध्दतीचा अवलंब केला गेला. याचा भारतीय अर्थ व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत नाही. तोच स्मिथ समितीच्या शिफारशी अंमलात आणून सुवर्ण प्रमाप पध्दतीला स्थिरता देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

फावलर समितीने भारतीय चलन व्यवस्थेबद्दल केलेल्या शिफारशीमुळे रुपयाचे मूल्य स्वयंचलीत पध्दतीने स्थिर न होता मोठ्या प्रमाणात भाव वाढ होवून रुपयाचे मुल्य कमी झाले. यासाठी डॉ. बाबासाहेबांनी चलनातील राशीला मर्यादा घालून तीला परावर्तीत करण्याकरिता नोटा निर्गमित करण्याचा सरकारी अधिकार कायद्याचे बंधन घालून सरकारने रुपयाच्या चलनाची जबाबदारी सरकारने स्वीकारावी असे सूचविले. तसेच सरकारवर चलन व्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी सोपविणे धोकादायक असेल तर मुद्रास्फिती थांबविण्याकरिता मागणीनुसार चलनात नोटा परावर्तीत करणे ही पुरेशी हमी नसल्यामुळे चलनातील नोटांना मर्यादा घालून कायद्याच्या बंधनात चलनव्यवस्था सुरळीत ठेवण्याकरिता स्वयंचलीत अशा यंत्रणेची गरज प्रतिपादीत केली. त्यावेळी सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या इंपेरिअल बँकेकडे चलन निर्मित करण्याचे अधिकार देवून १९३४ साली भारतीय रिझर्व्ह बँक कायद्यानुसार स्वतंत्र अशा रिझर्व्ह बँकेची निर्मिती मुद्रा व्यवस्थेला नियंत्रित ठेवून मुद्रेला स्थिरता प्राप्त करून देण्याकरिता झाली.

डॉ. बाबासाहेबांनी आपल्या रुपयाचा प्रश्न या ग्रंथात केलेल्या विवेचनाचे प्रमुख मुद्दे थोडक्यात मांडता येतात.

१. रुपयाची सामान्य क्रयशक्ती कमी झाल्यामुळे त्याचे मूल्य घटत होते.
२. भारतात जेव्हा किंमतीची पातळी वाढली तेव्हा रुपयाची क्रयशक्ती घटून त्याचा विनिमयही घसरला. यावरून रुपयाचे विनिमय मूल्य हे शेवटी त्याच्या सामान्य क्रयशक्तीनेच निर्धारित होते.
३. किंमत पातळी वाढण्याचे खरे कारण सरकारने केलेला चलनाचा अतिरिक्त पुरवठा हे होय.
४. अर्थात चलन निर्मितीच्या अधिकाराचा गैरवापर करून चलनाचा अतिविस्तार केल्यामूळे रूपयाचे मूल्य घटले होते.
५. देशातील चलनाच्या परिमाणावर असणारी मर्यादाच त्याचे मूल्य टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी असते.
६. रुपयाचे खरे धोरण क्रयशक्तीच्या स्थैर्याला महत्त्व देणारे असायला हवे, कारण ती स्थिर ठेवणे जमल्यास विनिमय स्थैर्यही आपोआप साध्य होईल.

**समारोप:**

भारतीय चलन व्यवस्थेचे मूल्यांकन करताना चलनाच्या मूल्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या बदलामुळे ती मुद्रेची स्थिरता कायम राखण्यात अयशस्वी ठरल्याचे मत नोंदविणारे डॉ.

बाबासाहेब आंबेडकर आज देखील तेवढेच खरे ठरले आहेत. त्यांचे मते ऋतूमानाचा भारतातील आर्थिक आणि सामाजिक जीवनात एवढा प्रभाव झालेला आहे की, अर्थशास्त्रीय नियम देखील खोटे ठरत आहेत. त्या दृष्टीने विचार करता भारतीय मुद्रा व्यवस्थेबद्दल १९२३ साली केलेली मांडणी आजदेखील तेवढीच सूचक आहे.

आज स्वातंत्र्योत्तर भारतातील रुपया हा एक अपरिवर्तनीय चलन असून त्याच्या अस्थैर्याचा प्रश्न वारंवार उद्भवलेला आहे. वेळप्रसंगी त्याचे अवमूल्यनही करावे लागले. याचाच परिणाम १९९१ मध्ये आर्थिक सुधारणांच्या नावाखाली भारतात जागतिकीकरणाचा प्रवेश झाला. वित्तीय प्रशासनाचे प्रश्न साधे सरळ नसाता हे खरे तरीही चलनाचे सतत वाढते परिणाम हे त्याच्या अस्थैर्याला आजही कारणीभूत ठरते हे मान्य करायला हरकत नसावी. म्हणूनच चलनाची मात्रा नियंत्रित करुन त्याची क्रयशक्ती स्थिर ठेवणे हाच त्याच्या स्थैर्याचा खरा मुद्दा आहे हे डॉ. बाबासाहेबांचे मत लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.

**संदर्भ सूची :**


१. आंबेडकर बी.आर. (अनुवादक :उके मदन) (ऑक्टोबर २०११), *द प्रॉब्लेम ऑफ रुपी*, सुगत प्रकाशन, नागपूर, पृ.५१, १२६-१२८, २६०-२६४.

२. कविमंडन विजय (२०१२), *डॉ. आंबेडकर आर्थिक चिंतन*, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.१९८-१९९.

३. खंदारे एस.एम. (२०११), *जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास*, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. कुलकर्णी, ढमढेरे (ऑगस्ट २००८), *आर्थिक विचार व विचारवंत*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

५. किर धनंजय (२००६), *डॉ. बाबासाहेब आंबेडकर*, पॉपुलर प्रकाशन, मुंबई, पृ.४७५.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार

शकुंतला पाटील, इचलकरंजी,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जयवंत महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२३८१४९४४
ई-मेल : shakuntlapatil@gmail.com

एक निष्णात कायदेपंडित म्हणून आपल्या बौध्दीक क्षमतेच्या जोरावर प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, समता व न्याय व्यवस्थेवर आधारित मानवी हक्क बहाल करणाऱ्या संविधानानेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ठरले. गौतम बुध्द, कबीर व महात्मा जोतीबा फुले यांना गुरु मानून आपली वाटचाल करणारे, करायला प्रेरित करणारे ते एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. राज्यशास्त्र, समाजशास्त्र किंवा तत्त्वज्ञानच काय तर यासारख्या सर्वच ज्ञानशाखेच्या पलीकडे जाऊन खऱ्या ज्ञानाचा प्रकाश दाखवणारे ते दीपस्तंभ होते. अर्थशास्त्राच्या बाबतीत विचार करता ते एक अर्थशास्त्राचे अभ्यासक, समीक्षक, मानवी कल्याणाचे बहुजन सुखाय बहुजन हिताय अर्थशास्त्रज्ञ होते. त्याचे अर्थशास्त्रीय विचार हे त्यांनी लिहीलेले विविध ग्रंथ महार आणि वतने व बहिष्कृत भारत मधील अग्रलेख त्यांच्या विविध व्याख्यानामधून प्रकर्षाने जाणवतात. आज सर्वत्र त्यांची १२५ वी जयंती साजरी होत आहे. या निमित्ताने त्यांचा शेतीविषयक विचारांचा परामर्ष घेणे व सद्य काळात शेती व्यवस्थेसमोर जी आव्हाने उभी आहेत, ती आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य डॉ.बाबासाहेबांच्या शेतीविषयक विचारात आहेत का त्यावर प्रकाश टाकणे हाच या लेखाचा उद्देश आहे.

डॉ.बाबासाहेबांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू या गावी एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली,सातारा येथे त्यानंतर मुंबईत आपले उर्वरित शिक्षण श्रीमंत सयाजीराव गायकवाड व छ.शाहू महाराज यांनी देऊ केलेल्या शिष्यवृत्तीवर त्यांनी पूर्ण केले. त्यानंतर सिडनहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली, लंडनमध्ये

बॅरीस्टर ही पद्वीही त्यांनी मिळविली. खर तर वकिली व्यवसाय करुन त्यांना प्रचंड पैसा मिळवता आला असता, पण तसे न करता त्यांनी आपले सर्व आयुष्य दीन-दलितांच्या उध्दारासाठी घालवले. इंग्लंड, अमेरिकेसारख्या देशात मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी भारतीय समाजासाठी शेवटपर्यंत केला. बहुजन सुखाय, बहुजन हिताय हे तत्व त्यांच्या प्रत्येक विचाराचा गाभा राहिलेला होता.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे शेतीविषयक विचार:**

भारताला १९४७ साली राजकियदृष्ट्या स्वातंत्र्य मिळाले पण भारतीय जनता आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेली होती. गरीबी प्रचंड आर्थिक, सामाजिक विषमतेत भारत विभागला होता. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा पण शेती मागासलेली होती. शेतकरी, शेतमजूर यांना दारिद्र्याने जखडले गेले होते. दीनदलीतांच्या व्यथा त्यांनी जवळून पाहिल्या. त्यांच्यातील माणूसपणा जिवंत करुन त्यांच्या आर्थिक, सामाजिक विकासाचा मार्ग त्यांनी दाखविला. म्हणूनच त्यांना दलितांचे कैवारी म्हणतात. डॉ. बाबासाहेबांनी फक्त दलितांसाठी कार्य केले नाही तर त्यांनी लहान शेतकरी, शेतमजूर मग ते सवर्ण जरी असले तरी त्यांची अवस्था व त्यांच्या समस्या दलितापेक्षा फार वेगळ्या नव्हत्या अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या प्रश्नाकडे त्यांनी गांभिर्याने पाहिलेले आहे. एकूणच शेती शेतकरी याचा विकास हा ग्रामीण समाज सुधारल्याशिवाय होणार नाही याचे भान त्यांना त्याकाळी होते. त्यांच्या शेतीविषयक विविध भूमिकातून त्यांची सखोलता लक्षात येते. त्यांचे शेतीविषयक विचार हे *Small holding in India & their remedies -1997 status of minorities* व यांच्या लिखाणात मांडलेले आहेत.

१.जमिनीची मालकी-

डॉ.बाबासाहेबांचे शेतीविषयक विचार अभ्यासताना शेत जमिनीच्या धारण क्षेत्राची मालकी त्यांचा आकार व त्यावरील उपाययोजना, सामदायिक शेती, सहकारी शेती, शेतीचे राष्ट्रीयीकरण व जमीन सुधारणा या संदर्भात पहावे लागेल. शेती विकासाचा संबंध हा जमीन धारणेशी, जमिनीच्या मालकीशी जोडला गेला पाहिजे. याचा संबंध फक्त आर्थिक घटकाशी नसून तो सामाजिक अस्मितेशी आहे असे ते म्हणत. तत्कालीन व्यवस्थेत आणि आजही उच्च वर्गाकडे मोठमोठ्या आकाराच्या जमिनी आहेत तो वर्ग स्वतः जमीन न कसता मध्यमवर्गाकडून कुळाकडून कसून घेतात. कुळाकडून प्रचंड खंड आकारुन त्याची पिळवणूक केली जाते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती फारशी सुधारत तर नव्हतीच शिवाय यामुळे वर्गव्यवस्था अधिकच दृढ व बळकट झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

२. जमिनीचा आकार

तत्कालीन समाजात आणि आजही शेतीच्या उत्पादकतेबाबतचा संबंध हा जमिनीच्या आकाराशी जोडला गेला आहे. किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे उत्पादन खर्च वजा जाता राहिलेल्या उत्पादनावर कुटुंबाचा खर्च भागवू शकेल एवढे उत्पन्न देणाऱ्या जमिनीच्या आकारास किफायतशीर धारणक्षेत्र संबोधले जाई. हे बाबासाहेबांना मान्य नव्हते. शेती हा फक्त पोटापाण्याचा धंदा नाही. तो राष्ट्रीय व्यवसाय आहे. ते राष्ट्राच्या उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे

शेतीतून वाढावा निर्माण झाला पाहिजे. शेतीची उदारनिर्वाहापेक्षा जादा उत्पादकता वाढली पाहिजे, वाढवली पाहिजे तरच देशाचे आर्थिक सामर्थ्य वाढेल. किफायतशीर धारणक्षेत्र कोणते याबाबत ते म्हणतात लहान आकार तर किफायतशीर ठरु शकणार नाही. पण मोठे धारणक्षेत्रही किफायतशीर ठरेल असेही नाही. कारण मोठ्या आकारात जमिनीचे व्यवस्थापन सक्षमपणे होत नाही. त्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे किफायतशीर धारणक्षेत्राचा संबंध फक्त शेती आकाराशी नसून शेती कसण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवल, श्रम, उपलब्ध साधने यांच्या किंमतीशी असतो. या सर्व गोष्टी सहज व परवडणाऱ्या दरात उपलब्ध असतील तर लहान क्षेत्रही किफायतशीर ठरु शकेल पण जर नसतील तर मोठा आकारही किफायतशीर ठरणार नाही. या मूलभूत घटकाशी त्यांनी उत्पादकतेचा संबंध जोडला हा विचार आजही तितकाच महत्त्वाचा व व्यवहार्य आहे असे म्हणावे वाटते.

आज देशाच्या पातळीवर धारणक्षेत्राचे आकारमान वेगाने कमी होत चालले आहे. १९६१-६२ मध्ये २.६ हेक्टर होते ते ७१-७२ मध्ये २.२ हेक्टर, १९८१-८२ मध्ये १.६७ हेक्टर तर सध्या ०.४१ हेक्टर इतके आहे. डॉ. बाबासाहेबांच्या मते वारसा हक्काने जमिनीचे विभाजन व अपखंडन होत आहे. शिवाय त्यांना इतर कोणताही उदरनिर्वाहाचा मार्ग उपलब्ध नसल्याने आणखी तुकडे पडत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतीच्या उत्पादकतेचा विचार करताना फक्त लहान धारणक्षेत्र हे कृषी उत्पादकतेस कारणीभूत ठरते असे नसून त्याचा संबंध हा शेतीत वापरणारे तंत्रज्ञान, हवामान, जमिनीचा कस, पावसाचे प्रमाण, सिंचनाच्या सोयी, शेतमालाला मिळणारी किंमत, हमीभाव, शेतीबाबतचे शासन धोरण, सरकारी गुंतवणूक एकूणच उत्पादनास येणारा खर्च या बाबी विचारात घेणे फार महत्वाचे आहे. दुर्दैवाने आज हे होताना दिसत नाही. हा मूलभूत विचार त्यांनी मांडला होता.

धारणक्षेत्राचे विभाजन थांबवण्यासाठी ॲन्डरसनने सूचविलेल्या उपायामध्ये एका विशिष्ट आकाराच्या धारण क्षेत्राखालील जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यास शिक्षेची तरतूद होती. म्हणजेच छोट्या आकाराचे धारणक्षेत्र निर्माण होण्यास प्रतिबंध घातला होता. आंबेडकर या बाबतीत म्हणतात अशा प्रतिबंधामुळे काही जमिनदाराची भरभराट होणार होती व त्याची किंमत मात्र इतरांना मोजावी लागणार होती. म्हणजेच छोट्या शेतकऱ्यांना आपल्या छोट्या आकाराच्या जमिनी मोठ्या जमिनदारांना विकण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे हे छोटे शेतकरी भूमिहीन बनणार हा धोका त्यांनी ओळखला होता. सेझ, भूमि अधिग्रहण कायदा करुन आज सरकार शेतकऱ्यांना भूमिहीन बनवून देशोधडीला लावत आहे. त्यांच्या हक्काचे साधन सामाजिक सुविधांच्या नावाखाली भांडवलदारांच्या घशात घालते आहे हे या ठिकाणी आवर्जून नमुद करावेसे वाटते.

३.सामुदायिक शेती

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामुदायिक शेतीची संकल्पना मांडलेली होती. जातीभेद किंवा इतर कोणत्याही घटकाच्या आधारे गावकऱ्यास भेदभाव न करता सर्वांना सामुदायीक शेतीत सामावून घ्यावे यामध्ये कोणीही जमिनदार किंवा कूळ तसेच शेतमजूरही असणार नाही. योग्य प्रकारे जमीन कसून आलेल्या उत्पादनातून

शासनाला वाटा दिल्यानंतर उर्वरित उत्पन्न गावकऱ्यांनी आपापसात वाटून घ्यावे ही सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत बसवून केली जावी शिवाय त्याची अंमलबजावणी न करणाऱ्यावर कारवाई करण्याची तरतूद असावी असा विचार त्यांनी मांडला होता. आर्थिक क्षेत्रात उद्योगाबरोबर शेतीमध्ये शासनाच्या हस्तक्षेपाबाबत समर्थन करताना ते म्हणतात शासनाच्या हस्तक्षेपापासून स्वातंत्र्य म्हणजे खाजगी मालकांच्या हुकुमशाहीचे दुसरे नाव होय. शेती हा शासकीय उद्योग असावा आणि विम्याप्रमाणे शासनाने सर्व जमिनी ताब्यात घ्याव्यात म्हणजे शेतीचे राष्ट्रीयीकरणावर त्यांचा भर होता. मग ती जमीन खाजगी मालकीची असो, कूळाची असो किंवा गहाणाची असो त्याच्या मोबदल्यात त्यांना योग्य ती नुकसान भरपाई द्यावी असा त्यांचा आग्रह होता. आर्थिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय सामाजिक किंवा राजकीय समता प्रस्थापित होणार नाही. झाली तरी त्याला काही अर्थ असणार नाही असा त्यांचा विश्वास होता. संसदीय लोकशाहीच्या चौकटीत कायद्याच्या आधारावरच शासकीय समाजवादाचा डोलारा उभा केला पाहिजे. ज्यातून स्वातंत्र्य,समता व न्याय प्रस्थापित होवून सर्वांचा विकास साधला जाईल असा विकास त्यांना अभिप्रेत होता.

४. खोती पध्दत :

खोती पध्दत ही मुंबई भागातील रत्नागिरी, ठाणे, कुलाबा या काही भागात प्रचलीत होती. या पध्दतीत शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोतीची नियुक्ती केलेली असे यात कुळांना कनिष्ठ भूधारक तर खोताला वरिष्ठ भूधारक समजले जाई. भारतातील जमिनदारी पध्दतीशी मिळतीजुळती ही एक पध्दती, यात कसणाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली जाई. डॉ.बाबासाहेबांनी खोती अंताचे विधेयक सादर करुन प्रत्यक्षात जमीन कसणाऱ्यांच्या शोषणाला समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला हे आंबेडकरांचे विधेयक म्हणजे जमीन सुधारणेच्या दृष्टीने उचललेले पाऊलच होते असे म्हणावे लागेल.

५. सहकारी शेती :

शेतीची दुरवस्था थांबवण्यासाठी सहकारी शेतीचा पुरस्कार त्यांनी केला. सहकारी शेतीतून जमिनीचा मालकी हक्क कायम ठेवून जमिनी एकत्र करुन आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे शेती करता येईल यापुढे एक तर शेतीची उत्पादकता वाढेल. शिवाय शेतकरी भूमिहीनही बनणार नाही. हाही एक उपाय त्यांना महत्त्वाचा वाटत होता. त्याबद्दल ते म्हणतात, ज्या भागात दोन तृतीयांश पेक्षा अधिक लोकांची जमीन गावच्या एकूण जमिनीच्या निम्यापेक्षा जास्त असेल त्या शेतकऱ्याचे मालकी हक्क अबाधित ठेवून सहकारी शेतीचा उपक्रम राबवता येईल. त्यातून उत्पन्न व उत्पादकता वाढवता येईल. हा पर्यायही शेती व शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठी, अस्मितेसाठी त्यांनी मांडलेला होता. जो आजही अनेकांच्या मते योजला जातो.

लहान शेतकरी, शेतमजूर यांना शेती कसणे अकिफायतशीर होत असल्याने त्यांची आर्थिक ओढाताण होत होती. ती थांबवून शेतीच्या व राष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी शेतीला उद्योगधंद्याची जोड देण्याची गरज वर्तवली होती. शेती क्षेत्रात जे अनावश्यक, अतिरिक्त श्रमिक गुंतलेले आहेत त्यांना उद्योगधंद्यात सामावून घेतल्यास त्यांना उदरनिर्वाहाचे हमखास साधन उपलब्ध होईल व त्यातून राष्ट्राच्या उत्पन्नातही

वाढ होवू शकेल. यामुळे शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगिकरण हा एकच खात्रीलायक उपाय होय, असे ते म्हणतात. शेतीत उत्पादनवाढीसाठी अधिक भांडवल गुंतवणूक केल्यास बेकारांची संख्या वाढून ही समस्या जटिल बनेल. यासाठी प्रभावी उपाय म्हणजे औद्योगिकरण असू शकते. कारण शेतीतील बेकारांना यामध्ये सामावून घेतले जाईल. त्यामुळे जमिनीवरील अतिरिक्त भार कमी होवून ते राष्ट्रीय उत्पन्नात भर घालतील, यावर त्यांचा विश्वास होता. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत शेती विकासाबाबत अनेक योजना राबवल्या गेल्या. काळानुसार शेती करण्याच्या पध्दती बदलल्या, पीक पध्दती बदलली, उत्पादन वाढले, उत्पादकता वाढली. हरीतक्रांती, दुग्धक्रांती झाली. यामुळे भौतिक सुबत्ता आली. पण तरीही शेती व शेतकऱ्यांची दुरवस्था संपलेली नाही. आजही ५५ प्रतिशत लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी शेतीवरच अवलंबून आहेत. सर्वाधिक रोजगार निर्मितीची क्षमता कृषीतच आहे. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा १३ टक्क्यापर्यंत घटलेला आहे. याचा अर्थ ५५ टक्के लोकांना फक्त राष्ट्रीय उत्पन्नातील १३ टक्केच हिस्सा मिळतो, यावरुन आर्थिक विषमता किती मोठी आहे याची कल्पना येते. शेतीचे घटत जाणारे आकारमान, निसर्गाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाला मिळणारा उत्पादन खर्चानुसार किमतीचा अभाव, शासनाची शेतीबद्दलची अनास्था यामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला आहे. वाढत जाणारा कर्जबाजारीपणा, बेभरवशाची शेती यामुळे नैराश्येपोटी शेतकरी आत्महत्यास प्रवृत्त होत आहेत. सर्वाधिक आत्महत्येची नोंद महाराष्ट्रात झालेली आहे. हे चित्र एका बाजूला, दुसरीकडे प्रचंड पैसा, नफा, अमाप पैसा यामुळे चंगळवादी प्रवृत्ती असा विचित्र विरोधाभास देशात दिसून येतो. यामुळे शेती व्यवसाय करणे ही हीनपणाचे वाटू लागले आहे. आजची युवा पिढी शेतीपासून दूर जाते आहे. ही खरी चिंतेची बाब आहे. या पार्श्वभूमीवर शेती व्यवसाय वाचला पाहिजे, वाचविला पाहिजे कारण तोच सर्वांचा पोशिंदा आहे. शेती व्यवसाय हा सन्मानाचा, प्रतिष्ठेचा झाला पाहिजे तरच युवा पिढी या व्यवसायाकडे वळतील पण यासाठी त्यांच्या उत्पादनाला औद्योगिक वस्तूप्रमाणे उत्पादन खर्चापेक्षा जादा किंमत मिळाली पाहिजे तशी व्यवस्था विकसित केली पाहिजे. यासाठी शेतीकडे राष्ट्रीय व्यवसाय म्हणून पाहिले पाहिजे. त्यासाठी शासकीय गुंतवणूक शेती व्यवसायात वाढवली पाहिजे. खाजगी गुंतवणूकीतून ते होणार नाही.

डॉ.बाबासाहेबांनी जे विचार त्या काळात मांडले ते आजही तितक्याच निकडीने त्याकडे पाहण्याची गरज आहे. किफायतशीर धारणक्षेत्राचा विचार करताना जमिनीच्या आकारमानाबरोबर शेती मशागतीसाठी आवश्यक असणारे श्रम, भांडवल, तंत्रज्ञान, जमिनीचा कस, हवामान त्यासाठी येणारा एकूण उत्पादन खर्च याचा विचार केला पाहिजे, पण तो होत नाही. हा मूलभूत विचार यांचा आजही तितक्याच किंबहुना त्यापेक्षा जास्त निकडीने अमलात आणण्याची गरज आहे.

## संदर्भग्रंथ सूची:

१. दया पवार (संपादीत) *डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९९९, पृ. १३३, ४१०.

२. *रायटिंग ॲण्ड स्पीचेस*, खंड १, पृ ४१०, ४१८.

५. *रायटिंग अॅण्ड स्पीचेस,* खंड ६ पृ. ४७७
७. खैरमोडे चां.भ. *डॉ.भिमराव रामजी आंबेडकर* खंड १ व २, प्रताप प्रकाशन १९७८
८. प्रधान ग्र.प्र.(२००४), *डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांच्याच शब्दात,* सुगावा प्रकाशन,पुणे
९. Gokhale, Pradeep (Edited), *The Philisophy of Dr. B. R. Ambedkar,* Indian Philosophical Quarterly Publication, Pune
१०. बहिष्कृत भारत.
११. महार वमन.
१२. समाजवादी प्रबोधन प्रकाशन ज्योती- *भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर,* एप्रिल २०१५
१३. Ambedkar B.R., *Small holding in India & their remedies.*

---

## उपक्रम थोडक्यात: स्व. जमनालाल बजाज स्मृती उपक्रम

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय स्व. जमनालाल बजाज उपक्रमांतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले. २६ मार्च २०१६ शनिवार रोजी सकाळी ११:०० वाजता संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड ह्या होत्या. प्रमुख वक्ते परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अ. रा. पडोशी होते. सदर उपक्रमांतर्गत व्याख्यानाचा विषय 'अर्थसंकल्प आणि ग्रामीण विकास' हा होता. मान्यवरांच्या स्वागत समारंभानंतर कार्यक्रम आयोजनामागील भुमिका व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लालासाहेब घाटगे यांनी विशद केली. डॉ. पडोशी यांनी आपल्या भाषणात भारतातील दारिद्र्य व बेरोजगारी या दोन मुलभूत समस्यांचा उहापोह केला. ग्रामीण विकासासाठी पायाभूत सुविधाचे महत्त्व विशद करून अर्थव्यवस्थेला चालना देण्यात अर्थसंकल्पाची उपयुक्तता विशद करतांना सन २०१६-१७ चा अर्थसंकल्प ग्रामीण विकासास कितपत उपयुक्त ठरेल या बाबतचे सविस्तर विवेचन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड यांनी परिषदेने सदरहू उपक्रम आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल परिषदेचे आभार मानले व अर्थसंकल्पाबाबत आपली मते व्यक्त केली.

सदर कार्यक्रमास डॉ. एस. एम. भोसले तसेच सातारा शहरातील विविध महाविद्यालयतील अर्थशास्त्र व कॉमर्सचे प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ. विजय कुंभार आणि सुत्रसंचालन प्रा.श्रीमती प्रियंका देवरे व श्रीमती सुवर्णा कुरकुटे यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा

दिनकर खाशाबा मोरे, इस्लामपूर,
सहयोगी प्राध्यापक व व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्रीमती कुसुमताई राजाराम पाटील कन्या महाविद्यालय.
भ्रमणध्वनी : ९४२२६८२३०४

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे एक असामान्य प्रतिभावंत, कायदातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्र, धर्मकारण, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविणारे एक प्रगल्भ विचारवंत अशी त्यांची आज ओळख आहे. मात्र त्याच बरोबरच ते महान अर्थतज्ज्ञ देखिल आहेत हे दुर्लक्षून चालणार नाही. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापिठामध्ये त्यांनी एम. ए. व पीएच्. डी. ही पदवी अर्थशास्त्र या विषयातून संपादन केली. १९२१ मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स्मधून *डॉक्टर ऑफ सायन्स* ही अर्थशास्त्रातील सर्वोच्च पदवी संपादन केली. शिक्षणानंतर आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये कोणतीही पुस्तके लिहिली नाहीत. मात्र त्यांच्या विचारामधून, भाषणातून तसेच कृतीतून जे अर्थशास्त्रीय विवेचन झाले त्यातूनच त्यांची अर्थशास्त्राची आवड व विचारसरणी जाणवते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय लेखनाचा आढावा घेण्यात आला आहे. पदवीकरिता त्यांनी लिहिलेल्या ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी, दि इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स ॲण्ड सोल्यूशन, दि प्रॉब्लेम ऑफ रूपी इटस् ओरिजीन ॲण्ड सोल्यूशन या ग्रंथातील प्रमुख विचारांचा आढावा घेण्यात आला आहे.

*ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी* या एम. ए. साठी लिहिलेल्या शोधनिबंधामध्ये त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीने प्रशासन आणि वित्त व्यवस्था यांच्यामध्ये सन १८७२ ते १९५८ या कालखंडात झालेल्या बदलांचा भारतीय समाज व्यवस्थेवर झालेला अनिष्ट परिणामांचा आढावा घेतलेला आहे. या शोधनिबंधातील काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे-

१. कंपनी सरकारच्या सहा दशकाच्या कालखंडात म्हणजे १७९२ ते

१८५७ या काळात सरकारचा एकूण महसूल ५५ लाख पौंडापासून वाढत जाऊन ३१७ लाख पौंडापर्यंत वाढला. या उत्पन्नामध्ये जमिनीवरच्या कराचा वाटा ५४%, मिठावरील कराचा वाटा ११%, अफूवरील कराचा वाटा ९%, सीमा शुल्काचा वाटा ६% असा होता. यावरून जमिनीवर जाचक कर आकारणी होती हे आंबेडकरांनी दाखवून दिले.

२. या कालखंडात सरकारने मोठ्या प्रमाणात कर्ज उभारणी केली. सन १९७२ साली भारतीय कर्ज साधारण ७० लाख पौंड होते. ते प्रचंड प्रमाणात वाढत जावून १८५८ मध्ये ६०७ लाख पौंडावर जावून पोहोचले. तर विदेशी कर्ज या कालखंडामध्ये ६६ लाख पौंडाच्या मर्यादेत सीमित ठेवण्यात आले. हे सर्व कर्ज वेगवेगळ्या लढायांमुळे निर्माण झाले होते, हे त्यांनी दाखवून दिले.

३. महसुली उत्पन्न आणि सरकारी कर्जे यातून उभारलेल्या पैशाचा विनियोग, एकूण खर्चाच्या ६४.३% हिस्सा एकट्या लष्करावर खर्च झाला, तर १३% खर्च कर्जावरील व्याजापोटी झाला. याचाच अर्थ आर्थिक विकासासाठी अत्यल्प निधी शिल्लक राहिला.

आंबेडकरांनी आपल्या अभ्यासातून दाखवून दिले यावरून ब्रिटीशांची भारताच्या विकासाबाबतची उदासिनता दिसून येते.

४. डॉ. आंबेडकरांनी पीएच्.डी. पदवीसाठी लिहिलेल्या, *दि इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया* या प्रबंधामध्ये ब्रिटीश केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडामध्ये कसे विकसित झाले याचा आढावा घेतला आहे.

५. सन १८३३ ते १८७१ या कालखंडात भारतीय सरकारच्या वित्त व्यवस्थेचे संपूर्ण केंद्रिकरण झाले होते. या काळात कायदेशीर राज्य व्यवस्था केंद्र सरकारकडे व कार्यकारी शासन व्यवस्था राज्य सरकारकडे अशी स्थिती होती. साहजिकच घटक सरकारांच्या मागण्या व अपेक्षा वाढत गेल्या व त्याचा परिणाम केंद्र सरकारचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.

६. महसुली उत्पन्नाचा भर प्रामुख्याने जमीन महसुलावर होता. शेती उत्पन्नाचा बहुतेक भाग कराच्या रूपाने सरकार जमा होत असल्याने शेतीला चालना मिळू शकली नाही. त्याचप्रमाणेच सीमा शुल्कामुळे औद्योगिक उत्पादनावर विपरीत परिणाम झाला.

७. सरकारची अर्थसंकल्पीय तूट प्रचंड वाढत गेल्यामुळे घटक राज्यांनी महसुल तसेच खर्च या दोन्ही बाबतीत स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करावा असा विचार पुढे आला त्यातूनच १८७१ पासून केंद्र सरकार आणि घटक राज्ये यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प तयार करण्याची पध्दत भारतात सुरू झाली. द्विस्तरीय अर्थसंकल्पीय पध्दतीनुसार काही विशिष्ट सरकारी खात्यांच्या आर्थिक प्रशासनाची जबाबदारी घटक राज्यावर सोपविण्यात आली. त्यामध्ये पोलिस, शिक्षण, आरोग्य सेवा, रस्ते, तुरूंग इ. खात्यांचा समावेश होता.

८. बदललेल्या आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात भारतीय केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यातील विस्तृत आणि सखोल मिमांसा डॉ. आंबेडकरांनी केली. या ग्रंथाचे महत्त्व आजही अधोरेखीत होते. स्वतंत्र भारताच्या राज्य

घटनेनुसार दर पाच वर्षांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांचे वित्तिय संबंध ठरविण्यासाठी वित्त आयोग नेमला जातो. यांच्या शिफारशीनुसारच केंद्र व राज्य यांच्यामध्ये उत्पन्न व खर्च यांची वाटणी केली जाते.

*दि प्रॉब्लेम ऑफ रूपी इटस् ओरिजीन अ‍ॅण्ड सोल्यूशन* हा डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी लिहिलेला प्रबंध १९२३ साली प्रसिध्द झाला. पुढे १९४७ साली *हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अ‍ॅण्ड बँकींग* या नावाने पुन्हा प्रकाशित करण्यात आला.

सदरच्या ग्रंथामध्ये रुपयाची उत्क्रांती व भारतासाठी आदर्श चलन पध्दती कोणती? यावर प्रकाश टाकला आहे. भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची विवेचना करताना डॉ. आंबेडकरांनी इतर अर्थतज्ज्ञांनी दुर्लक्षिलेल्या सन १८०० ते १८९३ या कालखंडातील भारतीय रुपयाची, चलनाचे परिणाम म्हणून कशी जडणघडण होत गेली, त्याचे सखोल विवेचन केले आहे.

प्रबंधाच्या सुरवातीला भारतातील तत्कालिन चलन पध्दती विषयीचा इतिहास देण्यात आला आहे. ब्रिटीश भारतात येण्यापूर्वी मोगल साम्राज्याच्या काळात भारतातील चलन सोने व चांदी या दोन वेगवेगळ्या धातूंच्या स्वरूपात होते. अशी द्विधातुक चलन पध्दती अस्तित्वात होती. त्यामुळे विनिमयामध्ये अनके अडचणी येत होत्या यातून मार्ग काढण्यासाठी १७९२ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने चलनाबाबत रेग्युलेशन करण्याचे ठरविले. या धोरणानुसार कंपनीच्या काळातील नविन रुपयाचे पूर्ण वजन १८० ट्रॉय गेन्स ठेऊन त्यातील भेसळीचे १/१२ प्रमाण म्हणजे १५ ग्रॅम वजन कमी धरून शुध्द १६५ ग्रॅम चांदीचा रुपया बनविण्याचा निर्णय कंपनीने घेतला पण यामुळे देखिल भारताच्या रुपयाची फारशी स्थिती बदलेली नाही, असे आंबेडकरांनी दाखवून दिले. आंतरराष्ट्रीय पातळीवर चांदीच्या वाढत जाणाऱ्या किंमती व चांदीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध या सर्व घटकांचा भारताच्या रुपयावर विपरीत परिणाम झाला. यावर उपाय म्हणून भारताची पूर्वीची सुवर्ण चलन पध्दती किंमती स्थिर ठेवण्यात कशी उपयुक्त होती हे आंबेडकरांनी दाखवून दिले.

**आंबेडकरांची विकास अर्थनीतिः** स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेसाठी विकासाची अर्थनीति काय असावी याचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी *स्टेटस् अ‍ॅण्ड मायनॉरिटीज* या ग्रंथात केले. यामध्ये त्यांनी गरीबी हटविणे, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता या घटकांचा आग्रह धरला. याकरिता खाजगी क्षेत्राला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहील आणि संपत्तीचे समान वाटप होईल अशा पध्दतीने आर्थिक व्यवहाराचे नियोजन करणे ही राज्य संस्थेची जबाबदारी आहे असे त्यांचे मत आहे.

**भारतातील लहान धारण क्षेत्र आणि उपाय :** डॉ. आंबेडकरांचा शेतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा लेख १९१८ साली प्रसिध्द झाला. लहान धारणक्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसवणारी एक गंभीर समस्या आहेच. परंतु ही लहान धारण क्षेत्रे *विखुरलेली* असल्यामुळे समस्या अधिक बिकट होते. लहान धारण क्षेत्रे व त्यातील विखंडन यामुळे साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करण्यात अडचण निर्माण होऊन उत्पादन खर्च वाढतो, परिणामतः उत्पादकता कमी होते. लहान धारण क्षेत्राचे कारण वारसा हक्क व उपजीविकेसाठी अन्य साधनांचा

अभाव हे त्यांनी दाखवून दिले. शेतकऱ्यांची दयनीय अवस्था दूर करण्यासाठी त्यांनी किफायतशीर धारण क्षेत्रे ही संकल्पना स्पष्ट केली. त्यांच्या मते किफायतशीर धारण क्षेत्र म्हणजे जमीन, भांडवल व श्रम हे सर्व उत्पादक घटक इष्टतम प्रमाणात उपलब्ध असणे होय. कारण तसे झाले तरच एक उत्पादक घटक इतर घटकांच्या सहाय्याने अधिकतम योगदान करू शकतो अशा तऱ्हेने किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे नुसते जमिनीचे आकारमान नसून, धारण क्षेत्र आणि कार्यक्षम मशागत करण्यासाठी आवश्यक असलेली इतर साधन सामग्रीचा मिलाफ होय. जमीन धारणेचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी शेती हा महत्वपूर्ण उपाय सुचविला.

ग्रामीण भागातील अस्पृश्यता, श्रमविभागणी, श्रमिकांची गतीक्षमता श्रमाची प्रतिष्ठा इत्यादी बाबतही त्यांनी व्यापक विचार मांडले. खेड्यातील कृत्रिम स्वरूपाच्या श्रमविभागणी मुळे श्रमिकांना त्यांच्या व्यवसायात बदल करता येत नाही. त्याचप्रमाणे श्रमिकांना, शोषितांना अस्पृश्यतेमुळे परंपरागत स्वरूपाचा व्यवसाय किंवा कामे करावी लागतात. श्रमिकात सौदाशक्ती खूपच कमी असते. त्यामुळे श्रमिकांना कमी वेतनावर काम करावे लागते व परिणामी त्यांचे आर्थिक शोषण होते. ग्रामीण भागातील किंवा ग्रामीण समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी ही प्रतिष्ठित श्रमाशी निगडित होती. खेड्यातील अस्पृश्य, शोषित, पीडीत अशा समुहाच्या आर्थिक उन्नतीमुळे अस्पृश्यतेचे उच्चाटन होण्यास मदत होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

आर्थिक गुलामगिरीचे पाश तोडण्यासाठी व ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परंपरागत स्वरुपाची चौकट मोडीत काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी क्रांतीकारक स्वरुपाचे आर्थिक विचार मांडले. त्यांच्या मते जोपर्यंत परंपरागत स्वरूपाची ग्रामीण अर्थव्यवस्थेची चौकट उखडणार नाही, तोपर्यंत दलित, अस्पृश्य, शोषित यांच्यावरील अन्यायाच्या व अत्याचाराच्या समस्यांची उकल होणार नाही. देशातील जमीनसुधारणा विषयक कायदे, कुळकायदे, भूदान चळवळ, सहकारी शेती यासारख्या विविध मार्गांनी किंवा उपायांनी परंपरागत स्वरुपाची आर्थिक रचना कितपत बदलणार आहे याविषयी डॉ. आंबेडकर साशंक होते. विशेषत: जमीन सुधारणा कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेला ग्रामीण भागातील जमीनदारांचा विरोध होता. याकरिता शेतजमिनींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले पाहिजे असा क्रांतिकारक विचार त्यांनी मांडला. त्यांच्या आर्थिक विचारातून दलितांना, शोषितांना नवा आशावाद प्राप्त झाला असे म्हणता येईल.

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारात समाजवादी समाजरचनेचा आधार दिसतो. त्यांच्या मते उत्पादन साधनांवर सरकारची पूर्ण मालकी प्रस्थापित झाली म्हणजे जनतेचे पूर्ण कल्याण होईलच असे नाही. आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण टाळणे व संपत्तीचे योग्य वाटप हे अतिशय महत्वाचे उपाय जनतेच्या कल्याणासाठी आवश्यक असतात. समाजवादी अर्थव्यवस्थेत आर्थिक शोषण किंवा पिळवणूक या घटकास वाव नसतो. आर्थिक शोषण ही प्रक्रिया भांडवलशाही अर्थव्यवस्थेत गतिमान झालेली असते. कार्ल मार्क्स प्रमाणेच डॉ. आंबेडकरांनी भांडवलशाहीवर टीका केली. परंतु

भांडवलशाहीच्या उपायाबाबत त्यांनी मार्क्स पेक्षा वेगळा विचार मांडला. त्यांच्या मते साम्यवादी अर्थव्यवस्थेप्रमाणे उत्पादनाची पूर्ण मालकी सरकारकडे असावी असे नाही. लोकशाहीच्या चौकटीत समाजवादी समाज रचना प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा अशी त्यांची अपेक्षा होती. देशातील शेतजमिनीवर पूर्णपणे सरकारची मालकी असावी, म्हणजेच शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे हा अतिशय महत्वाचा विचार त्यांनी मांडला.

आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा विचार केल्यास असे दिसून येते की, परकीय राजवट असताना त्यांनी आर्थिक बाबतीत राष्ट्रवादी भूमिका घेतली होती. त्यांचे एकूण विचार ब्रिटीशकालीन नियमांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर व समाज व्यवस्थेवर प्रकाश टाकणारे आहेत. त्यांनी मूलभूत तत्कालीन आर्थिक पेचप्रसंगाचा आढावा घेताना महत्वपूर्ण उपाय सूचविले आहेत. त्यातील अनेक उपाय आजही भारतीय अर्थव्यवस्थेस मार्गदर्शक ठरत आहेत.

*संदर्भग्रंथ सूची:*


१) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-३२

२) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे*, डॉ. आंबेडकर चरित्र साधने : प्रकाशन समिती उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन - २००५

३) *अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर*, प्राचार्य बी. एस. काळे, मनोकामना प्रकाशन, इस्लामपूर.


## अभिनंदन

मराठीतील संदर्भ साहित्याला ललामभूत ठरलेल्या मराठी विश्वकोशाच्या नव्या आवृत्तीचे काम महाराष्ट्र शासनाने आता हाती घेतले आहे. कोशातील अर्थशास्त्र विषयातील विविध नोंदींचे नव्याने लेखन, पुनर्लेखन, संपादन, सुसूत्रीकरण, त्यासाठी जरूर ते मार्गदर्शन व सल्ला मसलत अशा कामांसाठी एका ज्ञान मंडळाची स्थापना शासनाने केली आहे. त्याचे समन्वयक म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त डॉ. संतोष दास्ताने यांची शासनाने नुकतीच नेमणूक केली आहे. त्यांच्या या नव्या जबाबदारीबद्दल परिषदेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार

दीपक विठ्ठल भुसारे, पैठण,
सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
अर्थशास्त्र विभाग, प्रतिष्ठान महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४०५२७६३२०
ई-मेल: dr.deepak.bhusare@gmail.com

---

प्रस्तावना:

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक फार मोठे अर्थशास्त्रज्ञ ही होते. त्यांचे आर्थिक विचार अत्यंत मौलीक असे होते. आपण त्यांची १२५ वी जयंती निमित्त हा विशेषांक काढत आहोत ही खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना खरी आदरांजली असेल. त्यांचे आर्थिक विचार आजही पुरेशा प्रमाणात समाजापर्यंत पोहोचलेले नाहीत म्हणून परिषदेच्या माध्यमातून आपण ते करत आहोत ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. डॉ.आंबेडकरांनी लिहिलेली भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वोत्तम राज्यघटना मानली जाते यावरून त्यांची विद्वत्ता, त्यांचे कार्य लक्षात येते. भारतीय दीनदुबळ्या, दलित, आदिवासी, महिला या सर्व बहुजनांसाठी त्यांनी फार मोठे कार्य केले आहेत. प्रस्तुत लेखात त्यांनी मांडलेल्या शेती विषयक विचाराचा उहापोह करण्यात आला आहेत. यासाठी दुय्यम साधनांचा वापर करून हा लेख लिहिण्यात आला आहे.

डॉ.आंबेडकरांनी सैद्धांतिक आणि व्यावहारिक आर्थिक प्रश्नावर अत्यंत दर्जेदार अर्थशास्त्रीय मांडणी केली आहेत. डॉ.आंबेडकर हे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, कायदा, तत्त्वज्ञान, मानववंशशास्त्र व अर्थशास्त्र इत्यादी विषयात ते पारंगत होते. परंतु त्यांचे अर्थशास्त्रावरील लिखाण आणि त्या विषयाला दिलेले योगदान खूप मोलाचे आहे. त्यांनी अर्थशास्त्रातील M.A., Ph.D, MSc., D.Sc. या पदव्या इग्लंड, अमेरिका व जर्मनीतील नामांकित विद्यापीठातून मिळविल्या आहेत. M.A. ही पदवी १९१५ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून प्राप्त केली. त्यासाठी त्यांनी Ancient Indian Commerce हा प्रबंध लिहीला होता. जून १९१६ मध्ये याच विद्यापीठाने त्यांच्या National

Dividend of India A Historical and Analytical Study या प्रबंधास Ph.D. ही पदवी प्रदान केली. १९२१ मध्ये लंडन विद्यापीठातून त्यांच्या Provincial Decentralizaion of Imperical Finance in British India या प्रबंधास M.Sc. ही प्राप्त झाली. ऑक्टोबर १९२२ मध्ये The Problem of the Rupee या प्रबंधास D.Sc. ही अर्थशास्त्रातील सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली. डॉ.आंबेडकरांना प्रा.सेलीग्मन व डॉ.कॅनन या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाचे मार्गदर्शन लाभले होते. आंबेडकरांनी आठ वर्षात (१९१५-१९२३) अर्थशास्त्रातील सर्वोच्च चार पदव्या अमेरिका व इंग्लंड या देशांतील नामांकित विद्यापीठातुन प्राप्त केल्या. आंबेडकरांच्या जन्मशताब्दी निमित्त अमेरिकेत एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली त्यामध्ये एक लेखकाने Why not nobel to Dr.B.R.Ambedkar या नावाचा लेख १९९१ मध्ये लिहिला होता. डॉ.आंबेडकर भारतात आल्यानंतर ते मुंबईतील सिडनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून विद्यार्थीप्रिय होते. त्यानंतर सयाजी महाराजांनी डॉ.बाबासाहेबांना आपल्या संस्थानाचे अर्थमंत्री म्हणून नियुक्त करण्याची इच्छा व्यक्त केली होती. डॉ.आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी लॉर्ड जे.एम.केन्स व कार्ल मार्क्स या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांच्या विचारातील त्रुटी नोंदविल्या होत्या. २००४ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाला २५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त सीपा या संस्थेने जगाला बदलणाऱ्या या विद्यापीठातील ५० विद्यार्थ्यांची यादी तयार केली त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव प्रथम आहे ही आम्हा भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. डॉ.बाबासाहेबांनी अर्थशास्त्रातील एखादा सिद्धांत मांडला नसला तरीही त्यांनी मांडलेले अर्थिक विचार हे त्या सिद्धांतापेक्षा निश्चितच उच्च आहे. भारतामध्ये १९३४ मध्ये भारतीय रिझर्व्ह बँक निर्मितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे मोलाचे योगदान आहेत.

**डॉ.आंबेडकराचे शेती विषयक विचार:**

डॉ.बाबासाहेबांचे कृषी क्षेत्राविषयीचे विचार अत्यंत मौलीक आहेत. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. यासाठी डॉ.आंबेडकरांनी भारतीय अल्पभूधारण क्षेत्र व त्यावरील उपाय (Small Holding in India and their Ramedies) नावाचा शोधनिबंध The Journal of Indian Economics Society च्या अंकात १९१८ ला प्रसिद्ध केला होता. यामध्ये त्यांनी शेतीच्या धारणक्षेत्राचा प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या मते विभाजन, उपखंडन व अल्पधारणक्षेत्र ही भारतीय शेतीची गंभीर समस्या आहेत. विभाजन व उपखंडणास वारसा हक्क कारणीभूत आहेत हे आंबेडकरांना मान्य नव्हते त्यांच्या मते, जमिनीवर पडत असलेले प्रचंड लोकसंख्येचा भार हे मुख्य कारण आहेत. त्यांच्या मते भारतीय शेतीच्या धारणक्षेत्राचा आकार वाढविणे हा भारतीय शेती समस्येवर उपाय नसू शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करून तत्सम साध सामुग्रीची उपलब्धता वाढविणे हा खरा उपा आहे. आजही भारतीय शेतीमध्ये शेतकऱ्यांच्य आत्महत्या थांबविण्यासाठी शेतीमध्ये प्रचंड गुंतवणूक केली पाहिजे हा डॉ. बाबासाहेबांचा शेतीविषयक विचार आजही लागू पडतो. वतनदारी पद्धती नष्ट झाल्याशिवाय वतनदारांचा विकास शक्य नाही असे डॉ. आंबेडकराचे मत होते. पूर्वी

प्रत्येक गावात वतनदारांची संख्या मोठ्या प्रमाणात होती त्यांनी १९३७ मध्ये मांडलेल्या विधेयकात कोणावरही वतन सोडण्याची सक्ती नव्हती. तरी वतने नष्ट झाली पाहीजे असे त्यांचे मत होते. खोत सारख्या जाचक पद्धतीवर देखील डॉ.आंबेडकरांनी विरोध केला. १९०० सरकारने खोत पद्धतीत सुधारणासाठी बिल आणले त्याला लोकमान्य टिळकांनी केसरीत अग्रलेखाची मालिका लिहून विरोधाचे कारण ते स्वत: खोत होते. त्यानंतर दि.१७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई कायदेमंडळात हे विधेयक म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात देशात करण्यात आलेल्या जमीन सुधारणा विषयक कायद्याची नांदीच होय.

**जलसिंचन प्रकल्प:**

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या क्षेत्राचा विकासासाठी जलसिंचनाचे प्रकल्प खूप महत्त्वाचे आहेत म्हणून दामोदर नदी प्रकल्पामध्ये डॉ.बाबासाहेबांचे योगदान मोलाचे आहे. दामोदर नदीच्या पुरामुळे हजारो लोकांचे प्राण जात होते. हा प्रकल्प हाती घेतला तर जलसिंचन, वीजनिर्मित्ती, पूरनियंत्रण व जलवाहतूक असे अनेक फायदे प्रकल्पामुळे मिळतील असे भाषण १९४४ मध्ये बंगाल सरकारने स्थापन केलेल्या नदीपूर चौकशी कमेटी समोर मंजूर प्रतिनिधी म्हणून डॉ.आंबेडकरानी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली खोरे प्राधिकरण स्थापन करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू होते. त्यामुळे दामोदर नदी प्राधिकरण, सोन नदी खोरे प्राधिकरण, महानदी, चंबळ, कोसी आणि दख्खन नद्यांचे प्राधिकरण स्थापन करण्याचे काम हाती घेतले होते. डॉ.बाबासाहेबांनी नदीजोड प्रकल्पांची संकल्पना पहिल्यांदा मांडली. मात्र हा प्रकल्प आपल्याला आज ही महत्वाचा वाटत नाही. आज महाराष्ट्र पाण्यासाठी व्याकुळ झाला आहे. हजारो शेतकरी आत्महत्या करत आहेत. जर डॉ.बाबासाहेबांचे नदीजोड प्रकल्प विषय विचार तेव्हापासून अंमलबजावणी सुरू केली असती तर आज भारतातील सर्व नद्या जोडल्या गेल्या असत्या याचा फायदा भारतातील कृषी क्षेत्राला होऊन आमचा बळीराजा सुखी झाला असता. परंतु डॉ.बाबासाहेबांचे नदीजोड प्रकल्पांचे विचार अद्यापही अंमलबजावणी करता येत नाही हे दुर्दैव आहे.

डॉ.बाबासाहेबांच्या परिश्रमानंतर दामोदर नदीवरील धरण पूर्ण झाले. त्यावेळी पाटबंधारे मंत्री न. वि. गाडगीळ होते. मात्र धरण उद्घाटन समारंभाच्या कोनशिलेवर डॉ.बाबासाहेबांचे नाव नव्हते हे अत्यंत खेदाने नमूद करावे लागते. त्यामुळे डॉ.बाबासाहेब हे फक्त भारतीय घटनेचे शिल्पकारच नव्हते तर देशातील जलनीति प्रकल्पाचे देखील शिल्पकार होते.

**सामुहिक शेती:**

भारतातील शेतकरी शेती करत असतांना व्यक्तीगत पातळीवर करतो परंतु डॉ.आंबेडकरांच्या मते, शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी व अधिक लोकांना रोजगार देण्यासाठी शेती सामुहिक पद्धतीने करणे आवश्यक आहे. ज्या समाजाकडे शेत नाहीत व शेतमजूर म्हणून काम करतात अशा समाजाचे भविष्य काय? डॉ.बाबासाहेबांची समाजवाद ही कल्पना दुर्बल वर्गाचे दारिद्र्य दूर करण्यासाठी होती. सरकारने पडीत जमिनी भूमीहीन शेतमजूरांना हस्तांतरीत करावी. अस्पृश्य हे भूमिहीन असल्यामुळे त्यांना कुळकायद्याचा

काहीही फायदा झाला नाही त्यामुळे डॉ.आंबेडकरांना सामुहिक शेतीचा आग्रह धरला होता. यामुळे जमिनीची उत्पादकता व कार्यक्षमता वाढण्यास मदत होते. असे झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थामध्ये सुधारणा होऊ शकतात. शेतीची सामुहिक मालकी व कार्ल मार्क्सच्या शेतीचे राष्ट्रीयीकरण यापेक्षा भिन्न आहेत. मार्क्सच्या शेतीच्या राष्ट्रीयीकरणात जमिनीची मालकी ही राज्य शासनाकडे जाते ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नव्हते. कारण मालकी राज्य शासनाकडे गेल्यास राज्य शासनाची हुकूमशाही वाढेल ते डॉ.आंबेडकरांना मान्य नव्हते. आंबेडकराच्या मते सामुहिक शेती म्हणजे राज्यात उपलब्ध असलेल्या शेतीचे समान प्रमाणात वाटप करावे त्यामध्ये कोणताही जातीभेद न ठेवता समान प्रमाणात वाटप करावे शेतीसाठी लागणारा खर्च उदा. बी-बियाणे, खते हे राज्य शासनाने पुरवावे आणि शेतीत उत्पादन निघाल्यानंतर ते उत्पादन सरकारने सगळ्यामध्ये समान प्रमाणात वाटप करावे यामुळे देशातील आर्थिक विषमता व दारिद्र्य आपोआप नष्ट होईल डॉ.आंबेडकरांचे हे विचार आजही शेतीसाठी लागू पडतात. आजही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते. जर सामुहिक पद्धतीने शेती केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल व शेतकरी आत्महत्या देखील होणार नाही. परंतु आजचे जमिनदार या पद्धतीला विरोध करतील आपल्या अर्थव्यवस्थेची वाटचाल भांडवलशाहीकडे सुरू आहेत. देशातील भांडवलदार कवडीमोल भावात शेतकऱ्याकडून जमीन हस्तगत करून त्यांना देशोधडीला लावत आहेत. यामुळे सरकारने याविषयी लवकर पाऊल उचलणे आवश्यक आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना समितीच्या अखेरच्या भाषणात म्हणाले होते की, उद्यापासून आपण विसंगतीपूर्ण जगात प्रवेश करणार आहोत कारण आपल्या देशात आता राजकीय लोकशाही येईल मात्र आर्थिक सामाजिक समते शिवाय राजकीय लोकशाहीला खरा अर्थ प्राप्त होवूच शकत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व सामान्य शेतकरी, मजूर यांच्यासाठी १९३६ मध्ये स्वतंत्र्य मजूर पक्षाची स्थापना केली. यापक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांच्या हिताची काळजी व हक्काचे कार्य या पक्षांनी अंगीकृत कार्य ठरविले होते. १० जानेवारी १९३८ रोजी याच पक्षाच्या वतीने कोकण, सातारा, नाशिक जिल्ह्यातील २८ ते ३० हजार शेतकऱ्यांचा मोर्चा असेंब्ली हॉलवर काढण्यात आला होता. या मोर्चाचे नेतृत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. या मोर्चामध्ये शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक मागण्या डॉ.बाबासाहेबांनी सरकार समोर मांडल्या होत्या त्यामध्ये प्रामुख्याने शेतसारा कमी करणे, जुने कर्ज माफ करणे, शेतमजूरांची किमान मजूरी ठरविणे, सावकारांवर बंधने घालावी अशा अनेक मागण्या शेतकरी व शेतमजुरांच्या हितासाठी मांडल्या.

मात्र शेतकऱ्यांचे दुर्दैव आजही त्यांच्या मागण्यासाठी शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागत आहे. ह्या मागण्या पूर्ण होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येचा मार्ग स्वीकारावा लागत आहे. म्हणून भारत सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १२५ जयंती साजरी करतांना जर त्यांना खरंच आदरांजली वाहायची असेल तर शेतात राबणारा कष्टकरी शेतकरी, शेतमजूर व

कामगार यांच्या हिताचा निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, शेतमजुरांनी किमान वेतन द्यावे, तरच खऱ्या अर्थाने सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषयक विचार जर सरकारने अंमलबजावणी केल्यास देशाच्या कोणत्या भागात दुष्काळ पडणार नाही. नदी जोड प्रकल्प हा शेतीसाठी नवसंजीवनी आहे. आज सरकार दुष्काळावर हजारो कोटी रुपये खर्च करून मलमपट्टी करत आहे मात्र यासाठी कायमस्वरूपी उपाय योजना करत नाही. म्हणून माझी महाराष्ट्र व भारत सरकारला विनंती आहे, देशात व राज्यात नदीजोड प्रकल्प सुरूवात करा, सगळीकडे सुजलाम सुफलाम होईल. तीच खरी आदरांजली भारतरत्न अर्थशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना असेल. या महामानवाच्या १२५ जयंतीनिमित्त त्यांच्या विचाराला व कार्याला अभिवादन करतो.

**संदर्भग्रंथ सूची:**


१) प्रा.सोमवंशी बी.सी., २०१२, *अर्थशास्त्र : डॉ.बी.आर.आंबेडकर*, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१४-१७, ३७-४०.

२) डॉ.सुखदेव थोरात, २००५, *डॉ.बाबासाहेब आंबेडकर नियोजन जल व विद्युत विकास भूमिका व योगदान* अनुवादक डॉ.रमेश दांडगे, सुगावा प्रकाशन पुणे, पृ.५, ४०, ४२.

३) डॉ.विजय कविमंडन, १९९३ *आर्थिक विचारांचा विकास*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.४०९.

४) प्रा.रामखेलकर व डॉ.दामजी, २०११,*'आर्थिक विचारांचा इतिहास*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ.३०८, ३०९.

५) M.K. Dongre, 1974, *Economic Thonghts of Dr.B.R.Ambedkar*, Page 5-7.


## अभिनंदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद, भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी आर्थिक सल्लागार, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांची राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

**सुमित्रा विजय पवार, भुसावळ,**
सहयोगी प्राध्यापिका,
श्रीमती प.क. कोटेचा महिला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२०१५५३०८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त समाजशास्त्रज्ञ राजनितीज्ञ, संविधानकर्ते नव्हते, तर एक जागतिक दर्जाचे अर्थशास्त्रज्ञही होते. त्या काळात प्रचलित अर्थशास्त्रज्ञांच्या अर्थविषयक सिध्दांतांची त्यांनी चिकित्सा करुन त्यांच्यातल्या गुण-दोषांचे अत्यंत परखडपणे विवेचन केले. म्हणूनच ते एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ होते. १९१८ मध्ये त्यांच्या अर्थविषयक पैलूंच्या आधारे सिडनेहॅम या अमेरिकेतील महाविद्यालयात त्यांची अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या अलौकिक बुध्दिमत्तेमुळे या महाविद्यालयातील सर्वात लोकप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान भारताच्या समाज जीवनात उच्च प्रतिचे आहे. त्यांचा नावलौकिक अर्थतज्ज्ञ म्हणून झाला. कोलंबिया विद्यापीठात एम.ए. साठी प्राचीन भारतीय व्यापार व पी.एच्.डी.साठी ब्रिटीश हिंदुस्थानातील प्रांतिक अर्थरचनेची उत्क्रांती असे त्यांचे विषय होते. त्यांच्या आर्थिक विचारात भारतीय अर्थव्यवस्था विकास प्रक्रियांकडे नेणे आव्हानात्मक आहे. त्यांनी आपल्या आर्थिक विचारात शेती, उद्योग, चलनविषयक विचार, आर्थिक नियोजन, कामगार विषयक विचार मांडलेले आहेत.

**चलनविषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२३ मध्ये *रुपयाची समस्या-तिचे मुळ आणि त्यावरील उपाय* हा अर्थशास्त्रीय प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये सादर केला. या प्रबंधाचा कालावधी १८०० ते १८९३ असा होता या कालावधीत भारतात इंग्रजांचे राज्य होते. सर्व जगात सुवर्ण विनिमय परिणाम पध्दतीचा अवलंब केला जात होता. या काळात इंग्रजाच्या साम्राज्यवादी धोरणामुळे सुवर्णाचे आणि रुपयाचे मूल्य सतत बदलत असल्यामुळे त्याचा परिणाम वस्तूंच्या किंमती आणि रुपयाची क्रयशक्ती सतत घसरत होती. त्यात

सर्व सामान्य आणि गरीब जनता होरपळून निघत होती. या समस्यांचे मूळ कारण शोधण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या प्रबंधात प्रयत्न केला आहे.

या प्रबंधात डॉ. आंबेडकरांनी भारतीय चलन व्यवस्थेचे मूल्यांकन करतांना चलनांच्या मूल्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या बदलामुळे मुद्रेची स्थिरता कायम राखण्यास भारतातील इंग्रज सरकार अयशस्वी ठरण्याचे मत नोंदविलेले आहे. डॉ. आंबेडकरांचे हे विचार आजदेखील खरे ठरलेले आहेत असे कोलंबिया विद्यापीठातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. एडविन कॅनान यांचे मत होते.

या प्रबंधनात डॉ. आंबेडकरांनी रुपयाची जी समस्या सांगितली आहे, तिचे मूळ भगवान बुध्दांनी सांगितलेल्या प्रतित्य सम्मुत्पादाच्या सिध्दांतामध्ये आहे.

धन हे मानवी श्रमाचे त्याच्या इच्छा आकांक्षा व हिताचे केंद्रबिंदू आहे. प्रतित्य सम्युत्पाद तत्वाद्वारे त्यात क्षणोक्षणी बदल होत असतो. त्याचा परिणाम व्यवहारात नफा किंवा तोटा होत असतो ते टाळण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रबंधनात स्थिर चलनमुद्रा ही संकल्पना मांडली यासाठी शुध्द सुवर्णानंतर रौप्य या धातूला महत्त्व दिले परंतु प्रतित्य सम्युत्पाद सिध्दांताद्वारे चलन धातुमध्ये अत्यंत बदल होत राहणे अटळ आहे. हेच शेवटी डॉ. आंबेडकरांनी आपल्या प्रबंधात स्पष्ट केले आहे.

कागदी चलनव्यवस्था पूर्णत: शुध्द सुवर्ण प्रतिभूती आणि विदेशी चलन यांच्या आधारावर निर्गमित करु नये. त्यात सरकारला अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल. त्यावर उपाय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुद्रेला मर्यादा घालून तिला परिवर्तित करण्याकरिता मुद्रा (नोटा) निर्गमित करण्याच्या सरकारी अधिकाराने कायद्याच्या मर्यादेत बांधून रुपयाच्या निर्गमनाची जबाबदारी स्वीकारावी. डॉ. आंबेडकरांचे हे विचार आजच्या काळातही संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला लागू होत आहेत. त्यांनी मर्यादित चलन निर्मितीच्या आधारावर अपरिवर्तनीय चलनाला प्राधान्य दिले. सुवर्ण चलन पध्दतीत लवचिकता आहे परंतु लवचिकता हे दुधारी शस्त्र आहे, तो जेवढा चांगला गुणधर्म आहे तेवढाच वाईट देखील आहे. सुवर्ण चलन पध्दतीत अर्थव्यवस्थेत किती चलन निर्मिती व्हावी हे सरकारच्या मर्जीवर असते. त्यामुळे चलन फुगवटा आणि त्यामुळे भाववाढ होऊन सामान्य माणसांना जीवन जगणे कठिण होते आणि सार्वजनिक स्थैर्य हिरावू शकते. हे टाळायचे असेल तर चलननिर्मितीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता असते. या दृष्टीने सुवर्ण चलन पध्दती ऐवजी अपरिवर्तनीय कागदी चलनपध्दती योग्य ठरते असे त्यांनी म्हटले

### शेती विषयक विचार:

१९१८ मध्ये आंबेडकरांचा The Jourral of Indian Economics Society's Small Holdings in India and Their Remedies हा लेख प्रकाशित झाला त्यात त्यांनी म्हटले की भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे. प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व सर्वात जास्त आहे. या शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा महत्वपूर्ण घटक म्हणजे धारण क्षेत्राचा आकार होय. भारताच्या बाबतीत दिसून येणारी गंभीर परिस्थती म्हणजे धारणक्षेत्र छोटी तर आहेतच शिवाय ती विखुरलेली आहेत. म्हणजे

हा प्रश्न केवळ उपविभाजनाचा नसून उपखंडनाचा सुध्दा आहे. यावर उपाय म्हणजे एकत्रित धारण क्षेत्रे हवी. या बाबीकडे कोणी फारसे लक्ष देत नाही. छोटी आणि लहान धारण क्षेत्र ही आपली मुख्य समस्या आहे. त्यामुळे एकत्रीकरण करणे पुरेसे नाही, तर त्याचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर करणेसुध्दा महत्वाचे आहे. एकत्रीकरणामुळे विखुरलेल्या धारणक्षेत्राचा प्रश्न सुटेल. पण छोट्या धारणक्षेत्रांचे प्रश्न मात्र दूर होणार नाहीत त्यासाठी धारणक्षेत्राचा विस्तार करुन आर्थिक आकारावर भर असायला हवा. तसेच एकत्रीकरण करुन प्रश्न सुटेल, पण छोट्या धारणक्षेत्राचे दुष्परिणाम मात्र दूर होणार नाही. त्यासाठी क्षेत्राचा विस्तार करणे यात शेतीचे महत्व आहे. या शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा महत्वपूर्ण घटक म्हणजे धारण क्षेत्राचा आकार होय. भारताच्या बाबतीत दिसून येणारी गंभीर परिस्थिती म्हणजे धारणक्षेत्र छोटी तर आहेतच शिवाय ती विखुरलेली आहेत. एकत्रीकरण झाल्यावर पुन्हा भविष्यात तुकडे होणार नाहीत याची काळजी घेणेसुध्दा आवश्यक आहे. हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील वारसा हक्काचे कायदे उपविभाजनासाठी प्रामुख्याने जबाबदार आहेत. हे कायदे तसेच राहिले तर पुन्हा तुकडे होतील म्हणून ज्या उपविभाजनामुळे धारणक्षेत्राचा आकार अकिफायशीर असेल, तर त्याला कोर्टाने परवानगी नाकारावी. त्या दृष्टीने सिव्हिल प्रोसिजर कोड मध्ये सुधारणा व्हाव्यात, अशा महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी केल्या.

**शेतमजुरासंबंधी विचार:**

ग्रामीण भागातील शेतमजुरांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी औद्योगिक कामगारांना जे फायदे मिळतात तेच शेतमजुरांनासुध्दा मिळायला पाहिजे. भविष्य निर्वाहनिधी नुकसान भरपाई, आरोग्य विमा या सारख्या योजना लागू करण्याची शिफारस केली.

**औद्योगिकरण:**

उद्योगधंदे हे सरकारच्या मालकीचे असावेत अशी त्यांची भूमिका होती. त्यासाठी राज्याची व्यवस्था व राज्याच्या मालकीची तत्वे स्वीकारली पाहिजेत असे त्यांचे म्हणणे होते सामाजिक विमा, नोकरीतून काढून टाकण्यावर नियंत्रण ठेऊन कामगारांना शाश्वती वाटणे या गोष्टी उद्योग धंद्याच्या वाढीसाठी आवश्यक समजल्या जातात. परंतु त्याचबरोबर गरीब तसेच मध्यमवर्गाचेही रक्षण केले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. केवळ शेतीमुळे भारताचा विकास होणार नाही असे त्यांचे मत होते.

भारताच्या जलद औद्योगीकरणासाठी जर आपण भांडवलशाहीप्रमाणे खाजगी क्षेत्राला प्राधान्य दिले तर विकासाबरोबर संपत्तीच्या वाटणीतही विषमता वाढेल मूलभूत उद्योगांवर तर राज्यांचेच नियंत्रण असावे असे त्यांचे मत होते.

**औद्योगिक कामगारांसंबंधी विचार:**

औद्योगिक कामगारांचे प्रतिनिधी म्हणून ते दोन वेळेस गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी समितीचे सभासद होते. त्यांनी जे कामगार कायदे करण्यात योगदान दिले ते म्हणजे त्या काळात कारखाना कायद्यात बदल करण्यात आला. कामगारांना आठवडयात सुटी व त्यांच्या पगाराची तरतूद करण्यात आली. या कायद्यांचा उद्देश कामगारांचे जीवनमान उंचावणे हा होता. कामगारांना योग्य भोजन, व्यवस्थित कपडे, शिक्षण, कामगार कल्याण फंड, कामगारांना

व्यवस्थापनात सहभाग, नोकरी नोंदणी कार्यालय, सामाजिक सुरक्षा विमा इ. गोष्टींसाठी ते नेहमीच आग्रही राहीले.

## मिश्र अर्थव्यवस्था:

खाजगी उद्योजक नेहमी स्वत:चे हित साधण्यासाठी आर्थिक निर्णय होत असतात. त्यामुळे गरीब कष्टकरी जनतेवर त्याचे विपरीत परिणाम होत असतात म्हणून त्यांना देशाच्या आर्थिक बाबींमध्ये सरकाराच्या हस्तक्षेप मान्य होता. त्यांनी असे म्हटले की, महत्वाच्या उद्योग धंद्याची मालकी सरकारची असली पाहिजे. उदा. वीज उत्पादन व पुरवठा, शिक्षण, पाणी पुरवठा, रेल्वे व्यवसायासाठी बँक, विमा इ. जे उद्योगधंदे व सेवाक्षेत्र कमी महत्वाची आहेत त्यांची मालकी खाजगी क्षेत्राकडे असावी म्हणजेच त्यांना मिश्र अर्थव्यवस्था अभिप्रेत होती.

## सार्वजनिक आयव्यय:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिक आयव्ययाचे तीन भागात वर्गीकरण केलेले आहे. १. ब्रिटीश साम्राज्याचा आयव्यय २. घटक राज्याचा आयव्यय ३. स्थानिक आयव्यय या बाबतीत घटक राज्यांना स्वायत्तता असावी असे त्यांचे मत होते. परंतु देशाच्या एकात्मतेचा विचार करता केंद्र सरकार श्रेष्ठ असावे असेही त्यांना वाटत होते. त्यावेळी खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार घटक राज्यांकडे असायचा परंतु त्यासाठी लागणारा पैसा उभारण्याची जबाबदारी केंद्र सरकारची असायची. त्यामुळे साहजिकच घटक राज्यांच्या मागण्या वाढत गेल्या या मागण्यांची योग्य अयोग्यता तपासण्याची यंत्रणा नसल्यामुळे केंद्र सरकारला गैरवाजवी मागण्या सुध्दा मान्य कराव्या लागत यांचा अर्थ डॉ. आंबेडकरांनी बारकाईने अभ्यास केला. राज्य सरकार व केंद्र सरकारचे स्वतंत्र अर्थसंकल्प मांडण्याची पध्दत त्यांनीच मांडली म्हणून आज आपल्या देशात केंद्राचा स्वतंत्र अर्थसंकल्प व राज्य सरकारचा स्वतंत्र अर्थ संकल्प मांडला जात असतो.

## आर्थिक नियोजन:

आर्थिक नियोजन हे श्रमिक आणि कामगार प्रेरित असावे, तसेच दलितांकरीता वेगळी उपाययोजना असावी. श्रामिक आर्थिक नियोजन आवश्यक आहे यात पुरेसे अन्न, वस्त्र, निवारा, शांतता शिक्षण, चांगले आरोग्य इ.चा. समावेश आहे.

## महिलांना रोजगार व समानसंधी:

डॉ. आंबेडकरांनी महिलांना आर्थिक अधिकार देण्यासाठी कामगारांच्या संदर्भातील कायद्यावर प्रकाश टाकला. समान वेतन, समान लाभ मिळाला पाहिजे घटनेत त्यांनी स्त्रियांना व पुरुषांना समान स्वातंत्र्य व अधिकार दिलेले आहेत. रोजगार व आर्थिक क्षेत्रात कोणताही भेदभाव न करण्याचा उल्लेख आहे. वेठबिगारीला कडाडून विरोध करुन वेठबिगारी हे गरिबीचे मूळ कारण त्यांनी म्हटले आहे. कारण वेठबिगारी प्रथेचा उद्देश केवळ दासाप्रमाणे गुलामाप्रमाणे काम करुन घेणे, एवढाच मर्यादित नव्हता. परंतु वंशपरंपरेनुसार उदरनिर्वाहासाठी काम स्वीकारणे हाही एक वेठबिगारीचा भाग आहे. मुले व स्त्रियांना वेठबिगारी करावयास लावणे हा देखील एक सामाजिक अपराध आहे असे मानत. स्त्रिया समाजाचा आधार आहेत. विज्ञानातील प्रगती स्त्रियांची देणगी आहे. कुटिरोद्योग कला कौशल्याचा विकास स्त्रियांनी केलेला आहे.

## निष्कर्षात्मक अभिप्राय:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेतल्यानंतर असे निष्कर्ष काढता येतात की, त्यांच्या आर्थिक विचारांना नैतिक अधिष्ठान आहे. कोणत्याही आर्थिक प्रयत्नांचा विचार करतांना सामान्य गरीब माणसाचे हित केंद्रस्थानी होते.

लोकशाही प्रणित समाजाची निर्मिती हे डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे एक उद्दिष्ट मानले जाते. शेती विकास औद्योगिकरण, रोजगार निर्मिती कामगार चळवळ, लोकसंख्येचा प्रश्न, शिक्षण, विदेशी व्यापार, बँकीग इ. विषयामध्ये त्यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय विचारवंताच्या एक आगळ्यावेगळ्या स्थानावर आहेत. १९१८ ते १९५६ अशी जवळजवळ चार दशके वैचारिक कारकिर्द लाभलेल्या डॉ. आंबेडकरांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील विचार अजरामर आहेत. परंतु त्यांचे आर्थिक विचारही अधिक महत्वाचे आहेत. समता व न्यायावर आधारित अर्थशास्त्रच चिरंतन विकासाकडे नेऊ शकेल असा वैचारिक मार्ग त्यांनी आपला योगदानाने दर्शविला आहे.

रोजगार निर्मिती, कामगार चळवळ, लोकसंख्येचा प्रश्न, शिक्षण, विदेशी व्यापार, बँकींग आणि चलनविषयक धोरण, केंद्र व राज्य वित्तीय संबंध, वीज व पाणी पुरवठा इ. विषयांमध्ये त्यांनी मोलाची कामगिरी केलेली आहे. सरकारने भारतातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणाच्या योजना राबविल्या, त्याचे सर्व श्रेय डॉ. आंबेडकरांना जाते. डॉ. आंबेडकरांनी स्त्री शक्तीचे सृजनात्मक स्वरुप राष्ट्राच्या विकासाशी जोडण्याची उत्तम व्यवस्था केली. शतकानुशतके पीडीत स्त्रियांचे सामाजिक, आर्थिक शोषण थांबवले याचेही श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते.

## संदर्भग्रंथ सूची:


१. डॉ. धनंजय कीर, *डॉ बाबासाहेब आंबेडकर*, पृ.४०५.

२. डॉ.वा.ना.कुबेर, *डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंथन.*

३. प्रतिमा इंगवले, *बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री जागृतीचे कार्य.*

४. डॉ. गंगाधर पानतावणे, *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवडक लेख.*

५. प्रा.डॉ. बी.डी. कुलकर्णी, *आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र*, डायमंड पब्लिकेशन , पुणे.

६. डॉ. मंजूषा मुसमाडे, *मागोवा अर्थविचारांचा*, शब्दश्री प्रकाशन, पुणे, पृ. २७, ३६.

७. योजना, ८ जुन २००१ व डिसेंबर २००२, पृ.१६,१७.

८. लोकराज्य, ऑक्टोबर २००६, पृ.१४३.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विचारक्रांती

सुभाष आर. गुर्जर, वरवट बकाल,
कला वाणिज्य महाविद्यालय,
ता. संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा.
भ्रमणध्वनी: ९४२३९१२८२१

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनाकार, कायदेतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ म्हणून भारतातच नव्हे तर जगात परिचीत आहेत. डॉ. आंबेडकर यांनी अर्थशास्त्रासंबंधी कोणतेही सिध्दांत मांडले नाही. परंतु उच्च शिक्षण घेत असतांना त्यांनी अर्थशास्त्रासंबंधी जे शोधनिबंध लिहीलेत, वर्तमान पत्रामधून जे लिखाण केले व अर्थशास्त्रासंबंधी जी पुस्तके लिहिली त्यातून ते अर्थतज्ज्ञ होते असे दिसून येते व त्यातच त्यांच्या आर्थिक विचारांचा उगम झालेला दिसून येतो. अर्थशास्त्र हे मानवाच्या व देशाच्या विकासाचा मुलमंत्र आहे, याची त्यांना जाणीव होती. एम.ए. च्या पदवीकरीता त्यांनी १९१५ मध्ये ॲडमिनीस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडीया कंपनी हा शोधनिबंध लिहिला. १९२५ मध्ये पी.एच्.डी. करिता प्रा. सेलिगमन यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रिटीश काळातील प्रांतीक वित्तव्यवस्थेची उत्क्रांती हा शोधनिबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला. डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी द प्रॉब्लेम ऑफ रुपी हा ग्रंथ सादर केला. या सर्व ग्रंथांमध्ये त्यांनी आपले आर्थिक विचार सविस्तरपणे मांडलेले दिसून येतात. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चलनविषयक, वेठबिगारविषयक, कामगार विषयक, कृषीविषयक, उद्योगविषयक, शेतमजूर विषयक व इतर विचारांचेच अध्ययन केले आहे.

## संशोधन पध्दती:

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित असून त्यासाठी विविध दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. ज्यामध्ये पुस्तके, विविध मासिके व शासकीय संकेत स्थळांच्या सहाय्याने प्रस्तुत शोधनिबंधाकरीता तथ्य संकलन केले आहे.

## आर्थिक विचार:

१) चलनविषयक विचार:

डॉ. आंबेडकर यांनी द प्रॉब्लेम ऑफ रुपी या ग्रंथामध्ये भारताच्या रुपयाच्या उत्क्रांतीचा ऐतिहासिक आढावा घेतला. जगामध्ये चलन पध्दतीचे जेवढे प्रकार होते ते भारतात होऊन गेल्याचे निदर्शनास येते. त्यावेळी भारतीय रुपयाची संरचना सुवर्ण परिमाणात असावी की गोल्ड स्टँडर्ड असावी याबद्दल वाद निर्माण झाला होता. ब्रिटीश काळात अनेक चलनपध्दती सुरु झाल्या परंतु भारतीय लोकांना हवी असलेली चलन पध्दती ब्रिटीशांनी सुरु केली नाही.

भारतात सुवर्ण विनीमय परिमाण असावे असे मत प्रा. केन्स यांनी मांडले. परंतु डॉ. आंबेडकरांनी केन्सच्या विचाराला विरोध केला. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहत नाही, लवचिकता आहे पण त्यामुळे रुपयाची घसरण होवून रुपयाचे स्थान अस्थिर होईल. त्यासाठी आंबेडकरांनी पुरावे दिले. त्यांच्या मते सुवर्ण परिमाणामध्ये वस्तुच्या किंमती स्थीर होत्या व सुवर्ण विनिमय परिमाण स्वीकारल्यानंतर वस्तूंच्या किंमती वाढत गेल्याचे विवेचन हिल्टन यंग कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांनी हे मत मांडले. डॉ. आंबेडकर व प्रा. केन्स यांच्यातील चलनपध्दती बद्दलचा वाद संपला असला तरी मात्र जास्त चलन निर्मितीमुळे भाववाढ होते हे आंबेडकरांचे मत आजही नाकारता येत नाही.

२) वेठबिगार विषयक विचार:

वेठबिगारी ही भारतीय समाजव्यवस्थेला व अर्थव्यवस्थेला लागलेली कीड आहे. भारतातील श्रमिक वर्गाचे राहणीमान कनिष्ठ दर्जाचे आहे. त्यांना मिळणारा मोबदला श्रमाच्या तुलनेत कमी आहे. भारतामध्ये उच्चवर्णीय समाजाने आपल्या फायद्याकरीता वेठबिगारी पध्दती सुरु केली. सावकार किंवा जमिनदार आपल्या गरजा वेठबिगारांकडून पूर्ण करुन घेतात. श्रमिकांच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांना कर्ज देवून जीवनभर त्यांना गुलामाप्रमाणे वागविण्याचे कार्य जमिनदार व सावकार वर्ग करतात.

डॉ. आंबेडकरांच्या मते उच्चवर्णीय जमीन मालक वेठबिगारी वर्गाची पूर्वीपासून पिळवणूक व आर्थिक शोषण करतात. यामुळे भारतात सामाजिक व आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. ब्रिटीशांनी वेठबिगारीची कूप्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतर कायदेही केले. परंतु शासनाने कायद्याची योग्य त्या प्रमाणात अंमलबजावणी केली नाही.

३) कामगाराविषयक विचार:

इंग्लंडमध्ये १८ व्या शतकात औद्योगिक क्रांतीचा उगम झाला. यंत्राच्या वापरामुळे वस्तुचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यात आले. श्रमिकांच्या श्रमामुळे वस्तुला किंमत मिळत असल्यामुळे कामगारांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळावा असे कार्ल मार्क्सचे विचार होते. परंतु भांडवलदार दिवसेंदिवस सामर्थ्यवान होत असून कामगारांची पिळवणूक करतात. कामगार वर्गाने भांडवलदार वर्गाचा अन्याय अत्याचार सहन करण्याच्या मर्यादा ओलांडल्या, त्यातून कामगार चळवळीचा उदय झाला. चळवळीचा उगम १८७५ साली झाला. त्यानंतर मुंबई प्रांतात कामगारांनी श्री सोराबजी यांच्या नेतृत्वाखाली कापड गिरण्यांमध्ये कामगारांच्या काम करण्याच्या परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी स्त्री व बाल कामगारांना चांगली वागणूक मिळवून देण्यासाठी व कामगारांच्या

हिताची जपवणूक व्हावी याकरिता एखादा कायदा करुन घेण्याची चळवळ केली. डॉ. आंबेडकरांच्या मते शासनाचे धोरण कामगारांच्या हिताच्या बाजूने असणे आवश्यक आहे तरच देशात कामगार व भांडवलदार यांचे संबंध सलोख्याचे राहतील. त्यामुळेच राज्य घटनेमध्ये कोणावरच अन्याय अत्याचार होणार नाही याची काळजी घेतली. कामगारांना अन्यायाविरुध्द संप, मोर्चा इ. पुकारण्यास लोकशाही माध्यमाने अनुमती दर्शविली. डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही अभावी शासनव्यवस्थेचा आर्थिक विकास कसा खुंटतो किंवा कामगार संघटनांची कशी वाताहात होते हे दर्शविलेले आहे.

४) कृषीविषयक विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती व्यवसायाला जोडधंदा असणे महत्वाचे मानले. त्यामध्ये पशुपालन, वन उत्पादन, व्यापारी इ. व शेतीचे राष्ट्रीयीकरण करुन शेती विकासासाठी सरकारने वित्तीय बँकेअंतर्गत शेतकरी वर्गाला कृषी कर्जाची हमी द्यावी, त्यामुळे त्यांची स्थिती सुधारुन दर्जा उंचावेल. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा शेती असून गावाच्या आर्थिक विकासाकरीता शेतीवर आधारित उद्योग आणि लघु उद्योगाचा विकास करणे महत्वाचे आहे. त्याशिवाय राष्ट्राच्या संपत्तीत वाढ होणार नाही. जमीनदार, व्यापारी वर्ग शेतमजुरांचे शोषण करतात. त्यामुळे ग्रामीण भागात सुध्दा शहरी भागाप्रमाणे आर्थिक विषमता असल्याचे स्पष्ट दिसून येते. शेतकरी वर्गाकडे कृषीमधून माल आल्यानंतर बेभाव व्यापारी वर्गाला विकावा लागतो त्यानंतर उत्पादित मालाच्या किंमती वाढल्या जाते. त्यामुळे शेतकरी वर्गाला शेती परवडत नाही. शेती कसण्यासाठी तो व्यापारी वर्गाकडे कर्ज घेण्याच्या मार्गी लागतो. परिणामी जास्त व्याज व कमी उत्पादनामुळे आज शेतकरी आत्महत्या करण्याच्या मार्गाकडे वळलेला दिसून येतो.

५) उद्योगविषयक विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकीकरण महत्वाचे आहे. परंतु त्यातून आर्थिक विषमता व आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण होवू नये त्याचबरोबर प्रादेशिक औद्योगिक असमतोल होऊ नये. देशामध्ये संतुलित विकास व्हावा याकरिता शासनाने लक्ष घालून संतुलित औद्योगिक विकास साध्य करावा. त्याचबरोबर उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करुन सार्वजनिक मालकीचे काही मूलभूत स्वरुपाचे उद्योग शासनाने चालवावे. सरकारने उद्योग सुरु करण्यासाठी काही महामंडळाची स्थापना करावी व विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करावे. उद्योगधंद्यावर शासनाची मालकी प्रस्थापित झाल्यामुळे त्या उद्योगावर शासनाचे नियंत्रण असते. परिणामी शासन संस्था सामाजिक लोककल्याणाच्या हेतूने प्रेरीत झालेली असते. त्यामुळे उत्पादनात वाढ होवून कामगारांना योग्य वेतन मिळेल. नागरिकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता मिळेल. भारतात उद्योगधंद्याच्या वाढीसाठी सरकारने पुढाकार घेऊन उद्योग स्थापन करण्यास लोकांना प्रोत्साहन द्यावे. त्याचप्रमाणे उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता वाढावी, त्यासाठी त्यांना शिक्षण व प्रशिक्षणाचा कार्यक्रम सरकारने हाती घ्यावा. उद्योगधंदा वाढविण्यासाठी शासनाने मुलभूत वाहतूक, दळणवळणाच्या सोयी सुविधा उपलब्ध

करुन द्याव्यात. भारतात विपूल प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्ती, श्रमशक्ती आहे. भारतात लघु, मध्यम, मोठे उद्योग व शेतीवर आधारित उद्योगांना चालना द्यावी. त्यामुळे देशातील लोकांचे उत्पन्न वाढेल, लोकांची आर्थिक स्थिती सुधारुन दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल आणि आर्थिक विषमता कमी होवून दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल असे डॉ. आंबेडकर यांचे मत होते.

६) शेतमजुरविषयक विचार:

शेतमजूर हा वर्ग भारतातील ग्रामीण व कृषी क्षेत्राशी संबंधीत घटक आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते भारतातील शेतमजुरांचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन दुसऱ्याच्या शेतीवर राबणे होय. शेतमजुराला वेळ, कामासंबंधी नियोजन, मजुरी ठरविण्याचा अधिकार नव्हता. शेतमजूर जवळपास गुलाम असे मत डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केले. शेतमजुरांना काही कामे फुकट करावी लागत तसेच कामाचा मोबदला अल्प मिळत असल्यामुळे त्यांची स्थिती दयनिय व हलाखीची होती. शेतमजुरांची स्थिती औद्योगिक मजुरांच्या स्थितीपेक्षा कमी दर्जाची आहे. त्यांना वेतन कमी कष्ट अधिक करावे लागते. त्यांचे संघटन नसल्यामुळे गावातील उच्च समाजातील लोक शोषण करीत असे. शेतमजुरांकडे शासनाचे लक्ष नसल्यामुळे व नियोजन मंडळाचे दुर्लक्ष असल्यामुळे त्यांची अवस्था बिकट दिसून येते.

७) इतर विचार:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार, शेतकरी, उद्योजक यांच्याकरिता अनेक सुधारणांचा पाठपुरावा केला. वेळोवेळी संघर्षही केला. तसेच त्यांनी वाढत्या लोकसंख्या नियंत्रणासाठी आपल्या भाषणातून वेळोवेळी मते व्यक्त केली. वाढती लोकसंख्या - बेकारी - दारिद्र्य या दुष्टचक्राचा कार्यकारण संबंध त्यांनी दाखवून दिला. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी त्यांनी १९३८ मध्ये मुंबई असेंब्लीत संततीनियमन विधेयक मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते देशातील दारिद्र्य, बेकारी, लोकसंख्याविषयक समस्या सोडविण्यासाठी शिक्षणावर भर दिला पाहिजे.

निष्कर्ष:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक विचारात मोलाची भर घातली आहे. हे त्यांनी मांडलेल्या अर्थशास्त्रीय विचारातून स्पष्ट होते. भारतातील चलन पध्दती कशी असावी, जास्त चलननिर्मिती केल्यामुळे भाववाढ होते, हे दर्शवून दिले. वेठबिगारी पध्दती ही भारतीय समाजव्यवस्थेला व अर्थव्यवस्थेला लागलेली कीड आहे असे मत व्यक्त केले. औद्योगिक क्रांतीमुळे कामगार वर्गाचे भांडवलदाराकडून शोषण केले जाते. कामगारांना चांगली वागणुक मिळावी व त्यांच्या हिताचे संरक्षण व्हावे याकरीता कायदा करुन घेण्यासाठी चळवळ उभारली. शेतकऱ्यांचा आर्थिक विकास व्हावा याकरीता जोडधंद्याच्या सोयी, बँकेतर्फे कर्जपुरवठा, लघु व कुटीर उद्योगाला प्रोत्साहन इत्यादी मार्ग सुचविले. देशाच्या आर्थिक विकासाकरिता औद्योगिकीकरण महत्वाचे मानले. परंतु प्रादेशिक असंतुलन न होता संतुलित विकास व्हावा व लोककल्याणकारी उद्योग शासनाने चालवावे असे मत मांडले. त्याचप्रमाणे शेतमजुराचे शोषण होवू नये याकरिता शासनाने योग्य पाऊल उचलावे. देशातील दारिद्र्य, बेकारी व लोकसंख्याविषयक समस्या

सोडविण्याकरीता शिक्षणावर भर दिला पाहिजे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासाकरिता अनेक आर्थिक विचार मांडले त्यांनी सुचविलेल्या विचारांची भारताला आजही गरज असल्याचे सिध्द होते.

## संदर्भग्रंथ सूची:


१) डाहाट धनराज, *आंबेडकर ग्रंथायन*, २००५, संकेत प्रकाशन, नागपूर.

२) इंगळे बी.डी., *आर्थिक विचारांचा इतिहास*, २०११, अरुणा प्रकाशन, लातुर.

३) जाधव नरेंद्र, *डॉ. बाबासाहेब आंबेडकर : आर्थिक विचार आणि तत्वज्ञान*, १९९२, पृ. २३.

४) कीर धनंजय, *डॉ. बाबासाहेब आंबेडकर*, १९६६, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

५) कसबे रावसाहेब, *आंबेडकर आणि मार्क्स*, १९८५, सुगावा प्रकाशन, पुणे.

६) पवार दया, *डॉ. आंबेडकर गौरव ग्रंथ*, १९९३, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

७) पंडीत नलिनी, *आंबेडकर*, २००५, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.


### निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

यल्लप्पा धरेप्पा पुजारी, सोलापूर,
अर्थशास्त्र विभाग,
दयानंद महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९९६०६०५७९५

शतकानुशतके उपेक्षित व शोषित राहिलेल्या दलित समाजाला त्यांच्या अवस्थेची जाणीव करुन देवून, शिका संघटित व्हा-संघर्ष करा हा मूलमंत्र देवून प्रस्थापितांच्या विरोधात लढण्यासाठी सज्ज करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. मनुस्मृतीचे जाहीर दहन, चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि काळाराम मंदीर सत्याग्रह या क्रांतीकारी आंदोलनानंतर त्यांनी चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारा हिंदू धर्म नाकारुन बौद्ध धम्माचा स्वीकार केला. ब्रिटीश सत्तेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी चाळीस कोटी जनतेचे प्रतिनिधी म्हणून महात्मा गांधी लढा देत होते, त्याच वेळी दुसऱ्या बाजूला चार कोटी अस्पृश्य समाजाला वरिष्ठ जातींच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी डॉ. आंबेडकर झटत होते.

प्रकांड पंडीत हीच उपाधी ज्यांना शोभते त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडेच स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेचा शिल्पकार हा बहुमान जातो. त्यांची असंख्य भाषणे, लेख व विविध विषयावरील ग्रंथ त्यांच्यातील तत्त्वज्ञाची साक्ष देतात. भारतीय लोकशाहीची आजवर जी यशस्वी वाटचाल होत आली आहे, त्यात डॉ. आंबेडकरांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

भारतरत्न भिमराव रावजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये कोकणात झाला. त्यांच्या बहुरंगी आणि चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू सर्वसाधारण जनतेला अपरिचित आहे, तो म्हणजे एक अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांची कामगिरी.

### अभ्यास प्रश्नांची मांडणी:

या अभ्यासाचे शिर्षक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार असे आहे यात प्रामुख्याने त्यांच्या उच्च शिक्षणाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर त्यांनी जे ग्रांथिक लेखन केलं आहे त्या सर्व ग्रंथांना अर्थशास्त्रीय विचाराचे एक विशिष्ट परिमाण असून त्याद्वारे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची योग्यता सिद्ध करणे.

**अभ्यास पद्धती:**

अभ्यासासाठी ज्या पद्धती वापरल्या आहेत त्यात प्रामुख्याने ग्रंथालयातील उपलब्ध संबंधित विषयावरील ग्रंथ तसेच ग्रंथालयाच्या नियतकालिक विभागात उपलब्ध असणाऱ्या विशेष नियतकालिकातून उपलब्ध होणारे संबंधित अद्ययावत लेख या सर्वातून उपलब्ध होणाऱ्या साहित्याची चिकित्सक व विश्लेषणात्मक मांडणी करणे या अभ्यास पद्धतीचा वापर केलेला आहे.

**डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या उच्च शिक्षणाच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर जे लेखन केलं आहे ते बहुधा अर्थशास्त्र विषयाशी निगडित असल्याचे दिसून येते. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने १९१५ साली एम्.ए. आणि १९१७ साली पीएच्.डी. या पदव्या त्यांना प्रदान केल्या त्या अर्थशास्त्र विषयामध्ये त्यानंतर १९२१ साली लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून डॉ. आंबेडकरांनी डॉक्टर ऑफ सायन्स ही अत्युच्च पदवी मिळविली ती देखील अर्थशास्त्र हा विषय घेवूनच. अर्थशास्त्राचे उच्चशिक्षण घेत असताना त्यांनी अर्थशास्त्रावर मौलिक ग्रंथ लिहिले.

स्वदेशी परतल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिले नसले तरी इतर विषयांमध्ये त्यांनी जी महत्त्वपूर्ण ग्रंथ निर्मिती केली त्या बहुतेक सर्व ग्रंथांना अर्थशास्त्राचे परिमाण असल्याचे दिसून येते. त्यामध्ये जातिव्यवस्था, अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांच्या आर्थिक परिमाणांची त्यांनी केलेली अभ्यासपूर्ण मिमांसा यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. याशिवाय त्यांनी वेळोवेळी केलेली भाषणे तसेच कारणपरत्वे ब्रिटीश सरकारला सादर केलेली निवेदने आणि दिलेल्या साक्षी या आर्थिक विचारांनी ओतप्रोत भरलेल्या दिसून येतात. मुंबई प्रांताच्या विधान मंडळामध्ये तसेच केंद्र सरकारच्या घटना समितीमध्ये त्यांनी जे युक्तिवाद केले त्यातून डॉ. आंबेडकरांमधला अर्थतज्ज्ञ सुस्पष्ट प्रतित होतो.

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर तीन ग्रंथ लिहिले. १) ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि इस्ट इंडिया कंपनी, २) इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया, ३)दि प्रॉब्लेम ऑफ रुपी: इटस् ओरिजिन ॲन्ड सोल्यूशन.

हे तीन ग्रंथ एम्.ए. पीएच्.डी. आणि डॉक्टर ऑफ सायन्स या तीन पदव्यांसाठी लिहिलेले प्रबंध होत. ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त व्यवस्था यांच्यामध्ये सन १७९२ ते १८५८ या कालखंडामध्ये कसकसे फेरबदल होत गेले आणि त्यातून भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला त्याचे विदारक आर्थिक चित्र डॉ. आंबेडकरांनी ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी या ग्रंथामधून उभे केले आहे. इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया या ग्रंथात सार्वजनिक आयव्ययासंबंधी डॉ. आंबेडकरांचे विचार दिसून येतात तर दि प्रॉब्लेम ऑफ रुपी : इटस् ओरिजिन ॲन्ड सोल्यूशन या ग्रंथामध्ये भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा सादर करुन भारतासाठी आदर्श चलनपद्धती कोणती? या त्यावेळच्या अत्यंत ज्वलंत विषयावर डॉ. आंबेडकरांनी आपले मूलगामी विचार मांडले आहेत.

बदललेल्या काळाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांच्या उपरोक्त ग्रंथाचे मोल काय? एकतर हा ग्रंथ एक ऐतिहासिक संदर्भ म्हणून अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेनुसार दर पाच वर्षांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांचे वित्तिय संबंध ठरविण्यासाठी वित्त आयोग (Finance Commission) नेमले जाते. विविध कराच्या रुपाने सरकारकडे जमा होणाऱ्या महसुली उत्पन्नाचे केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यामध्ये कसे वाटप व्हावे यांच्या शिफारशी करण्याचे कार्य या आयोगाकडून केले जाते. मात्र त्याचा मूलाधार डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ आहे हे नाकारता येत नाही. तसेच चलन निर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक अंकुश ठेवून भाववाढ नियंत्रित करण्यासाठी १९२१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली भूमिका एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतरही अबाधित राहिली आहे. त्यातून त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष पटल्यावाचून राहत नाही.

### अर्थशास्त्राचे स्वरूप:

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये केवळ संपत्तीचा व आर्थिक संबंधाचा अभ्यास व्हावा असा विचार मांडला नाही, तर अर्थशास्त्रात समाजाच्या कल्याणाचाही विचार झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. समाजामध्ये संपत्तीचे वाटप समानतेने व्हावे असे त्यांना वाटत होते. त्याचप्रमाणे जातीव्यवस्थेचा देशाच्या अर्थव्यवहारावर, अर्थव्यवस्थेवर कसा विपरीत परिणाम होतो हे देखील त्यांनी स्पष्ट केले. डॉ. आंबेडकरांच्या मते भारतीयांनी पाश्चिमात्य कल्पना जशाच्या तशा स्वीकारू नयेत. डॉ. आंबेडकरांनी असे दाखवून दिले की, जातीव्यवस्थेमुळे श्रमविभागणी, चलन पुरवठा, भांडवल, उपभोग या संकल्पनावर विपरीत परिणाम होतो. जातीव्यवस्थेतूनच दारिद्र्य, आर्थिक पिळवणूक, असमानता कशी निर्माण झाली, यामध्ये वाढ कशी झाली याची सविस्तर चर्चा त्यांनी केली. जातीव्यवस्थेमुळे विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो हे दाखवून देण्याचे काम आंबेडकरांनी केले. याशिवाय श्रमिकाला किमान वेतन मिळावे असाही त्यांचा आग्रह होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारामध्ये निश्चित कोणती दिशा होती याची कल्पना त्यांनी १९३६ मध्ये मजूर पक्षाची स्थापना केल्यावर जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यावरून येते. जाहीरनाम्यामध्ये आर्थिक धोरणाबाबत त्यांनी आपले काही विचार मांडले आहेत. प्रामुख्याने या धोरणात त्यांनी शेती, उद्योग, लोकहित साधण्याचे उपाय, कामगार व त्यांचे वेतन, कामगार कल्याण योजना, बेकारी निवारण, सावकारी नियंत्रणासंबंधी आपल्या कल्पना मांडल्या आहेत.

### भारतीय शेती:

डॉ. आंबेडकरांनी भारतीय शेतीव्यवस्था तिच्या समस्या, तिची अवस्था यासंबंधी विचार मांडले आहेत. १९१८ मध्ये The journal of Indian Economic Society च्या अंकात Small Holdings in India and their Remidies हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखात डॉ. आंबेडकरांनी भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे, सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्त्व सर्वाधिक आहे असे विशद केले आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या मते भारताच्या एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये शेती विकास झाल्याशिवाय

सुधारणा होणार नाही याची त्यांना जाणीव होती. भारतीय शेतीचे अर्थव्यवस्थेत महत्त्व जरी असले तरी भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे असे त्यांचे मत आहे. आंबेडकर यांच्या मते शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार होय.

डॉ. आंबेडकर यांच्या मते शेतजमिनीचा आकार लहान असल्याने शेतीच्या उत्पादकतेत वाढ होत नाही. भारतात शेती जमिनीचा आकार लहान आहेच; परंतु ती वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली आहे. याचाच अर्थ भारतात शेतजमिनीचे विभाजन व विखुरीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेवर त्याचा प्रतिकूल परिणाम झालेला आहे.

या समस्येवर उपाय म्हणून काही तज्ज्ञांनी असा विचार मांडला की, लहान धारणक्षेत्र असलेल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करावे. त्यामुळे शेतजमिनीचा आकार वाढेल परिणामी उत्पादकतेत वाढ करता येऊ शकेल.

डॉ. आंबेडकरांनी याबबत केलेला विचार सखोल स्वरूपाचा होता. त्यांच्या मते लहान आणि विखुरलेल्या लहान आकाराच्या जमिनी आपली मुख्य समस्या आहे. तेव्हा जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी केवळ जमिनीचे एकत्रीकरण करणे पुरेसे नाही तर त्यांचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर करणे हे देखील महत्त्वाचे आहे. जमिनीच्या एकत्रीकरणामुळे विखुरलेल्या धारणक्षेत्राचा प्रश्न सुटेल; परंतु लहान लहान धारण क्षेत्राच्या समस्या मात्र सुटणार नाहीत. कमी क्षेत्रफळ असल्यामुळे जे दुष्परिणाम होतात ते मात्र दूर करता येणार नाहीत. तेव्हा त्यासाठी जमिनीच्या क्षेत्राचा विस्तार करून आर्थिकदृष्ट्या किफायतशीर धारण क्षेत्रावर भर द्यावयास हवा.

डॉ. आंबेडकरांच्या मते जमिनीचे एकत्रीकरण केले म्हणजे जमिनीच्या उत्पादकतेत वाढ करण्याचा प्रश्न सुटेल असे नाही. कारण आज लहान लहान जमिनीचे एकत्रीकरण झाले. जमिनीचे क्षेत्रफळ वाढले; परंतु भविष्यात एकत्रीकरण केलेल्या जमिनीचे विभाजन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक. जर काळजी घेतली नाही तर पुन्हा जमिनीचे विभाजन होईल. एवढेच नव्हे तर विखुरीकरणही मोठ्या प्रमाणात होईल. भारतात वारसा हक्काचा कायदा असल्याने हे कायदेच उपविभाजन आणि विखुरीकरणास जबाबदार ठरतात. तेव्हा वारसा हक्कामुळे जमिनीच्या धारण क्षेत्राचा आकार बिनकिफायतशीर होत असेल तर कायद्याने त्याला परवानगी देऊ नये. कायद्यामध्ये सुधारणा करावी असे आंबेडकरांनी सुचविले.

डॉ. आंबेडकरांच्या मते जमिनीचा तुकडा किफायतशीर आहे की बिनकिफायतशीर आहे ही गोष्ट त्या जमिनीच्या आकारावर अवलंबून नसून तेथे इतर उत्पादन घटकांचे प्रमाण कितपत योग्य आहे यावर अवलंबून असते. या दृष्टीने विचार केल्यास मोठ्या धारण क्षेत्राप्रमाणेच कमी धारण क्षेत्र असलेल्या जमिनीदेखील किफायतशीर ठरू शकतात. जमिनीची उत्पादकता वाढविण्याचा खरा उपाय धारण क्षेत्राच्या आकारात वाढ करणे हा नसून त्या जमिनीवर भांडवल व इतर उत्पादनाच्या घटकांत वाढ करणे होय. शेतीसंबंधी विचार मांडताना असे सुचविले की, रशियाच्या धर्तीवर आपल्याला सामुदायिक शेतीची पद्धती

स्वीकारली पाहिजे. आपल्या शेतीचा प्रश्न सोडविण्याचा तोच एक मार्ग आहे असे त्यांचे मत आहे. State and Minorities या ग्रंथात आंबेडकर म्हणतात की, शेती हा उद्योग राज्यशासन चालवील. लागवडीखाली नसलेली जमीन भूमिहीन लोकांना सरकारने द्यावी. भूमिहीन लोकांना जात, धर्म न पाहता असा भेद न करता जमीन शेती करण्यासाठी द्यावी. ही शेती सरकारच्या नियमानुसार परंतु सामुदायिक पद्धतीने कसली जावी, या जमिनीवर कर वगैरे दिल्यावर राहिलेले उत्पन्न शेती करणाऱ्यामध्ये वाटले जावे.

आंबेडकरांच्या मते सामूहिक शेती पद्धतीचा स्वीकार केल्यास उत्पादकता आणि कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करणे शक्य आहे. त्यांच्या मते सामाजिक अन्याय आणि शोषण सामुदायिक शेतीमध्ये होत नाही. शेतीची प्रगती व्हावी यासाठी भूविकास बँका, शेतकऱ्यांच्या पतपेढ्या, खरेदी-विक्री मंडळे स्थापन करावेत.

डॉ. आंबेडकरांनी शेतमजुरांबाबत काही विचार मांडले. त्यांच्या मते जे फायदे औद्योगिक कामगारांना मिळतात तेच फायदे भरपाई-आरोग्य-विमा यासारख्या योजना शेतमजुरांना देखील मिळायला पाहिजेत. असे झाले तरच ग्रामीण भागातील लाखो शेतमजुरांची स्थिती सुधारेल.

**उद्योगासंबंधी विचार:**

डॉ. आंबेडकरांनी औद्योगिकीकरणाला विरोध न करता आधुनिक औद्योगिकीकरणाचा पुरस्कार केला; परंतु अशा औद्योगिकीकरणातून विषमता, संपत्तीचे केंद्रीकरण, मक्तेदारी यांची वाढ होऊ नये असे त्यांना वाटत होते. त्यांचा सरकारच्या मालकीच्या उद्योगाला विरोध नव्हता. काही मूलभूत स्वरूपाचे उद्योग सरकार चालवेल असे उद्योग सुरू करण्यात, चालविण्यात सरकारने पुढाकार घ्यावा. सरकारने उद्योग चालविण्यासाठी महामंडळे निर्माण करावीत. विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण व्हावे असे त्यांना वाटत होते.

**जलनीति:**

१९४२ ते १९४६ या काळात डॉ. आंबेडकर व्हॉइसरॉयच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य असताना त्यांच्याकडे श्रम, सिंचन व ऊर्जा ही खाती होती. त्याच काळात त्यांनी सिंचन व ऊर्जा धोरणाचा पाया घातला. अर्थात सिंचन व ऊर्जा ही दोन्ही क्षेत्र १९३५ च्या भारत सरकार कायद्याप्रमाणे प्रांतिक सरकारकडे असल्याने डॉ. आंबेडकरांना प्रांतिक सरकारांचे सहकार्य प्रयत्नांनी मिळवावे लागले. डॉ. आंबेडकरांच्या व्यवहारी शहाणपणाचा परिणाम म्हणून त्यांच्या मार्गदर्शनानं शेती व उद्योग या दोन्ही महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रांच्या विकासासाठी अत्यावश्यक असणारी सिंचन व ऊर्जा ही दोन महत्त्वाची पायाभूत क्षेत्रं विकसित करण्याचा पाया घातला गेला. डॉ आंबेडकरांचं सिंचनधोरण तीन सूत्रांवर उभारलेलं होतं.

१) जलसंसाधन विकास करण्यासाठी नदीखो (पाणलोट) क्षेत्र हा आधार धरुन सिंचन योजनांचं नियोजन करता बहुद्देशीय दृष्टिकोन (Multi-pur pose) ठेवणं आवश्यक आहे. शेतीसिंचन पिण्यासाठी पाणी, जलवाहतूक, वीजनिर्मिती व काही पाणी उद्योगांसाठी शक्यतेप्रमाणे ही उद्दिष्टे असली पाहिजेत.

२) असे जलप्रकल्प राबवण्यासाठी पाणलोट प्राधिकरण (River Valley Arthority) ही प्रशासकीय व्यवस्था असावी.

३) सिंचन व ऊर्जानिर्मितीसंबंधात राष्ट्रीय पातळीवर दोन तांत्रिक मंडळ निर्माण करवीत. ती पुढीलप्रमाणे सेंट्रल वॉटरवेज इरिगेशन अँड नेव्हिगेशन कमिशन व केंद्रीय तांत्रिक वीज मंडळ.

डॉ. आंबेडकरांच्या नियोजनामुळे व दूरदृष्टीमुळेच तत्कालीन महत्त्वाचे मोठे जलप्रकल्प (दामोदर, हिराकुड, कोसीह) कार्यवाहीत आले व नंतरच्या सिंचन व ऊर्जाधोरणाची व्यवस्था उत्क्रांत झाली, असं म्हणावं लागेल. ऊर्जावाटपासाठी ग्रिड पद्धतीचा विचार त्यांनीच मांडला.

**जातीव्यवस्था:**

जाती व्यवस्थेमुळे भारताची आर्थिक प्रगती आणि विकास कसा खुंटला त्याचे मूलगामी विवेचन डॉ. आंबेडकरांनी ॲनिहिलेशन ऑफ कास्टस् या ग्रंथामध्ये केले आहे. जातीव्यवस्थेमुळे श्रमशक्ती आणि भांडवल हे उत्पादनाचे दोन्ही महत्त्वाचे घटक जिथे त्यांची उपयुक्तता जास्तीत-जास्त आहे अशा ठिकाणी वापरले न जाता पारंपरिक जातिनिहाय पद्धतीने अर्थव्यवस्थेमध्ये त्याचे वाटप होते. त्याशिवाय या दोन्ही घटकाची सचलता (Mobility) सीमित राहते. त्यामुळे उत्पादन प्रक्रिया अकार्यक्षम होवून आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो.

चातुर्वर्ण हे श्रमविभागणीच्या तत्त्वावर आधारित आहेत. अर्थात सामाजिक स्थैर्यासाठी याची आवश्यकता असतेच निरनिराळ्या कामांची विद्यार्जन आणि विद्यादान, सुरक्षा, व्यापार आणि सेवा अशी वर्गवारी करुन त्यामधून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण निर्माण झाले अशी भूमिका त्यावेळच्या काही मान्यवर विचारवंतानी घेतली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना हा युक्तिवाद मान्य नव्हता. कारण त्यांना जातिव्यवस्थेअंतर्गत श्रमिकांची विभागणी अभिप्रेत नसून श्रमाची विभागणी अभिप्रेत होती. विशेषत: बुद्धीमत्ता आणि अंगभूत कौशल्य अशा निकषावर आधारित श्रम विभागणीची संकल्पना त्यांना अपेक्षित होती. त्यांच्या मते, श्रमांच्या विभागणीमध्ये काहीही गैर नाही. मात्र श्रमिकांची विभागणी ही अमानवी आहे.

**अस्पृश्यता:**

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांचे आर्थिक दृष्टीकोणातून विश्लेषण करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुधा पहिलेच विचारवंत होत. व्हॉट काँग्रेस ॲन्ड गांधी हॅव डन टू अनटचेबल्स या ग्रंथामध्ये असे विचार मांडतात की, अस्पृश्यता ही केवळ धार्मिक रचना नसून गुलामगिरीपेक्षाही भयंकर अशी आर्थिक रचना आहे. गुलामगिरीमध्ये मालक हा गुलामाला किमान माणूस म्हणून वागवण्याची जबाबदारी तरी स्वीकारतो. परंतु अस्पृश्यता ही अशी व्यवस्था आहे की, जिच्यामध्ये मालकावर काहीही जबाबदारी न येता अव्याहतपणे अस्पृश्य समाजाची आर्थिक पिळवणूक करता येते. डॉ. आंबेडकर यांनी आपल्या विचारातून मानवी हक्काचे जोरदार पुरस्कार करुन समाजातील जातिव्यवस्थेबरोबरच अस्पृश्यतेचाही धिक्कार केला. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. गुन्नर मिर्डाल यांनी एशियन ड्रामा या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील विचारांचे सूत्र पकडून जातिव्यवस्थेसारख्या सामाजिक संस्थांमुळे आर्थिक विकासावर कसे दुष्परिणाम घडून येतात याचे विवेचन केले आहे. त्याबद्दल प्रा. गुन्नर मिर्डाल यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले, हे इथे नमूद करावेसे वाटते.

## जागतिकीकरण:

डॉ. आंबेडकर हयात असते तर त्यांनी जागतिकीकरणाचे कदापी समर्थन केले नसते. डॉ. आंबेडकरांच्या वैचारिक प्रभावामुळेच राज्यघटनेत राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आली, त्यांच्याच प्रभावामुळे १९४८ व १९५६ ची औद्योगिक धोरणे तयार झाली, हे विसरता येत नाही. ब्राह्मणवाद व भांडवलशाही हे दुर्बल घटकांचे मुख्य शत्रू आहेत. राष्ट्राच्या हितासाठी जमिनीचे राष्ट्रीयीकरण व सामुदायिक वा सहकारी शेती यांचा डॉ. आंबेडकरांनी पुरस्कार केला होता. योजनेसाठी साधनसामग्री गोळा करण्यासाठी विमा उद्योगाचे राष्ट्रीयकरणही त्यांनी सुचवले. जागतिकीकरण हे भांडवलशाहीचं गोंडस वर्णन आहे. त्यात कमालीची बाजारस्पर्धा अभिप्रेत आहे व अशी स्पर्धा दुर्बल घटकांची वाट लावते, याची जाणीव डॉ. आंबेडकरांच्या लेखनातून स्पष्ट होते.

वैचारिक, सैद्धान्तिक व तत्त्वज्ञानात्मक निकषांचा विचार केल्यास जागतिकीकरण ही बाब डॉ. आंबेडकरांच्या विचार रचनेशी पूर्णतः विसंगत मानवी लागेल. शेतीच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांची मूळ वैचारिक चौकट काय होती, हे आपण वर पाहिले. शेतीची प्रगती करण्यासाठी औद्योगिकीकरण करून शेतीवरच्या श्रमशक्तीचा भार कमी करणे आवश्यक आहे, ही त्यांची भूमिका होती. जमीन महसूल प्राप्तिकराच्या कक्षेत आणणे हे सहकारी, सामुदायिक शेती उत्पादकता वाढवण्यासाठी आवश्यक आहे. अशी त्यांची धारणा होती. महार वतन व खोती या व्यवस्था रद्द करण्यासाठी त्यांनी कमालीचे प्रयत्न केले. कारण या दोन्ही पद्धतीत दलितांचे दुहेरी शोषण-(आर्थिक व सामाजिक) होते, असं त्यांच ठाम मत होतं.

सध्याची भारतीय अर्थव्यवस्थेची परिस्थिती पाहता ५० टक्क्यापेक्षा अधिक (मुख्यतः लहान शेतकरी) शेती सोडू इच्छितात, काही राज्यांतून (विशेषतः दक्षिणेच्या) पाण्याचं दुर्भिक्ष्य वाढत आहे. शेताची उत्पादकता कुंठित होत आहे (सरासरी लहान धारणा व भांडवली गुंतवणूक करण्याची अक्षमता यामुळे) सिंचनटंचाई, वीजटंचाई, शेती-उत्पन्नकराचा प्रश्न, वाढता बेरोजगार, वाढती विषमता, भाववाढ, वाढती गरिबी, व्यापारतोलातल्या चालू खात्यावरची वाढती तूट इत्यादी प्रश्न लक्षात घेता डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार काळजीपूर्वक परिशीलन करून त्यातल्या सुयोग्य गोष्टी केंद्र सरकारच्या धोरणात व कार्यक्रमांत समाविष्ट करणं हे सामान्यांच्या कल्याणाच्या हिताचं ठरेल, यात वादच नाही. सर्व पातळ्यावर शिक्षणाचं वाढतं खासगीकरण, खासगी आरोग्यव्यवस्थेचा महागडेपणा, सार्वजनिक स्वस्त वाहतुकीची दुर्दशा, असंघटित रोजगाराचं वाढतं प्रमाण, उच्चशिक्षित श्रमशक्तीची अमानुष पिळवणूक व स्त्रियांचे आणि आणि इतर दुर्बल घटकांचे वाढतं सीमांतीकरण लक्षात घेतले, तर डॉ. आंबेडकरांचा विचारच समाजाला योग्य दिशा देऊ शकतो.

## समारोप:

डॉ. आंबेडकर यांनी समाजसुधारक, राजकारणी, कायदेपंडित इत्यादी भूमिका जीवनात केल्यामुळे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची भूमिका मागे पडली. त्यांनी अर्थशास्त्रीय विचारांसाठी पुरेसा वेळ न दिल्यामुळे त्यांनी अर्थशास्त्रासंबंधी जे विचार मांडले त्यात निश्चितच कमतरता दिसून येते. कारण राजकीय कार्यक्रमाची रणधुमाळी

इतकी वेगात चालत असे की, त्यामुळे त्यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास झोकाळून गेला. भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणूनच सारा भारत डॉ. आंबेडकरांना ओळखतो, कायदामंत्री म्हणूनही ते ख्यातनाम झाले, पण त्यांचा अर्थशास्त्राचा व्यासंग गाढा होता. बहुजन समाजाला ते घटनाकार व दलित जनतेचे पुढारी म्हणूनच ज्ञात राहिले. त्यांच्या अर्थशास्त्राच्या व्यासंगाचा जनतेला अधिक लाभ मिळू शकला नाही.

भारतामध्ये समतेवर आधारित अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था स्थापन व्हावी असे त्यांना वाटत होते. त्यानी राज्य समाजवादाचा पुरस्कार केला. समाजवादाचा पुरस्कार करताना त्यांनी लोकशाही मूल्याचा बळी जाऊ नये अशी अपेक्षा व्यक्त केली. श्रमिकांना, प्रामुख्याने शेतमजुरांना विविध सोयी मिळाव्यात असे त्यांना वाटत होते. त्याचप्रमाणे शेतीच्या संदर्भात लहान शेतकऱ्यांबाबत त्यांनी मांडलेले विचार आजही उपयुक्त ठरतात.

## संदर्भग्रंथ सूची :


१) प्रा. गोडबोले वि.ज., *डॉ. आंबेडकर- एक व्यक्ती एक दृष्टी*, दुसरी आवृत्ती, २००१, दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे, पृ.५०.

२) गोखले द.न., *डॉ. आंबेडकरांचे अंतरंग*, दुसरी आवृत्ती, २००६, मौज प्रकाशन, मुंबई, पृ.२०६, २२४.

३) गायकवाड किशोर, *घटनेचे शिल्पकार - बाबासाहेब आंबेडकर*, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे २०१०

४) डॉ. सु.श्री.मु. देसाई, *आर्थिक विचारांचा इतिहास*, चौथी डॉ. सौ. निर्मल भालेराव आवृत्ती, २००४, निराली प्रकाशन, पुणे

५) डॉ. पुजारी वाय्.डी., *आर्थिक विचारधारा : समग्र विश्लेषण*, प्रथमावृत्ती, २०१२, अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर, पृ.२४१, २४६, २४९.

६) डॉ. कुबेर वा.ना., *डॉ. आंबेडकर : विचारमंथन*, तिसरी आवृत्ती, १९९८, सुगावा-प्रकाशन पुणे, पृ.२३७.

७) अर्थसंवाद (विविध अंक)

८) डॉ. पाटील जे.एफ. यांचे दै. सकाळ (सप्तरंग) मधील लेख-२०१३

# महिला सक्षमीकरणात डॉ. आंबेडकरांचे योगदान

मंडले सुषमा उध्दवराव, लातूर,
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ९५०३२०५१४५

**प्रस्तावना:**

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या शेवटच्या भाषणात आयरिश देशभक्त डॅनिअल ओ लोनल यांचे वचन सांगितले, त्यांच्या मते व्यक्ती, स्त्री व राष्ट्र हे प्रतिष्ठा, निष्कलंकता व स्वातंत्र्य याशिवाय कृतघ्न राहू शकत नाही. यामधून स्त्रियांच्याप्रति असलेली भावना व्यक्त होते. महिला सक्षमीकरणात डॉ.आंबेडकरांचे योगदान अनन्यसाधारण आहे. देशाच्या आर्थिक विकासात स्त्री-पुरूष समानता महत्वाची आहे. स्त्री सक्षमीकरणाचा विचार राष्ट्रीय दृष्टीकोणातून करून, स्त्री शक्तीचे सृजनात्मक स्वरूप राष्ट्राच्या विकासाशी जोडण्याची व्यवस्था त्यांनी स्वतःच्या कार्यातून केली. स्त्री-पुरूष समानतेसाठी सामाजिक स्तरीय घटना व कायद्याच्या माध्यमातून प्रयत्न केला. २१ व्या शतकातील बदलत्या परिस्थितीत स्त्रीयांचा विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील व प्रशासकीय सेवेत जो सहभाग आहे यामागे महात्मा फुलेंप्रमाणे आंबेडकरांचे विचार व कर्तृत्त्वाची संपदा आहे. डॉ. आंबेडकर हे स्त्री मुक्ती, स्त्री उन्नती व स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी संघर्ष करणारे सारथी होते. प्रस्तुत शोधनिबंधात महिला सक्षमीकरणात डॉ. आंबेडकरांचे योगदान यांचा उहापोह केला आहे.

**डॉ. आंबेडकरांचा आदर्शवाद:**

डॉ. आंबेडकरांमध्ये स्त्री-मुक्तीची वैचारिक पार्श्वभूमी महात्मा फुले, गौतम बुद्ध व कबीर यांच्या वैचिरिकतेतून निर्माण झाली. कुटुंबप्रमुखाची हुकूमशाही व स्त्रियांची गुलामगिरी हा सामाजिक विषमतेचा आधाराचे उच्चाटन केल्याशिवाय स्त्री-पुरूष समानता अशक्य आहे. हे महात्मा फुल्यांचे विचार आंबेडकरांना मार्मिक वाटतात. संत कवी कबीर यांच्या मते स्त्री-पुरूष हा भेद

शरीराचा आहे. गौतम बुद्धाने वैज्ञानिक दृष्टीकोनातून स्त्री-पुरूष समानतेवर भर दिला. हे आदर्शवादी विचार आंबेडकरांच्या स्त्री उन्नतीसाठी उपयुक्त ठरले. विदेशी स्त्रियांप्रमाणे भारतीय स्त्रीसुद्धा सुशिक्षित, प्रगल्भ विचाराची व उच्च राहणीमानाची असावी, असे स्त्री सक्षमीकरणाबाबत उच्च विचार आंबेडकरांचे होते.

**धर्मनिरपेक्षता:**

डॉ. आंबेडकर हे दलिताचे अग्रणी राष्ट्रीय नेते होते. देशातील सर्व धर्मीय स्त्रियांच्या मुक्तीचा विचार त्यांनी केला. आंबेडकरांच्या मते पुरूषप्रधान अर्थव्यवस्थेत स्त्रीचा उपयोग पुरूषाच्या विकासासाठी केला. बालविवाह, सती जाणे, जरठविवाह, इ. घातक रूढी व परंपरेच्या बेड्या स्त्रियांच्या पायात रोवून त्यांचे उदात्तीकरण करण्यात आले. सुधारणावादी चळवळ उच्च स्त्रियांसाठी झाल्या. १९ व्या शतकात महात्मा फुले यांनी सर्वधर्मीय स्त्रियांसाठी उन्नतीचे कार्य करून, त्यांना मानवी हक्क मिळवून दिले, धर्माच्या दास्यातून त्यांची मुक्तता केली. फुल्यांना गुरू मानणारे डॉ. आंबेडकरांनी २० व्या शतकात दलित व उच्चवर्णिय स्त्रियांसाठी सामाजिक दृष्टीकोनातून, कायद्याच्या माध्यमातून त्यांच्या उद्धाराचे कार्य केले. यातून त्यांचा सेक्युलर हा दृष्टिकोन दिसतो.

स्त्रियांच्या गुलामगिरीचा अभ्यास करताना त्यांनी क्रांती व प्रतिक्रांती या तत्त्वाचा आधार घेतला. मनुस्मृतीतील *स्त्री आरक्षणामुळे* कुटुंबात अगतिकता निर्माण होऊन गुलामापेक्षा हीन वागणूक स्त्रियांना मिळत असे. परंतु आंबेडकरांच्या मते स्त्रियांची प्रतिभा जेवढी फुलेल, तिची अंतशक्ती जेवढी साकार होईल तेवढे मानव जातीचे कल्याण होईल. स्त्रियांची गुणवत्ता वाढली तर पुरूषांना फायदा होईल. तिची सर्जनशीलता केवळ अपत्यापुरती मर्यादित न ठेवता जीवनाच्या विविध क्षेत्रात तिला कर्तृत्त्वाची उंच शिखरे गाठण्याची संधी देणे यात मानवजातीचे हित आहे. स्त्रियांच्या सर्जनशीलतेवरील बंधने दूर करून त्यांच्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, स्त्रियांच्या धर्मप्रणित गुलामगिरीविरूद्ध आवाज उठविणे असे स्त्रीमुक्तीचे रणशिंग आंबेडकरांनी फुंकले.

**कायदा:**

कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मोजमाप हे स्त्रियांच्या प्रगतीच्या आधारे केले जाते. भारतातील सर्वधर्मीय महिला सक्षम होण्यासाठी त्यांनी सामाजिक चळवळ सुरू केली. या चळवळीला गतिमान करण्यासाठी समाजप्रबोधन व कायदा करण्यात आला. स्त्रियांमधील प्रेरक शक्ती जागृत करण्यासाठी त्यांनी महिला परिषदा घेतल्या. भारतीय स्त्रियांची आर्थिक व सामाजिक गुलामगिरी कायद्याच्या माध्यमातून नष्ट केली. भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकारामध्ये समतेचा अधिकार (अनुच्छेद १४ ते १८) मान्य करण्यात आला. यानुसार स्त्री-पुरूष भेद नष्ट करून सर्व नागरिकांना समानता देण्यात आली. गिरणी कारखाने, शेतीत काम करणाऱ्या स्त्रिया, खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांनासुद्धा पगारी रजा, प्रसुतीरजा व लहान मुलांसाठी पाळणागृहे असावीत, तसेच स्त्रियांना पुरूषांबरोबर मतदानाचा अधिकार असावा, असे आंबेडकरांचे विचार होते.

स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावे यासाठी हिंदू कोड बिल तयार करून त्यात स्त्रियांना विशेष अधिकार देण्यात आले. उदा. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, नवऱ्याने घटस्फोट

दिल्यास पोटगीचा अधिकार, द्विभार्या प्रतिबंध कायदा, वारसा हक्क, दत्तक कायदा, व्यक्तीस्वातंत्र्य इ. बाबींना कायद्याचे रूप दिले. यामुळे भारतीय स्त्रीयांचा विकासाचा मार्ग मोकळा झाला.

**शिक्षण:**

डॉ. आंबेडकरांनी महिला सक्षमीकरणात स्त्री-शिक्षणाला महत्त्व दिले. अखिल भारतीय महिला परिषदेत त्यांनी स्त्रियांना शिक्षित व्हा, मुलांना शिकवा, तरच देशाची प्रगती होईल असा संदेश दिला. कुटुंबात जर स्त्री सुशिक्षित असेल तर संपूर्ण कुटुंब सुधारते. मुलींना जीवनाला उपयुक्त व व्यवहारोपयोगी शिक्षण द्यावे असे सांगून दलित स्त्रियांच्या हातात लेखणी दिली. स्त्री वर्गात शैक्षणिक जागृती निर्माण केली.

**नीतिमत्ता:**

डॉ. आंबेडकरांच्या मते स्त्री-पुरूषातील परस्पर अनुदार भावना नष्ट होण्यासाठी सह शिक्षणाची गरज आहे. यामुळे स्त्री व पुरूष समाजातील नीतिमत्ता राखून ठेवतील. जीवनात शील व नीतिमत्तेला अधिक महत्त्व देताना, आंबेडकरांनी स्त्री चारित्र्याला अधिक मान दिला. कुटुंबाचा नावलौकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून असतो, असे सांगून महिला सक्षमीकरणात स्त्रीमुक्ती चळवळीला महत्त्वाचे स्थान दिले. स्त्री अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देऊन नीतिमान समाजनिर्मितीची संप्रेरक शक्ती दिली.

**कुटुंब नियोजन:**

महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात आंबेडकरांनी कुटुंब नियोजनाचा प्रकर्षाने विचार केला. यात त्यांनी छोट्या कुटुंबाची संकल्पना मांडली. यामागे स्त्रीयांचा विकास करणे हा हेतू होता. लोकसंख्या नियंत्रणासाठी संतती नियमन हा एकमेव मार्ग त्यांनी सांगितला. यासाठी सरकारने प्रभावी प्रचार मोहीम हाती घ्यावी. कुटूंब, मुलांचा विकास, स्त्रियांचे आरोग्य, देशाची प्रगती, दारिद्र्य निवारण, अन्नपुरवठा अशा विविध दृष्टिकोनातून कुटूंब नियोजनाचा विचार आंबेडकरांनी केला.

**स्वावलंबन:**

सामाजिकदृष्ट्या स्त्रियांची उन्नती व्हावी असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. भारतातील ५० टक्के स्त्रिया कष्टमय जीवन जगत आहेत, यामुळे आर्थिक क्षेत्रात स्त्रियांचा विकास त्यांना सामाजिक क्षेत्रात समानता प्राप्त करून देणारा आहे. समाज व राष्ट्राच्या प्रगतीचा आरसा स्त्री विकास आहे. यासाठी तिने शिक्षण घेऊन स्वावलंबी झाले पाहिजे. स्त्रियांची संघटनशक्ती देशाच्या विकासात महत्त्वाची आहे. यासाठी भारतीय राज्यघटनेत स्त्री-पुरूषांना समान अधिकार व स्वातंत्र्य दिले आहे. रोजगार व आर्थिक घटकांच्या बाबतीत स्त्री-पुरूष असा भेदभाव केला जाऊ नये असे स्पष्ट मत आंबेडकरांचे होते.

**भारतीय संस्कृती:**

डॉ. आंबेडकरांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेतील पुरूषप्रधानता व धार्मिक चालीरीति, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा जोपर्यंत भारतीय स्त्रिया झुगारून देणार नाहीत, तोपर्यंत त्यांच्या जीवनात स्वातंत्र्य निर्माण होणार नाही. मनुस्मृतीच्या विचाराने भारतीय स्त्रिया पूर्णपणे जखडलेल्या होत्या, म्हणून अशा मनुस्मृतीचे दहन करून नवी मूल्ये, नवे विचार भारतीय संविधानातून देशाला बहाल केले. यात स्त्री-पुरूष समानता बहाल करून, स्त्रियांना स्वातंत्र्य दिले व आंबेडकरांनी आजीवन स्त्रीचा सन्मान केला.

## सारांश:

डॉ. आंबेडकरांनी भारतीय अर्थव्यवस्थेत प्रत्येक क्षेत्रात हलकी, कष्टमय कामे करणाऱ्या स्त्रीमध्ये आर्थिक सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला. स्त्री-पुरूष समानता १५ व्या कलमानुसार केली. स्त्रियांनी बुद्धीमान, धाडसी, परिवर्तनशील असावे असे त्यांचे स्पष्ट मत होते. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया धाडसाने पुढे येत आहेत. यामागे आंबेडकरांच्या विचारांची तपश्चर्या आहे. आज स्त्रियांना व्यावसायिक स्वातंत्र्य मिळाले असून, दलित स्त्रियांना स्वातंत्र्य, समान संधी प्राप्त झाली आहे. आंबेडकरांनी सुरू केलेल्या स्त्री-मुक्ती चळवळीमुळे स्त्री स्वावलंबन व उत्कर्षाचा मार्ग मोकळा झाला आहे. अशा या युगपुरूषाला कोटी कोटी प्रणाम !

## संदर्भसूची:


१) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे,* महाराष्ट्र शासन, २०००, खंड १८, भाग-१, पृष्ठ १४४.

२) *डॉ. बाबासाहेब गौरव ग्रंथ,* संपादक प्रा. गवळी, पृष्ठ ४९९-५००.

३) *हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती* - डॉ. बी.आर. आंबेडकर, अनुवाद तुलसी पगारे, सुगत प्रकाशन, नागपूर, १७, १९७४.

४) *डॉ. आंबेडकर गौरव ग्रंथ,* दया पवार, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, ३२, १९९३, पृष्ठ ११६.

५) *डॉ. आंबेडकरांची भाषणे व विचार* - डॉ. धनराज डाहाट, संकेत प्रकाशन, नागपूर, २०११.

# मराठी अर्थशास्त्र परिषद: उपक्रम थोडक्यात
## डॉ. सुधा मोकाशी पुरस्कृत उपक्रम

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि गो.से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव जिल्हा बुलढाणा यांचे संयुक्त विद्यमाने डॉ. सुधा मोकाशी पुरस्कृत उपक्रम अंतर्गत १६ जानेवारी २०१६ शनिवार रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्राचे उद्घाटक समारोहाचे अध्यक्ष प्राचार्य व्ही.एस. बायस्कर होते. प्रमुख उपस्थिती बी. बी. धांडे, माजी सहआयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग, म. रा. मुंबई, परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर, माजी अध्यक्ष डॉ. श्रीराम जोशी, अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम, प्राचार्य डॉ. आर. एम. भिसे आणि संयोजक डॉ. आर. आर. गव्हाळे उपस्थित होते. प्रतिमा पूजन केल्यानंतर स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत सन्मान चिन्ह देवून करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे संयोजक व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. आर. गव्हाळे यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका प्रास्ताविकातून विशद केली. परिषदेच्या वतीने डॉ. सुधा मोकाशी उपक्रमाबाबतची माहिती कार्यवाह डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी देऊन मोकाशी परिवाराचे आर्थिक सहकार्याबाबत आभार व्यक्त केले. आयोजित चर्चासत्राचे बीजभाषक बी. बी. धांडे यांनी मत्स्य व्यवसायाबाबत माहिती देतांना किमान कौशल्य आणि किमान भांडवल यावर चालणारा व्यवसाय म्हणून मत्स्य व्यवसायाकडे पाहिले जाते. तसेच शेतीला पूरक व्यवसाय आणि जास्तीत जास्त रोजगार या व्यवसायातून प्राप्त होतो. परंतु जगाच्या तुलनेत भारत हा मत्स्य व्यवसायामध्ये फार मागे आहे. सदर व्यवसाय कृषीशी संबंधित असल्यामुळे ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध होऊ शकेल त्यांनी या व्यवसायाकडे वळावे. म्हणजे शेतकरी आत्महत्या रोखण्यात मदत होऊ शकेल असे मत यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एस. बायस्कर यांनी केले. सदर उपक्रम आयोजनाची संधी मराठी अर्थशास्त्र परिषदेने उपलब्ध करून दिल्याबाबत परिषदेचे आभार मानले. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन डॉ. एच. ए. भोसले तर आभार प्रदर्शन डॉ. एस. टी. वराडे यांनी केले. या उपक्रमाचे निमित्ताने एक दिवसीय चर्चासत्रामध्ये कला व वाणिज्य महाविद्यालय, जरूड जिल्हा अमरावतीचे प्राचार्य डॉ. आर. एम. भिसे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास परिसरातील सहकारी मत्स्य व्यवसाय संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आपले अनुभव कथन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## उपक्रम् थोडक्यात: धुळे व्याख्यानमाला

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि स्व. कल्पना चावला कला महिला वरिष्ठ महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी यांचे संयुक्त विद्यमाने रविवार २४ जानेवारी २०१६ रोजी सकाळी ११:०० वाजता संत जनाबाई मंदिराचे सभागृहामध्ये धुळे व्याख्यानमाला संपन्न झाली. सदर उपक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. के. शिंदे हे होते. उद्घाटक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते, उपसभापती मंजुषाताई जामगे, डॉ. के. व्ही. देशमुख, बाळासाहेब राखे उपस्थित होते. प्रमुख व्याख्याता म्हणून प्राचार्या डॉ. मृणालिनी फडणवीस उपस्थित होत्या.

व्याख्यानमालेचे उद्घाटक डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांनी दीप प्रज्वलित केल्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. धुळे व्याख्यानमाला आयोजनामागील भूमिका प्राचार्य डॉ. आ. वि. कल्याणकर यांनी प्रास्ताविकातून व्यक्त केली. उद्घाटक डॉ. बी. व्यंकटेश्वरलु यांनी शेतकरी कुटुंबातील महिलांनी कृषि विद्यापीठाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. तसेच ग्रामीण भागात कृषिच्या विकासासाठी मेळावे आयोजित करण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा. कृषि विद्यापीठातील तज्ज्ञ व्यक्तींचे आपणास सहकार्य मिळेल असे आश्वासन दिले. त्यानंतर प्रमुख वक्त्या डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी मराठी भाषिक महिला समोरील आव्हाने या विषयावर आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या ग्राम पंचायत, पंचायत समिती व नगर पालिका निवडणुकांमध्ये महिलांनी सक्रीय सहभाग घेतला पाहिजे. खेड्यापाड्यात महिलांना राजकारणात येणाऱ्या अडचणी त्यांनी सविस्तरपणे मांडल्या. आपले कुटुंब आर्थिकदृष्ट्या संपन्न करण्यासाठी लघु उद्योग, कुटीर उद्योग स्थापन करण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा, तसेच शासनाच्या विविध योजना महिलांपर्यंत पोचवाव्यात असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. पी. ई. विभुते यांचे 'भारतीय आर्थिक महासत्तेचे २१ वे शतक' या ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलु यांचे शुभहस्ते झाले. डॉ. विभुते यांनी पुस्तकाबाबत मनोगत व्यक्त केले. व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ. बी. के. शिंदे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करून मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. आर. के. रसाळ यांनी तर आभार प्रदर्शन सौ. माधुरीताई राजेंद्र यांनी केले. कार्यक्रमाला श्रीसंत मारोती महाराज सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष बाळू महाराज, प्रा. एस. आर. यादव, प्रा. समाले, प्रा. माणिक जाधव, प्रा. संदिप थोरे, निवृत्ती सोडगीर, प्रा. जी. आर. संगेवार, प्रा. मंदा जाधव, संतोष कांबळे, भागवत खांडेकर, नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते मनोहर महाराज केंद्रे आणि शहरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४०वे राष्ट्रीय अधिवेशन, चांदवड

### सूत्रसंचालकांचे टिपण: प्रथम चर्चासत्र

## प्रा. नी. वि. सोवनी यांचे आर्थिक विचार

**दि. व्यं. जहागिरदार**, अमरावती,
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद,
भ्रमणध्वनी: ९८२२९२२९५१.

(कै.) नी.वि. सोवनी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९१७ रोजी सातारा येथे झाला. पुण्याच्या फर्ग्युसन या प्रसिद्ध महाविद्यालयातून बी.ए. उत्तीर्ण झाल्यावर ते गोखले अर्थशास्त्र संस्थेत गेलेत व तेथून त्यांनी एम.ए.ची पदवी इ.स. १९४० मध्ये उत्तीर्ण केली. ते सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांचे विद्यार्थी होते. आपले संशोधनपर कार्य त्यांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेत सुरू केले. गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या सुरूवातीचे काळात गाडगीळांसोबत सोवनी यांनीही महत्वपूर्ण कामगिरी केली. १९६० मध्ये जॉन हॉपकिन्स विद्यापीठात त्यांना प्राध्यापक म्हणून निमंत्रित केले होते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी झाल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांना मान्यता मिळू लागली. इ.स. १९६५ मध्ये बनारस येथे भरलेल्या इंडियन एकॉनोमिक असोसिएशनच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. संयुक्त राष्ट्राच्या जिनिव्हा येथील रिसर्च इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डेव्हलपमेंट या संस्थेत जवळपास चार वर्षे त्यांनी कार्यक्रम संचालक म्हणून काम पाहिले तसेच बँकॉक येथील ESCAP या संस्थेत लोकसंख्या विभागाचे संचालक म्हणूनही जवळपास ३ वर्षे त्यांनी यशस्वीपणे कार्य केले.

गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या सहसंचालक पदावर त्यांनी ६-७ वर्षे कार्य केले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या उभारणीचे ते शिल्पकार होते. परिषदेच्या मुंबई येथे झालेल्या अधिवेशनाचे ते पहिले अध्यक्ष होते. त्यानंतर ९ वर्षे ते कार्याध्यक्ष होते. महाराष्ट्र शासनातर्फे अर्थशास्त्र परिभाषा कोष निर्माण करणाऱ्या समितीचे ते अध्यक्ष होते. विद्वता व भाषेची जाण यामुळे त्यांनी परिभाषा कोष निर्मितीच्या कार्यात भरीव योगदान दिले. परिषदेच्या जडणघडणीत त्यांचे योगदान अपूर्व

होते. अशा ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञाचे ४ मार्च २००३ मध्ये पुणे येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

प्रो. नी.वि.सोवनी यांनी जवळपास ६० वर्षे अर्थशास्त्रातील विविध विषयांवर विश्लेषणात्मक स्वरूपाचे लिखाण केले आहे. त्यांचे बहुतांश लिखाण हे वैचारिक स्वरूपाचे आहे. त्यांची ग्रंथसंपदा ४० असून १२-१३ पुस्तके मराठी भाषेत असून उर्वरित इंग्रजी भाषेत आहेत. त्यासोबत त्यांनी मराठी व इंग्रजीतून १०० संशोधनपर लेखही लिहिले आहेत. त्यांच्या एवढ्या विस्तीर्ण तसेच विपुल लिखाणाबाबत येथे चर्चा करणे जवळपास अशक्य आहे. नागरीकरण, चलन व्यवस्था, आर्थिक विकास, जलसिंचन प्रकल्प, अर्थशास्त्राचे स्वरूप, आर्थिक सिद्धांत इ. त्यांच्या आवडीचे व अध्ययनाचे विषय असून त्यावर त्यांनी भरपूर लिखाण केले आहे. आर्थिक इतिहास हा देखील त्यांच्या अध्ययनाचा प्रमुख विषय होता. 'हिंदुस्थानातील सोन्याची विक्री' हा इ.स. १९४४ मध्ये लिहलेला लेख याचे उदाहरण आहे. आर्थिक इतिहासाकडे आधुनिक दृष्टीकोनातून पाहण्याची गरजही त्यांनी प्रतिपादली आहे.

प्रो.सोवनी यांनी लिहलेली मराठी माध्यमातील पुस्तके महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून उपलब्ध होऊ शकतात. त्यांनी इंग्रजीतून लिहलेली पुस्तके मात्र गोखले अर्थशास्त्र संस्था पुणे येथे उपलब्ध आहेत. काही महाविद्यालयांच्या ग्रंथालयातून इंग्रजीतून लिहलेली पुस्तके उपलब्ध होऊ शकतील. जे प्राध्यापक मराठी अर्थशास्त्र परिषदेचे जुने सदस्य असतील त्यांनी इ.स. १९८० ते २००२ पर्यंतचे अर्थसंवादाचे अंक पाहवेत. अनेक अंकांमध्ये प्रो. सोवनी यांचे लेख आहेत. त्यांनी विविध विषयांवर लिखाणावर केले असले तरी काही महत्त्वाच्या विषयांचा येथे थोडक्यात उल्लेख करू. या विषयांव्यतिरिक्त त्यांच्या अन्य आर्थिक विषयांवर देखील शोधनिबंध तयार करता येतील.

(१) अर्थशास्त्राच्या स्वरूपाबद्दल प्रो. सोवनी यांना नेहमीच आकर्षण वाटत होते. ते वैज्ञानिक शास्त्र आहे का असा त्यांना प्रश्न पडत असे. इ.स.१९८० मध्ये जॉन हिक्स यांच्या ५० वर्षातील लेखांचा संग्रह तीन खंडात प्रसिद्ध झाला. तिसऱ्या खंडात हिक्स यांनी अर्थशास्त्राच्या स्वरूपाबाबत असे विधान केले की, *अर्थशास्त्र हे वैज्ञानिक शास्त्र नसून अभ्यासचा एक प्रकार वा पद्धती आहे.* या विधानाचा संदर्भ घेऊन प्रो. सोवनी यांनी *अर्थमीमांसा* (१९९५) या ग्रंथात लेख लिहला आहे. त्यात अन्य अर्थशास्त्रज्ञांची मते सांगून आपल्या पद्धतीने स्वतंत्र विचारही मांडले आहेत. हा लेख दीर्घ स्वरूपाचा म्हणजे ६८ पृष्ठांचा आहे.

(२) अर्थशास्त्रात भांडवल हा शब्द जरी सहजतेने वापरला जात असला तरी तात्विकदृष्ट्या भांडवलाची संकल्पना क्लिष्ट आहे. भांडवल सिद्धांताबाबतचा जोन रॉबिन्सन यांचे विचार सांगणारा लेख अर्थशास्त्र चुकीचे/वा चकवे (१९९०) या पुस्तकात समाविष्ट आहे. जोन रॉबिन्सन यांच्या भांडवल या विषयावरील स्वरूपाचे व त्यासंबंधातील महत्त्वपूर्ण प्रश्नांचे विवेचन प्रो. सोवनी यांनी केले आहे. तसे करतांना भांडवल सिद्धांताच्या गोंधळावर त्यांनी नेमके बोट ठेवले आहे.

(३) अर्थव्यवस्थेत जे विविध

अर्थव्यवहार होतात त्यांच्या सार्वत्रिक समतोल कसा होतो हा अभ्यासकासमोर नेहमीच पडणारा व महत्त्वाचा प्रश्न. या प्रश्नाचे शास्त्रीय विवेचन वॉलरॉ, से, नाऊमन अशा अर्थशास्त्रज्ञांच्या विवेचनाद्वारे प्रो. सोवनी यांनी सविस्तरपणे *चिकित्सक निबंध* (१९७१) या ग्रंथातील *अर्थव्यवहारांचा सार्वत्रिक समतोल* या लेखात केले आहे. त्याद्वारे भाषेवरील व विषय समजावून सांगण्याच्या त्यांच्या क्षमतेवर भरपूर प्रकाश पडला आहे.

(४) इ.स. १९६० मध्ये स्राफा यांचे Production of Commodities by means of commodities हा छोटेखानी प्रबंध प्रसिद्ध झाला. त्यांच्या या प्रबंधाचे आकलन होणे (अगदी २-३ वेळा वाचूनही) फार कठीण जाते. प्रो. सोवनी यांनी मुंबई येथे श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठात स्राफाच्या या प्रबंधिकेवर चार भाषणे दिलीत व १९८१ मध्ये ती *स्राफा विचारसरणी* या नावाने प्रसिद्ध केलीत. अभ्यासकांनी स्राफाचा प्रबंध आणि सोवनींचे हे पुस्तक एकमेकासमोर ठेवून वाचले तर त्यातून असे दिसेल की सोवनी यांनी अभ्यासकांना समजेल या पद्धतीने हे पुस्तक लिहले आहे.

पुढे इ.स. १९९२ मध्ये प्रो. सोवनी यांनी *अर्थसंवाद* (खंड १६, अंक २, १९९२) मध्ये सॅम्युअलसन यांची स्राफा विचारसरणीवरची विदारक टीका हा लेख लिहला आहे. स्राफा यांनी मांडलेल्या दोन तत्वांची अशास्त्रीयता व पर्यायाने फोलपणा सॅम्युअलसन यांना दाखवून दिला आहे. भारतीय अभ्यासक कृष्णा भारद्वाज यांची स्राफा यांच्याशी चर्चा होत असे. त्यांनी स्राफाच्या विचारसरणीवर एक ग्रंथ संपादित केला आहे. अभ्यासकांनी तोही ग्रंथ पहावा.

(५) भारतीय अर्थव्यवस्थेत अर्थकारण व राजकारण या दोहोतील संबंधावर अनेकांना अभ्यास करण्याची इच्छा होते. या दोहोतील संबंधावर सोवनी यांनी धुळे येथे १९८४ साली २ व्याख्याने दिलीत. ती *भारतातील राजकारण व अर्थकारण* या नावाने मार्च १९८५ मध्ये प्रसिद्ध झालीत. जरी त्यांनी धिम्या आर्थिक प्रगती वा प्रगतीच्या दुर्देशेस राजकारण जबाबदार आहे असे स्पष्ट केले असले तरी विपरित परिस्थितीत खचून न जाता मानवाच्या वृत्तीत प्रगल्भी झाल्यास राजकारण व अर्थकारणही वृद्धींगत होऊ शकेल असा आशावाद प्रगट केली आहे. ७८ पानांच्या या पुस्तकाचा आधार घेऊन वर्तमानकालीन परिस्थितीचे विवेचन करता येईल.

(५) प्रो. सोवनी यांना भारताच्या जुन्या आर्थिक व्यवहारांच्या बाबत विशेष उत्सुकता होती. त्या दृष्टीने त्यांनी काही महत्त्वाच्या विषयांची चर्चा केली आहे. त्यांनी ज्ञानप्रकाशच्या एप्रिल १९४४ मध्ये *हिंदुस्थानातील सोन्याची विक्री* यावर दोन लेख लिहलेत. ही विक्री कशी अनर्थकारक आहे हे त्यांनी पटवून दिले. पुढे ५० वर्षानंतरही सुवर्णाच्या प्रश्नाबाबत त्यांनी Gold Exports from India 1931-39 हा संशोधनपर लेख Journal of Indian School of Political Economy ह्या संशोधनपर पत्रिकेत लिहला. सुवर्ण निर्यातीबाबत बी.पी.आडारकर यांनी या विषयाबाबत १९३५ मध्ये विवेचन केले होते. सोवनी यांनी आपल्या लेखात अडारकर यांचा याबाबतचा खुलासा व दृष्टीकोन बरोबर असल्याचे म्हटले आहे.

(७) प्रो.सोवनी व प्रो.रथ यांनी १९६०

मध्ये हिराकुंड धरणाबाबत *Report of an enquiry into the economic benefits of Hirakund dam* प्रसिद्ध केला. एखाद्या धरणाबाबत भारतात तरी केलेले ते पहिलेच अध्ययन होते. सिंचनक्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाने हा अहवाल वाचलाच पाहिजे. आर्थिक फायदे मोजण्याच्या स्वरूपातील विवेचन आजही उपयुक्त पडेल.

(८) प्रो. सोवनी यांनी इंग्रजीतून अर्थशास्त्रावर जी विविध पुस्तके लिहलीत त्यात लोकसंख्येच्या प्रश्नाशी निगडीत पुस्तके महत्त्वाची वाटतात त्यांनी लोकसंख्या विषयक प्रश्नांचे अध्ययन अगदी सुरवातीपासून केले व त्यावर पुस्तकेही लिहलीत. कोल्हापूरातील जनसंख्येच्या बाबत त्यांनी गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे स्वातंत्र्यपूर्व काळात पाहणी केली. नंतरही आणखी दोन पाहण्या केल्यात.

इ.स. १९४२ मध्ये त्यांनी *The Population Problem in India - A regional approach* हे पुस्तक लिहले. इ.स. १९६६ मध्ये प्रसिद्ध झालेले *Urbanization and Urban India* हे पुस्तक नागरिकीकरणाचा अभ्यास करणाऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यात नागरिकीकरणाच्या प्रश्नांची चर्चा आहे.

अति जनसंख्या *(Over Population)* हा त्यांचा अभ्यासाचा आणखी एक महत्त्वाचा विषय. १९५० मध्ये स्वीकारलेली अति जनसंख्येची व्याख्या आताही स्वीकारायची का असा प्रश्न करून त्याबाबत केलेल्या विवेचनामुळे सोवनींचे विवेचन एकदम जागतिक पातळीवर मान्य होऊ लागले.

प्रो. सोवनी हे विलक्षण बुद्धीमत्ता प्राप्त असलेले अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्या लिखाणाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता होती. त्यांचे इंग्रजी व मराठी भाषेवर प्रभुत्व होते. अर्थशास्त्रातील कठीण विषय समजाऊन सांगण्यात त्यांची हातोटी विलक्षणच होती. त्यांच्या सर्व लिखाणाची चर्चा येथे केली नाही. अजून नवीन विषय घेऊन निबंध करता येतील. मात्र निबंध लिहतांना आपण ज्या विषयावर लिहले आहे त्याला साजेसे शीर्षक द्यावे. प्रा.नी.वि.सोवनींचे आर्थिक विचार असे शीर्षक शक्यतो नको.

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४०वे राष्ट्रीय अधिवेशन, चांदवड

सूत्रसंचालकांचे टिपण: द्वितीय चर्चासत्र

# आर्थिक सुधारणा व भारतीय शेती

ज. फा. पाटील, कोल्हापूर,
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद.
भ्रमणध्वनी:९४२२०४६३८२
ई-मेल: jfpatil@rediffmail.com

१) *आर्थिक सुधारणा व भारतीय शेती* या विषयात १९९१ च्या नवीन आर्थिक धोरण तथा उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण यांच्या संदर्भात भारतीय शेतीमध्ये गेल्या २५ वर्षात जे महत्त्वाचे बदल होत गेले, जे प्रश्न निर्माण झाले, ते सोडविण्यासाठी ज्या उपाय योजना करण्यात आल्या. या सर्व बाबींचे चिकित्सक मूल्यमापन, आवश्यक त्या सांख्यिकीसह व संदर्भासहित करणे अपेक्षित / अभिप्रेत आहे.

२) उपरोक्त संदर्भ लक्षात घेता -

(अ) खाजगीकरण (ब) उदारीकरण (क) जागतिकीकरण (खाऊजा) यांचा भारतीय शेतीच्या विविध आयामावर झालेले परिणाम तपासणे अपेक्षित आहे. त्या दृष्टीने अभ्यासाचे अनेक विषय पुढील प्रमाणे मांडता येतील.

१) खाऊजा व जमीन मालकीच्या रचनेतील बदल
२) खाऊजा व शेतमालाच्या किंमती, शेतजमिनींच्या किंमती व खंड
३) खाऊजा व शेतमालाचे विपणन, साठा - वाहतूक इ.
४) खाऊजा व शेत पतपुरवठा, व्याजदर, कर्जबाजारीपणा, माफी
५) खाऊजा व शेतीचे यांत्रिकीकरण / आधुनिकीकरण
६) खाऊजा व शेतमजूर - वेतन, कामाचे तास इ.
७) खाऊजा व धारणक्षेत्राचे आकारमान.
८) खाऊजा व शेती-उद्योग तथा शेती-बिगरशेती व्यापारशर्ती
९) खाऊजा व शेतीमध्ये पाणी वीज, खते, बियाणे/कीटकनाशके यांचा वापर
१०) खाऊजा व शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व आत्महत्या

३) अशा शोधनिबंधांच्या रचनेसाठी संदर्भ साहित्य म्हणून -

(१) इंडियन सोसायटी फॉर अॅग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स वार्षिक अधिवेशनाचे प्रकाशित कार्यवृत्त

(२) *क्वॉर्टर्ली जर्नल ऑफ अॅग्रीकल्चर इकॉनॉमिक्सचे विविध खंड*

(३) *अॅग्रीकल्चरल सिच्युएशन* - इंडिया - विविध अहवाल

(४) *इकॉनॉमिक सर्व्हे - भारत सरकार* (१९९१-२०१५)

(५) *इकॉनॉमिक अॅण्ड पोलिटिकल विकलीचे* विविध अंक / खंड

(६) खालील ग्रंथ / नियतकालिकातील लेख उपयुक्त आहेत.


i) Mukhopadhaya K. and Charavarthy Libesh (1999) *India's Energy Consumption changes during 1973-1992.* Economic Systems Research - Vol. 11.

ii) Pal D.P. (2005) *Input-output Systems - Input Matrics and Distribution Practices* - Arth Beekshan - Vol. 14 No. 3 & 4, Dec. 2005.

iii) Bhalla, G.S. (2004) *Globalization and Indian Agriculture - State of The Indian Farmer* - A Mitherium Study - Vol. 19 Academic Pub.

iv) Chand Ramesh (2002), *Trade Liberalization WTO and Indian Agriculture and Prospects* (New Delhi - Mittal Publication)

v) Chandrashekhar C.P. (2007), *The Progress of 'Reform and the Retrogression of Agriculture'* JNU - New Delhi.

vi) Balakrishnan P., Golait, R. and Kumar, P. (2008), *"Agricultural Growth in India since 1991"*, Study No. 27, Development Study Group, Reserve Bank of India, Mumbai.

vii) Bhalla, G.S. and Singh, Gurmail (2001), *Indian Agriculture Four Decades of Development*, Sage Publications, New Delhi.

viii) Ghosh, Jayati And Thorat, Amit (2003), *"Corporate Agriculture : The Implications for Indian Farmers"*, Paper Presented in the All-India Conference on Agriculture and Rural Society in Conemporary India, Barddhaman, December 27-20.

ix) Ghosh, Jayati (2005), *"Trade Liberalisation in Agriculture : An Examination of Impact of Policy Strategies with Special Reference to India"*, Background Paper for Human Development Report 2005, New Delhi.

x) Gill, S.S. and Brar, J.S. (1996), *"Global Market and Competitiveness of Indian Agriculture : Some Issues"*, Economic and Political

Weekly, August, 10, p. 2175.

xi) Gulati, Ashok and Bathla, Seema (2001), *"Capital Formatio in Indian Agriculture: Revisiting the Debate"*, Economic and Political Weekly, 36(20), May.

xii) Gulati, Ashok and Mullen, Kathleen (2003), *"Responding to Policy Reform : Indian Agriculture in the 1990s and After"*, Working Paper No. 189, Stanford Center for International Development, Stanford.

xiii) Gulati, Ashok and Narayan, Sudha (2003), *Subsidy Syndrome in Indian Agriculture*, Oxford University Press, New Delhi.

xiv) Jha, Shikha and Srinivasan, P.V. (2004), *"Achieving Food Security in a Cost Effective Way : Implications of Domestic Deregulation and Reform under Liberalised Trade"*, Discussion Paper No. 67, International food Policy research Institute, Washington D.C.

xv) Lipton, M., Sinha S. and Blackman, R. (2002), *"Reconnecting Agricultural Technology to Human Development"*, Journal of Human Development, 3(1), pp. 123-152.

xvi) Nagaraj, K. (2008), *"Farmers' Suicides in India : Magnitudes, Trends and Special Patterns"*, Research Report, Madras Institute of Development Studies, Chennai.

xvii) *National Commission of Farmers* (NCF), (2005/2006), Reports, New Delhi.

xviii)Nayyar, Deepak and Sen, Abhijit (1994), *"International Trade and the Agricultural Sector in India"*, Economic and Political Weekely, May 14, pp. 1187-1203.

xix) Parikh, Kirit (1993), *"Economic Reforms and Food and Agriculture Policy"*, Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai.

xx) Ramachandran, V.K. (2006), *"Crop Diversification in Indian Agriculture : A Note"*, Unpublished Manuscript, Indian Statistical Institute, Kolkata.

xxi)Ramachandran, V.K. and Swaminathan, Madhura (eds.) (2005), *Financial Liberalisation and Rural Credit in India*, Tulika Books, New Delhi.

xxii)Reddy, Bheemeshwar (2008), *The Status of Public Agricultural Extension Services : A Case Study in Rural Maharashtra,* MA Dissertation in Development Studies, Tata Institute of Social Science, Mumbai.

xxiii)Singh, Sukhpal (2002), *"Contrating out Solutions : Political Economy*

*of Contract Farming in the Indian, Punjab"*, World Development, 30(9), pp.1621-1638.

xxiv)Vaidyanathan, A. (2000), *"India's Agricultural Development Policy"*, Economic and Political Weekly, 13 May, pp.1735-1741.

xxv) Dev S. Mahendra (2009), *"Structural Reforms and Agriculture : Inssues and Policies"* Keynote paper at the 92nd Annual Conference of the Indian Economic Association, 27th-29th December, Bhubaneswar, Orrissa.

xxvi) Dev S.Mahendra and Chandra sekhara Rao (2010), *"Agricultural Price Policy, Farm Profitability and Food Security"*, Economic and Political Weekly, Vol. XLV, No. 26 & 27, June 26, pp. 174-82.

xxvii)Sharma, Vijay Paul and Dinesh Jain (2011), *"High Value Agriculture in India : Past Trends and Future Prospects"*, W.P. No. 2011-07-02, Indian Institute of Management, Ahmedabad, July 2011.

xxviii)Sharma, Vijay Paul and Hrima Thaker (2010), *"Fertilizer Subsidy in India : Who are the Beneficiaries"*, Economic and Political Weekly, Vol.XLV, No. 12, March 20, pp. 68-76.

xxix)Vaidyanathan, A (2010), *"Agriculture Growth in India : Role of Technology, Incentives and Institutions"*, Oxford University Press, New Delhi.

---

## निवेदन

अर्थसंवाद जानेवारी-मार्च २०१६ अंकात फळे व भाजीपाला सहकारी संस्था या शीर्षकाचा निकिता भोरे यांचा लेख पृष्ठ ३९६ वर प्रकाशित झाला आहे. सदर लेखातील बहुतांश भाग पुढील संदर्भ ग्रंथातून घेतला गेलेला आहे.

१) सहकाराचा विकास, सी. जे. जोशी, के. सी. जोशी, फडके प्रकाशन, पृ.३७, ३८, ३९, ४१.

२) सहकाराचा विकास, रूपा शहा, बी. एच. दामजी, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.३६, ३९.

त्याबद्दल लेखिका व प्रकाशन दिलगीर आहोत.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

अर्थसंवाद

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४०वे राष्ट्रीय अधिवेशन, चांदवड

### सूत्रसंचालकांचे टिपण: तृतीय चर्चासत्र

# महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणा संदर्भातील शासनाची भूमिका

**उल्हास माळकर, पलूस,**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जिल्हा सांगली
भ्रमणध्वनी: ९९६०८५९१३४

महाराष्ट्रात दुष्काळ ही एक गंभीर समस्या झालेली आहे. दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती नाही तर अवर्षण (पाऊस) हे नैसर्गिक आहे. अवर्षण नियमित किंवा अनियमितपणे पडणे, त्यामुळे पुरेसे पाणी उपलब्ध न होणे म्हणजे अवर्षण होय. अवर्षण या नैसर्गिक घटनेचे दुष्काळ या सामाजिक घटनेत रूपांतर होते. त्यामुळे दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती नसून ती सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वरूपाची आपत्ती आहे. दुष्काळ अस्मानी की सुलतानी ? दुष्काळ नैसर्गिक की मानवनिर्मित? दुष्काळाला पर्यावरण जबाबदार की सरकार? दुष्काळ मानवी हस्तक्षेपामुळे की सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे? दुष्काळ दैववादी दृष्टीकोनामुळे की वास्तववादाचा अभाव असल्यामुळे? दुष्काळाला माणसे जबाबदार की सरकार जबाबदार? असे एक नाही तर अनेक प्रश्न निर्माण होतात. त्याची सैद्धांतिक चर्चा करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळ ही समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत आहे. दुष्काळ म्हणजे टंचाईचा काळ, दुष्काळ म्हणजे वाईट काळ, दुष्काळ म्हणजे अन्न-धान्याचा तुटवडा, दुष्काळ म्हणजे पाण्याचा अभाव असे विविध संदर्भ घेता येतात. दुष्काळाचा अर्थ आणि व्याख्या, स्वरूप आणि व्याप्ती, दुष्काळाबाबतचे दृष्टीकोन, दैववादी दृष्टीकोन, शास्त्रीय किंवा आधुनिक दृष्टीकोन, विविध तज्ज्ञांची मते याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील दुष्काळाचे प्रकार विचारात घेता-निसर्ग निर्मित दुष्काळ विचारात घेता अतिवृष्टी, अनावृष्टी, पूर, महापूर, वादळ, चक्रीवादळ इत्यादी नैसर्गिक कारणामुळे निर्माण झालेले दुष्काळ, महाराष्ट्र राज्य निर्मितीपूर्वी आणि नंतर अशा प्रकारचे दुष्काळ

किती पडले? त्याची कारणमिमांसा आणि त्यावरील उपाययोजना याबाबत लिखाण व्हावे. यासाठी स्वतंत्र विभाग, जिल्हा, तालुका यांचा अभ्यास करण्यात यावा.

मानवनिर्मित दुष्काळ विचारात घेता, सरकारचे सार्वजनिक धोरण चुकल्यामुळे जो दुष्काळ निर्माण होतो तो मानवनिर्मित दुष्काळ होय. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी आणि नंतर अशा प्रकारचे किती दुष्काळ राज्यात पडले, त्या दुष्काळाची कारण मिमांसा करून त्यासाठी सरकारने कोणती धोरणे आखली आणि त्याची अंमलबजावणी केली असता, किती प्रमाणात दुष्काळ कमी झाले. याची सविस्तर चर्चा महाराष्ट्राचे विभाग जिल्हे किंवा तालुके विचारात घेऊन व्हावी. महाराष्ट्रातील १७ जिल्हे आणि ११४ तालुके अवर्षण प्रवण (दुष्काळी) म्हणून ओळखले जातात. त्या बाबत सरकारचे नेमके धोरण कोणते आहे? आजपर्यंत सरकारने ठरविलेली धोरणे आणि त्याची अंमलबजावणी केली असता त्याचा झालेला फायदा या बाबत सविस्तर लिखाण व्हावे.

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील २४ हजारपेक्षा जास्त गावात सातत्याने दुष्काळ असतो. दुष्काळाशी सामना करण्यासाठी म्हणजेच दुष्काळ निर्मुलनासाठी सरकारने आजपर्यंत कोणती धोरण ठरविली आहेत? कोणत्या योजना राबविल्या आहेत? त्याचा दुष्काळ निर्मुलनासाठी किती फायदा झाला? या बाबींची चर्चा होणे अपेक्षित आहे. दुष्काळाबाबतच्या समस्येचा गंभीरपणे विचार करण्याची जबाबदारी सरकारची आहे. परंतु केवळ सरकारवर जबाबदारी टाकून चालणार नाही. तरी या प्रश्नासंबंधीचा अभ्यास करणारे अभ्यासक, शिक्षक, प्राध्यापक, संशोधक, संघटीत आणि असंघटीत क्षेत्रातील पगारदार आणि लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, संशोधन संस्था, अभ्यास मंडळे यांनी याचा आजपर्यंत केलेल्या अभ्यासाचा आढावा घेऊन दुष्काळ निर्मुलनासाठीच्या त्यांच्या उपाय योजनांची चर्चा होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील जनतेच्या जीवन मरणाचा प्रश्न म्हणून दुष्काळ या प्रश्नाकडे पाहिले जाते. या समस्येचा द्रष्टेपणाने विचार प्रा.डॉ. धनंजय गाडगीळ व तत्कालिन विचारवंतानी केला आहे. त्यामुळे १९५२ साली महाराष्ट्र राज्य दुष्काळ निवारण व निर्मुलन मंडळ स्थापन करण्यात आले होते. त्याचे काम पुढील काळात प्रा.डॉ. वि. म. दांडेकर आणि सहकाऱ्यांनी पुढे चालविले. महाराष्ट्रातील १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्र राज्य दुष्काळ निवारण व निर्मुलन मंडळाने महत्वाची भूमिका बजावली होती. अशा प्रकारे काम करणाऱ्या अभ्यास मंडळांचा, संशोधन संस्थांचा अभ्यास करून लेखन अपेक्षित आहे.

महाराष्ट्रात दुष्काळ निर्मुलनासाठी विविध प्रदेशात विविध प्रयोग होत आहेत. विशेषत: पाणी नियोजन व पाणी वापर, पाणलोट क्षेत्र विकास, पाणी अडवा पाणी जिरवा इत्यादी दुष्काळ निर्मुलन कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. या बाबत शिरपूर पॅटर्न, देवास पॅटर्न, दुष्काळ निर्मुलनासाठी विविध लोकांनी केलेल्या प्रयोगांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यावर लेखन होणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती अगोदर आणि नंतर पडलेले दुष्काळ यांची स्थिती, कारणे, परिणाम आणि त्यावरील उपाय यांची सांख्यिकिय

व माहितीच्या आधारे विश्लेषण करून लेखन व्हावे. महाराष्ट्रातील पाणी उपलब्धता, पाण्याचे नियोजन, पाणी वापर, पाणी वापराचा अग्रक्रम, पाणी योजना, पिण्याचे पाणी व शेती व उद्योगासाठी पाणी वापर व पुनर्वापर, पाण्याचे व्यवस्थापन, पाणी धोरण, पाणी अडवा पाणी जिरवा, पाणी नासाडी, सूक्ष्म जलसिंचन, जलसाक्षरता, नदी जोड प्रकल्प इत्यादीसंबंधी माहिती घेऊन दुष्काळ निवारण व निर्मुलनासाठी भूमिका स्पष्ट करणारे लेखन व्हावे. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त जिल्हे, तालुके, गावे यांची पाहणी करून त्याची भौगोलिक स्थिती, कृषी विषयक स्थिती, जंगले व जमिनीचा वापर, पीक पद्धती, सिंचन व्यवस्थेचा विकास, हरितक्रांतीचे धोरण, दुष्काळ निर्मुलनासाठी कारणे, पाण्याचे विस्तृत व समन्यायी वाटप धोरण, नदी खोरे आणि दुष्काळ निर्मुलन इ.संबंधातील माहितीच्या आधारे विश्लेषण करून लिखाण करता येईल.

महाराष्ट्रातील दुष्काळाचा शेती, कृषी उद्योग, व्यापार, उद्योगधंदे, वाहतूक व दळणवळण, आरोग्य, शिक्षण, पशुधन इत्यादी वरील परिणामांची वास्तवता आणि त्यावरील उपाययोजना यावर लिखाण व्हावे. महाराष्ट्रात दुष्काळ निवारण व निर्मुलनासाठी सरकारने राबविलेल्या विविध योजनांचा आढावा घ्यावा. उदा. अवर्षण प्रवण कार्यक्रम, शेती कर्ज, शेती कर्जाचे पुनर्गठण, पीक, कर्ज योजना, कर्ज माफी योजना, मागेल त्याला शेततळे योजना, स्वर्गीय गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजना, जलयुक्त शिवार योजना, अन्न सुरक्षा योजना, जीवदायी योजना, विज बिलात सवलती योजना, विद्यार्थी परीक्षा शुल्कात माफी योजना, मोफत बियाणे योजना, फळबाग लागवड योजना, पर्यावरण संरक्षण, संवर्धन विकास योजना, शेतकऱ्यांना जमिन महसुलात सूट देण्याची योजना, चारा छावणीची योजना, वनविकास योजना, विहीर वीज जोडणी योजना, जवाहर विहीर योजना, आरोग्याच्या योजना, सौरपंप योजना, मोफत शिक्षणाची सोय, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी समुपदेशन योजना, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना, सावकार ग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्ज माफी योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, कृषी संजीवनी योजना, कृषी पंप उर्जीकरण विशेष योजना, अटल सौर कृषी पंप योजना, शेतकऱ्यांच्या विधवांना उपजीविकेसाठी बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना, कृषी पायाभूत सुविधा अग्रक्रम, लघु मध्यम व मोठे पाणी पुरवठा प्रकल्प, कोरडवाहू अभियान, सामुहिक शेततळे, एकात्मिक जलसंवर्धन योजना, आकस्मिक निधीवाढ योजना, कृषीसहाय्यक धोरणातील बदल, भूजल विकास व व्यवस्थापन अधिनियम अंमलबजावणी, पाणलोट क्षेत्र विकास इ. योजनांवर लेखन अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण व निर्मुलन संबंधी पंचवार्षिक योजना काळातील तरतूद, अंदाजपत्रकातील वार्षिक तरतूद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतीच्या शाश्वत विकास साधनांची उपलब्धता व साक्षरता, सामाजिक न्याय व शाश्वत विकास धोरण, केंद्र व राज्य सरकारचे दुष्काळा संबंधी निकष व धोरण, नुकसान भरपाई संबंधीचे केंद्र व राज्य सरकारनेच केंद्र आणि राज्य सरकारचे निकष आणि धोरण, दांडेकर - दत्ता देशमुख यांची आठमाही सिंचन समिती अहवालातील योजना, पर्यावरण वादी

चळवळ, पाणी पंचायत चळवळ आणि योजना, सहकारी पाणी पुरवठा योजना, सह्याद्री वन संवर्धन योजना (सयाजी शिंदे) नाम दुष्काळ मदत योजना (नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे), हिवरे बाजारचा प्रयोग, (पोपटराव पवार) अशा प्रकारे सामाजिक व स्वयंसेवी संस्थांच्या दुष्काळ निर्मुलनाच्या व निवारणाच्या योजनांच्या सुक्ष्म, सखोल व सविस्तर अभ्यास करून आणि प्रत्यक्ष पाहणी अभ्यास करून लेखन करता येईल.

शोध निबंध लिहितांना विषय निश्चित करून त्या संबंधीची माहिती व आकडेवारी गोळा करून त्याची संदर्भ पुस्तके वाचून संशोधन पद्धतीचा वापर करून शोध निबंध लिहिता येतील. त्यासाठी दुष्काळ संदर्भातील संदर्भ साहित्य, प्रकाशित पुस्तके, संशोधन प्रबंध, संशोधन लेख व शासकीय अहवाल इत्यादींचा आधार घ्यावा.

## संदर्भग्रंथ सूची:

१) ब्रम्हे सुलभा (१९८३), *डॉट इन महाराष्ट्र १९७२* - गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

२) तपेश्वर सिंग (१९७८), *डॉटप्रोन एरियाज इन इंडिया*, पिपल पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली

३) भारतीय बी एम (१९५८) *फॅमिन्स इन इंडिया*, एशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई

४) देसाई ए. आर. (१९८२), *पेझंट स्ट्रगल्स इन इंडिया (संपादित)*, ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, नवी दिल्ली

५) धनागरे द.ना. (१९८३), *पेझंट मुव्हमेंट इन इंडिया*, ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, नवी दिल्ली

६) सेन अमर्त्य (१९८१), *पॉवर्टी अँण्ड फॅमिन : अॅन एसे ऑन इनटायटमेंट अँण्ड डिप्रिव्हेशन* - ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, नवी दिल्ली.

७) देसाई दत्ता (१९८७), *महाराष्ट्रातील दुष्काळ, मागोवा* प्रकाशन, पुणे

८) ढमढेरे एस.व्ही. (२०१३), *महाराष्ट्रातील जलसंपदा*, डायमंड पब्लिकेशन, पुणे

९) शिंदे आण्णासाहेब (संपादन) (१९८९), *महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन*

१०) गायकवाड बी.आर. (२०१२), *महाराष्ट्राचा आर्थिक विकास : एक चिंतन*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

११) रणसुभे - *शेती वाचवा देश वाचवा*, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर

१२) खांदेवाले श्रीनिवास व पाटील ज.फा. (२०१४), *महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती - समस्या व उपाय*, कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर

१३) सागर के (२०१५), *अस्सा हा महाराष्ट्र*, के सागर पब्लिकेशन, पुणे.

१४) दास्ताने संतोष (२०१५), *महाराष्ट्र २०१५*, दास्ताने आणि कंपनी, पुणे

अहवाल:

१) महाराष्ट्र राज्य जलसिंचन आयोग १९६२, १९९९, (२)महाराष्ट्र राज्य टंचाईग्रस्त क्षेत्र सर्वेक्षण वस्तुस्थिती अन्वेषण समिती १९७३, (३) आठमाही सिंचन समिती अंतरिम अहवाल १९७९, (४) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलवरील सत्यशोधन समिती अहवाल - १९८४, (५) महाराष्ट्राचे आर्थिक पाहणी अहवाल (विविध वर्षाचे)

अन्य साहित्य -

१) अर्थसंवाद, २) लोकराज्य ३) योजना ४) अॅग्रोवन ५) शेतकरी ६) शेतीप्रगती ७) कृषी पणन मित्र ८) समाज प्रबोधन पत्रिका ९) प्रबोधन प्रकाशन ज्योती १०) विविध दैनिकातील तज्ज्ञांचे लेख ११) वेबसाईट - महाराष्ट्र शासन १२) वेबसाईट - भारत सरकार १३) वेबसाईट - दुष्काळाची समस्या १४) जिल्हावार सांख्यकिय गोषवारे.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

### जुलै - सप्टेंबर २०१६ अंकासाठी लेख पाठवा

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

फक्त एवढंच् करा....

- **लेखकांनी आपला शोधनिबंध** Shree-Dev7-2336 **या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा.** फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी. पृष्ठसंख्या सामान्यपणे ५ ते ८ पृष्ठे असावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. **शोधनिबंधात कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा.** आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वतःचे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वतःजवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहेः कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### ४० वे राष्ट्रीय अधिवेशन, चांदवड: शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे वार्षिक अधिवेशन श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी खरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतिलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक येथे सामान्यपणे नोव्हेंबर २०१६ मध्ये आयोजित केले जाणार आहे. सातारा येथील डॉ.शिवाजी भोसले हे अध्यक्षस्थान भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.जी.एच.जैन आणि स्थानिक कार्यवाह डॉ.सुरेश पाटील (भ्रमणध्वनी:९४२३१८०८९१) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) प्रा.नी.वि.सोवनी यांचे आर्थिक विचार.

२) आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती.

३) महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासंदर्भात शासनाची भूमिका.

वरील विषयांचे टिपण *अर्थसंवाद* च्या एप्रिल-जून २०१६ या अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

दि.५ सप्टेंबर २०१६ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दात मांडावयाचे असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध Shree-Dev 708 या फॉन्टमध्ये PageMaker या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. MS-Word मध्ये टाईप करू नयेत. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज मा. अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीत असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

डॉ. शिवाजी भोसले,<br>
१६५/२, प्लॉट नं.११, मंगलाई कॉलनी,<br>
शाहू नगर, गोडोली, सातारा-४१५००१<br>
भ्रमणध्वनी: ९४२११२११७४५, ७०५८८६१५४०.

- डॉ. रामदास भांडवलकर,<br>
कार्यवाह-खजिनदार,<br>
मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, चांदवड

### निबंध लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) चर्चासत्रासाठी विषयाचे जे शीर्षक जाहीर केलेले असते तेच शीर्षक आपल्याही निबंधाला देणे आवश्यक नाही. त्याच्या अंतर्गत एखादा उप-विषय निवडून त्या अनुषंगाने योग्य असे शीर्षक आपणास देता येईल.

२) सामान्यपणे विषयाचा ऐतिहासिक आढावा घेण्यासाठी पूर्ण निबंधाचा उपयोग करु नये. त्यात अनेक वादग्रस्त मुद्यांचे विश्लेषण असल्यास आणि त्यातून नवीन अर्थ लावण्याचा प्रयत्न करणार असल्यासच विस्तृत आढावा घ्यावा.

३) जी माहिती एम.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकांमध्ये उपलब्ध असते तिचा संदर्भ म्हणून उपयोग करावा. परंतु त्या पातळीचे विश्लेषण असू नये कारण ते सर्वांना माहित असते. त्या माहितीतील सांख्यिकी संबंध शोधून त्यापलीकडे जाऊन विश्लेषणाचा प्रयत्न करणे योग्य राहील.

४) समाजाच्या आर्थिक जीवनाचा (राष्ट्रीय/प्रादेशिक आणि आवश्यकतेनुसार स्थानिक) सामाजिक - सांस्कृतिक जीवनाशी येणारा संबंध, त्यात होणारे बदल आणि शासनाचे आर्थिक धोरण यावर निबंधात त्या-त्या विषयाच्या अनुषंगाने भर असावा.

५) निबंधात वेगवेगळ्या भागामध्ये जे संबंध आपण दर्शवितो आणि निष्कर्ष प्रस्थापित करतो त्यांच्यात अंतर्गत सुसंगती साधण्याचा प्रयत्न केला जावा.

६) निबंधात शक्यतो महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या *'अर्थशास्त्र परिभाषा कोश'* आणि *'शासन व्यवहार कोश'* यातील परिभाषेचा उपयोग करावा. त्यातील शब्दांचा अर्थ पटत नसल्यास इतर शब्दांचा उपयोग करावा. महत्त्वाच्या मराठी संज्ञांचे मूळ इंग्रजी शब्द कंसात द्यावेत.

७) निबंधातील आकडेवारीचे संदर्भ अचूक, सुस्पष्ट, परिपूर्ण आणि मान्य पद्धतीनुसार असणे आवश्यक आहे.

८) निबंधाची मांडणी केवळ सांख्यिकी माहितीचे संकलन करुन वर्णन करणारी न ठेवता संशोधनात्मक पद्धतीची असावी. त्यामुळे निबंधाची पातळी उंचावेल. निबंध इतर भाषांतून केवळ भाषांतरीत नसावेत.

९) निबंधाच्या शेवटी संदर्भ टीपा / संदर्भ सूची प्रमाणित पद्धतीने असावी.

१०) निबंधाच्या अखेरीस ३०० शब्दात गोषवारा द्यावा.

(जोडपत्र क्र.०३)

अ) मराठी अर्थशास्त्र परिषद

लेखा परीक्षण अहवाल

उत्पन्न खर्च पत्रक ३१.०३.२०१५ अखेरचे

| अ.क्र. | खर्च | रक्कम | उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | अहवाल छपाई व इतर छपाई खर्च | २६८००.०० | बचत खात्यावरील व्याज | १६०३२.०० |
| २. | टपाल खर्च, बार्शी ६९५ | | पुणे विभाग गुंतवणूक व्याज | १०७१४८.०० |
| | यवतमाळ २००६० | २०७५५.०० | गुंतवणूक व्याज गुंतवणूकीत जमा | १६२२७१.७५ |
| ३. | स्टेशनरी खर्च | ५३००.०० | देणगी | १५००.०० |
| ४. | बँक कमिशन बार्शी ३७३ | | साधारण सभासद वर्गणी | ३०००.०० |
| | यवतमाळ ११११६ | १४८९.०० | भारतीय सामाजिक विज्ञान व | |
| ५. | झेरॉक्स खर्च | २५५२.०० | अनुसंधान परिषद, | |
| ६. | प्रवास खर्च बार्शी ८००० | | नवी दिल्ली अनुदान | १५०००.०० |
| | यवतमाळ २१६१० | २९६१०.०० | निवडणूक अर्ज विक्री | ९५००.०० |
| | बार्शी येथून दप्तर आणणे १०८०० | | यजमान महाविद्यालयाकडून वर्गणी | |
| ७. | मानधन खर्च बार्शी ३६०० | | (प्रतिनिधी शुल्क) | |
| | यवतमाळ लेखनीस ३६०० | | चांदूरबाजार अधिवेशन १३००० - | |
| | मदतनीस ४८०० | १२०००.०० | अकोला अधिवेशन १७५०० /- | ३०५००.०० |
| ८. | टेलिफोन खर्च | ५०००.०० | प्रा. भास्कर ढाले पारितोषिक | |
| | | | देणगी | ३००००.०० |
| ९. | किरकोळ खर्च | ५०९३.०० | | |
| १०. | व्याख्यानमाला व पारितोषिक खर्च | ३७६११.०० | | |
| ११. | ऑडीट फी (२०१३-१४) | ४५००.०० | | |
| १२. | अकोला अधिवेशन खर्च | २८८९.०० | | |
| १३. | अर्थसंवाद तूट | १७२५१२.०० | | |
| १४. | जादा उत्पन्न | ४८८४०.७५ | | |
| | एकूण रुपये | ३७४९५१.७५ | एकूण रुपये | ३७४९५१.७५ |

स्थळ : यवतमाळ

दिनांक : २४.७.२०१५

सही

प्रा. डॉ. आर. बी. भांडवलकर

कार्यवाह-खजिनदार

सही

जे. ए. धामेचा अँड कंपनी

सनदी लेखापाल

(जोडपत्र क्र.०३)

आ) मराठी अर्थशास्त्र परिषद

अर्थसंवाद विभाग

उत्पन्न खर्च पत्रक ३१.०३.२०१५ अखेरचे

| अ.क्र. | खर्च | रक्कम | उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | अर्थसंवाद छपाई व कागद | २७७७१५.०० | अर्थसंवाद जाहिरात | ६३००० .०० |
| २. | स्टेशनरी खर्च | ७१२.०० | बँक व्याज | ९३५.०० |
| ३. | बँक कमिशन | २२९.०० | अर्थसंवाद वर्गणी यवतमाळ | ८५००.०० |
| ४. | मानधन खर्च | २०००.०० | | |
| ५. | पोस्टेज खर्च | ३८५९५.०० | म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई | ४५०००.०० |
| ६. | प्रिंटींग खर्च (इतर) | ४४०.०० | अर्थसंवाद तूट | १७२५१२.०० |
| ७. | झेरॉक्स खर्च | १४१०.०० | अर्थसंवाद वर्गणी, शहादा | ४१०००.०० |
| ८ | पेट्रोल खर्च | १८८०.०० | | |
| ९. | टेलिफोन खर्च | ३२००.०० | | |
| १०. | प्रवास खर्च | ३२३६.०० | | |
| ११. | टायपींग खर्च | १५३०.०० | | |
| | एकूण रुपये | ३३०९४७.०० | एकूण रुपये | ३३०९४७.०० |

स्थळ : यवतमाळ

दिनांक : २४.७.२०१५

सही

प्रा. डॉ. आर. बी. भांडवलकर

कार्यवाह-खजिनदार

सही

जे. ए. धामेचा अँड कंपनी

सनदी लेखापाल

(जोडपत्र क्र:०३)

## इ) मराठी अर्थशास्त्र परिषद ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१५ अखेरचे

| देणे | | | रक्कम |
|---|---|---|---|
| स्थायी निधी | | | |
| आजीव सभासद वर्गणी | | | ७८५१७.०६ |
| | मागील | १४७४६७६.०० | |
| प्रकाशन निधी | चालू | १२०६००.०० | १५९५२७६.०० |
| अर्थसंवाद स्थायी निधी | | | ७८६०७.०७ |
| | | | ३३४३५३.०० |
| इमारत निधी | | | |
| | मागील | ७८९३६९.०० | |
| पारितोषिके व उपक्रम (इतर उत्पन्न) | चालू | ८७१५३.०० | ८७६५२२.०० |
| धुळे व्याख्यानमाला | | | |
| स्व. जमनालाल बजाज उपक्रम निधी | | ७५००.०० | |
| डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | | ३५०००.०० | |
| ग्रंथ पारितोषिक निधी | | १००००.०० | |
| मो.स.भावे पारितोषिक निधी | | | |
| ग. प्र.पिंपरकर पारितोषिक निधी | | ५०००.०० | |
| डॉ.रविंद्र सबनिस पारितोषिक निधी | | १३५००.०० | |
| डॉ. के. एच. ठक्कर पारितोषिक निधी | | ५००००.०० | |
| श्रीमती पद्मजा गंधे पाटील पारितोषिक निधी | | ६०००.०० | |
| डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक निधी | | २५०००.०० | |
| मातोश्री बयाबाई कदम पारितोषिक निधी | | २५०००.०० | |
| सौ.अरुणा रारावीकर स्मृती आ.लेख पुरस्कार निधी | | २०००००.०० | |
| प्रा.नि.वि.सोवनी स्मृती व्याख्यान निधी | | २५०००.०० | |
| स्व.डॉ.श्री.आ.देशपांडे पारितोषिक निधी | | १०१०५०.०० | |
| डॉ.सुधा मोकाशी पारितोषिक निधी | | ५१०००.०० | |
| स्व.प्रा.भास्कर ढाले पारितोषिक | | १०००००.०० | |
| अर्थसंवाद तूट निधी | | ३००००.०० | ७२४०५०.०० |
| इतर देणे | | १५००.०० | १५००.०० |
| | मागील | २५००.०० | |
| उत्पन्न खर्चाचा हिशोब | चालू | १६११०.०० | १८६१०.०० |
| चालू वर्षाची वाढ | मागील | १४१७९५०.०६ | १४१७९५०.०६ |
| | | | ४८८४०.७५ |
| | | | ५१७४२२५.९४ |

| | जिंदगी | | रक्कम |
|---|---|---|---|
| | कायम जिंदगी | | ६५६.०० |
| मुदत ठेवींमधील गुंतवणूक | प्रत्यक्ष एकूण ठेवी | | २६५३९०५.०० |
| व्याजावरील टी.डी.एस. | मागील | २४८८६.०० | |
| | चालू | ३४०३७.०० | ५८९२३.०० |
| रोख व बँकेतील शिल्लक | | | |
| पुणे विभाग | रोख | ४२१.०० | |
| बार्शी विभाग | रोख | २९०.०० | |
| बँक ऑफ महा.शहादा | बँकेतील | १०२९५.०० | ११००६.०० |
| बँक ऑफ इंडिया, पुणे | बँकेतील | ६२७५३६.४५ | |
| बँक ऑफ इंडिया, पुणे | बँकेतील | ७७०३६.६५ | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई | बँकेतील | ४३५६४.८४ | |
| बँक ऑफ महा.बार्शी | बँकेतील | ११४४.०० | |
| इको बँक, यवतमाळ | बँकेतील | १७००४५४.०० | २४४९७३५.९४ |
| | | | ५१७४२२५.९४ |

स्थळ: यवतमाळ
दि.२४.०७.२०१५

सही
प्रा.डॉ.आर.बी.भांडवलकर
कार्यवाह-खजिनदार

सही
जे.एच.धामेचा अँड कंपनी
सनदी लेखापाल

(जोडपत्र क्र.०३)

ई) मराठी अर्थशास्त्र परिषद

लेखा परीक्षण अहवाल

उत्पन्न खर्च पत्रक ३१.०३.२०१५ अखेरचे

| अ.क्र. | बँकेचे नाव | प्रमाणपत्र क्र. | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ३६०३ | १५८२५६.०१ |
| २. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ९४५२ | ४७४३६४.०० |
| ३. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ५६२७ | १५०००००.०० |
| ४. | एच.डी.एफ.सी. मुंबई | PR /११३३७२२ | २५०००.०० |
| ५. | एच.डी.एफ.सी. मुंबई | PR/१११५०३६ | ३५४६३.०० |
| ६. | एच.डी.एफ.सी. मुंबई | PR/११३८०९५ | १५०००.०० |
| ७. | मुकुंद लि. मुंबई | F१-४४२३२ | १०००००.०० |
| ८. | टाटा इन्कम फंड | TI-००००२८५१२५३८ | २०१२२.०० |
| ९. | स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई | ३००५४८९५२५६ | ५५०००.०० |
| १०. | जे.के.इंडस्ट्रीज लि. नवी दिल्ली | ६७६११ | ७००००.०० |
| ११. | यु. टी. आय.(सी.आर.टी.एस.) | ११९२१२१३/०३४४ | १५०७००.०० |
| १२. | आय.डी.बी.आय., मुंबई | ००७१०७००००३४८१२ | ५००००.०० |
| | | एकूण | २६५३९०५.०० |

स्थळ : यवतमाळ

दिनांक : २४.७.२०१५

सही

प्रा. डॉ. आर. बी. भांडवलकर

कार्यवाह-खजिनदार

सही

जे. ए. थामेचा अँड कंपनी

सनदी लेखापाल

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद,<br>द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर,<br>गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : | त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : | डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : | सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया,<br>जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : | डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल<br>कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,<br>शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी<br>स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,<br>एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल<br>जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३<br>समोर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,<br>
मुद्रक व प्रकाशक

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, चांदवड

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी खरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतिलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी. एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान (कनिष्ठ) महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक येथे सामान्यपणे नोव्हेंबर २०१६ मध्ये आयोजित केले जाणार आहे. सातारा येथील डॉ. शिवाजी भोसले हे अध्यक्षस्थान भूषवतील. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) प्रा.नी.वि.सोवनी यांचे आर्थिक विचार.

२) आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती.

३) महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासंदर्भात शासनाची भूमिका.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेचे मा. अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. आयत्या वेळेच्या विषयासाठी शोधनिबंध मागवले जात नाहीत. अधिवेशनास उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

डॉ. शिवाजी भोसले,
अध्यक्ष


प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष

प्राचार्य डॉ. जी. एच. जैन,
स्थानिक कार्याध्यक्ष

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार

डॉ. सुरेश पाटील,
स्थानिक कार्यवाह
भ्रमणध्वनी: ९४२३१८०८९१

डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक
अर्थसंवाद




Registration No.31918/77 अर्थसंवाद, जून २०१६/खंड ४०, अ